|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १० | अंक : ५२ | सोमवार दि. १९ डिसेंबर २०२२ ते रविवार दि. २५ डिसेंबर २०२२ | पाने : ८ | किंमत : ५/– रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

## मुलगी झाली होती डोक्याला ताप बाप बनला साप मुलीच्या हत्येचे पाप

जालना/क्राईम रिपोर्टर

आजकालची तरुण मुले कुणाचीही पर्वा करीत नाहीत. प्रेमासाठी नातीगोती मानीत नाहीत. त्यांच्या लेखी प्रेम आंधळे असते. त्यामुळे प्रेमासाठी वाटेल ते करायची त्यांची इच्छा असते. पिंपळगावमध्ये अशाच एका घटनेत एक तरुणी तिच्या नात्यातल्या मुलाबरोबर पळून गेल्याने तिच्या बापानेच तिची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. जालना जिल्ह्यातील पीर-पिंपळगावात एक संतापजनक घटना समोर आली असून, मुलगी घरात कुणालाही न सांगता नात्यातील मुलाबरोबर पळून गेल्याने ...पान २ वर

## वारकऱ्यांना कधी कळणार संतांच्या शिकवणीचे महत्व बाईमाणसाला मारण्याची धमकी हेच का त्यांचे हिंदुत्व

मुंबई/लक्ष्मणराव पाटोळे



भागवत धर्माची पथाका खांद्यावर घेऊन खेडोपाडी संतांच्या शिकवणीचा प्रचार आणि प्रसार करणाऱ्या वारकरी संप्रदायाबद्दल महाराष्ट्रातील जनतेच्या मनात आदर आहे. पण दुर्दैवाने वारकरी सांप्रदाय भाजपच्या राजकीय चक्रव्युहात अडकून एका महिलेच्या जीवावर उठलाय. हिंदू धर्म संस्कृतीत महिलेला साक्षात देवी मानून विविध रूपातील त्या देवीची पूजा केली जाते. आणि महाराष्ट्र हि तर संतांची भूमी आहे. ज्ञानेश्वर माऊली, तुकाराम महाराज, संत नामदेव, संत एकनाथ, संत जनाबाई, संत मुक्ताई या सर्वांनी समाजाला जगण्याची दिशा दाखवताना महिलांचा आदर आणि सन्मान करायला शिकवले. आईच्या रूपातील महिलांनी दिलेल्या संस्कारामुळे अनेक महापुरुष घडले. ज्यात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सारख्या युगपुरुषाचा समावेश आहे. महाराष्ट्रात जिजाबाई, सावित्रीबाई ताराराणी यांच्या सारख्या कर्तबगार महिलांनी समाज घडवला आणि आजही त्यांचा वारसा चालवणाऱ्या काही समाजसुधारक महिला विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. अशापैकीच एक आहेत शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे! गरिबीतून मोठ्या कष्टाने पुढे आलेली एक अभ्यासू महिला अशी त्यांची प्रतिमा आहे. मात्र संत ज्ञानेश्वर महाराजांबद्दल केलेल्या एका विधानाचा बाऊकरून वारकरी संप्रदाय त्यांच्या जीवावर उठलाय त्यांची प्रतीकात्मक प्रेतयात्रा काढली जातेय. त्यांना शिव्या घातल्या जातायत आणि आतातर काही वारकरी मंडळींनी त्यांना रस्त्यात मारण्याची धमकी दिलीय. सुषमा अंधारे आणि भाजप यांच्यात राजकीय वाद आहे, पण भाजपने इतरांच्या मागे जशी इडी, सीबीआय सारख्या तपास यंत्रणा लावल्या तशा सुषमाच्या मागे लावता आल्या नाहीत. कारण त कुठल्याही आर्थिक घोटाळ्यात त्यांचे हात बरबटलेले नाहीत. म्हणून मग त्यांच्या मागे वारकऱ्यांना लावण्यात आले. कारण आजकाल देवाधर्माच्या बदनामीचे आरोप झाले कि लोकांना सहज भडकावता येते. पहिली गोष्ट म्हणजे सुषमाने संत ज्ञानेश्वरमाऊलींचा अपमान केलेला नाही. त्या फक्त एवढेच म्हणाल्या कि रेड्यांच्या तोंडून वेद वदवून घेण्यात आले, पण गोरगरीब माणूस शिक्षणापासून वंचित राहिला. आता यात ज्ञानेश्वर माऊलींचा कसा काय अपमान झाला. मात्र तरीही त्यांनी घडल्या घटनेबाबत माफी मागितली असे असतानाही वारकरी त्यांच्या जीवावर उठणार असतील तर अशा लोकांना वारकरी म्हणवून घेण्याचा अधिकार नाही. कारण सुषमाला मारण्याची भाषा करणारे जनाबाई, मुक्ताई यांचे कुठल्या तोंडाने नामस्मरण करतील. भाजपच्या नादी लागून संतांच्या शिकवणीकडे पाठ फिरवणाऱ्या वारकऱ्यांनी महाराष्ट्रातील प्रत्येक माणसाला वेदना दिल्या आहेत आणि याच वेन्दांमधून त्यांच्या विषयी लोकांच्या मनात असलेला आदर कमी झाला आहे.

### शिवाजी महाराजांचा अपमान होताना वारकरी गप्प का?

महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजानी हिंदू धर्माचे रक्षण केले. महाराजांमुळे इथल्या धार्मिक स्थळांचे रक्षण झाले. वारकरी आज हिंदू धर्माची भगवी पथाका खांद्यावर घेऊन अभिमानाने पंढरपूरची वारी करतात, ती भगवी पथाका शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची साक्ष म्हणून ओळखली जाते. ज्याने रक्ताचे पाणी करून या भगव्या ध्वजाची शान राखली त्या शिवाजी महाराजांचा अपमान होत असताना वारकरी गप्प का? महाराजांचा अपमान करणारा काला टोपी कोशारी अजूनही राज्यपाल पदावर कसा याचा जाब वारकरी सत्ताधाऱ्यांना का विचारात नाहीत? याचे उत्तर त्यांनी द्यायला हवे!

## मेव्हण्याबरोबरच्या भांडणाचे निमित्त घडले पत्नीला ठार मारून स्वयंपाक घरात गाडले




औरंगाबाद/क्राईम रिपोर्टर

भाडेकरू ठेवताना त्याची पूर्ण चौकशी केल्याशिवाय घर भाड्याने द्यायचे नसते. पण काही घरमालक अशी खबरदारी बाळगत नाहीत. त्यामुळे त्यांच्यावर नको ती आफत येते. औरंगाबादमध्ये अशाच एका घटनेत गोरखनाथ शेळके यांनी आपले घर एकाला भाड्याने दिले होते. मात्र तीन महिन्यापूर्वी तो भाडेकरू आपल्या मुळगावी गेला होता. पण त्याने घरात चक्क आपल्या पत्नीचा मृतदेह पुरुन ठेवला होता. तीन महिन्यांनी शेळके यांनी जेंव्हा घर उघडले, तेंव्हा त्यांना स्वयंपाक घरातील ओटा खोदून तेथे काहीतरी खोदकाम करून सिमेंटने ते पूर्ववत केल्याचे आढळले. त्यांना संशय आल्याने तिथे खोदले असता चादरीत गुंडाळलेला मृतदेह आढळला. त्यानंतर पोलिसांनी त्या भाडेकरूला शोधून काढले आणि चौकशी केली असता मेव्हण्याबरोबर झालेल्या भांडणातून त्याने पत्नीची हत्या केल्याचे आणि मृतदेह पुरल्याचे कबुल केले.

औरंगाबादमधील वाळूज भागात एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. तीन महिन्यांपासून बंद असलेल्या एका घरातील स्वयंपाकघरात मिठात पुरलेला मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या मृतदेहाचा केवळ सांगाडा असल्याने मृतदेह महिलेचा आहे की पुरुष याबाबत खात्री होऊ शकलेली नाही. हा घातपाताचा प्रकार असल्याचा संशय पोलिसांनी वर्तविला आहे. तसंच नरबळीचाही प्रकार असू शकतो असाही प्राथमिक अंदाज वर्तवला जात आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वाळूजच्या समता कॉलनीत सूर्यकांत गोरखनाथ शेळके यांचे दोन मजली घर आहे. ज्यात तळमजल्यात सात तर वरच्या मजल्यात तीन रुम बांधलेल्या आहेत. दरम्यान सात महिन्यांपूर्वी शेळके यांनी काकासाहेब भुईगड (रा. धानोरा, ता. फुलंब्री) यांना तळमजल्यात दोन खोल्या भाडेतत्त्वावर राहण्यासाठी दिल्या होत्या. भुईगड हे आपली पत्नी आणि दोन मुलींसह वास्तव्यास होते. मात्र तीन महिन्यांपूर्वी आपण नवरात्रीसाठी जात असल्याच सांगून भुईगड कुटुंबासोबत गेले होते. अनेकदा फोन करुन भाड्याचे पैसे मिळत नसल्याने आणि नंतर फोन ...पान २ वर

## वृद्धाला निर्घुणपणे ठार मारून टाकले मृतदेहाचे तुकडे करून शेतात फेकले

लातूर/क्राईम रिपोर्टर



मयत बशीर शेख

आजकाल माणूस किती हिंसक आणि विकृत झाला आहे हे श्रद्धा वालकर हत्या प्रकरणातून दिसून आले. आरोपीने श्रद्धाच्या मृतदेहाचे ३५ तुकडे केले होते. एखाद्यावर किती जरी राग असला तरी त्याला अशा क्रूरपणे मारणे आणि मृतदेहाचे तुकडे करणे हा विकृतीचा कळस आहे. लातूरच्या बाभळगाव मधेही अशाच एका घटनेत एका वृद्धाची हत्या करून त्याच्या मृतदेहाचे तुकडे करून ते शेतात टाकण्यात आले. या घटनेमुळे संपूर्ण परिसर हादरला असुन बशीर नावाच्या ७१ वर्षीय वृद्धाची कोणी आणि का हत्या केली याचा आता पोलीस शोध घेत आहेत.

शेतात रात्री पाणी देण्यासाठी गेलेले ७१ वर्षीय आजोबा घरी परतलेच नाहीत, शोधाशोध केल्यानंतर दोन दिवसांनी त्यांच्या शरीराचे तुकडे शेतात विविध ठिकाणी सापडले. लातूर शहरापासून जवळच असलेल्या बाभळगाव येथे जिल्ह्याला हादरवणारी थरारक घटना समोर आली आहे. बशीर मदार शेख असं मयत व्यक्तीचं नाव असून या घटनेमुळे बाभळगाव पंचक्रोशीत एकच खळबळ उडाली आहे. सध्या बाभळगाव परिसरात रात्रीचा विद्युत पुरवठा होतो. ...पान २ वर

## सोनी ग्रामपंचायतीची निवडणूक रक्तरंजित झाली राष्ट्रवादीच्या पहिलवानाची विरोधकांनी हत्या केली

मिरज/क्राईम रिपोर्टर

आजकाल कुठल्याही निवडणुका शांततेने पार पडत नाहीत. प्रचारात काही ना काही तरी वाद होतो आणि त्यात दोन्हीकडच्या कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी होते, तर प्रचारात ज्याचा दबदबा असतो अशाच प्रतिस्पर्धी गटाकडून काटा काढला जातो. सोनी ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत सुद्धा असेच झाले. भावकीतल्या उमेदवाराचा प्रचार केला नाही म्हणून राष्ट्रवादीतील एका पहिलवानाचा त्याच्याच नात्यातील लोकांनी खून केला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.



मयत आकाश नरूटे



मिरज तालुक्यातील सोनी गावाच्या ग्रामपंचायतीची निवडणुक ऐन रंगात आली आहे. राष्ट्रीयकृत पक्षाबरोबरच स्थानिक आघाडीने ही निवडणुकीत भाग घेतली असल्याने प्रचाराला चांगलीच रंगत आली आहे. सोनी येथील आकाश नरूटे येथील तरूण हा पैलवानकी करीत असल्याने त्याची गावात ओळखी पाळखी जास्त आहेत. त्याची गावात तशी पत असल्याने जो तो आकाशने आपला प्रचार करावा असे म्हणत होता. गावात तो पैलवानकी करीत शेती करीत असल्याने त्याच्या घरची परिस्थीती ही सधन होती. त्याच्या शब्दाला किमंत होती. तो म्हणेल ती पूर्वी दिशा असेच होते. म्हणून काही जण त्याचा उपयोग करून घेऊ पाहत होते. त्याचा गावात दबदबा असल्याने ...पान २ वर

## महिलेला ब्लॅकमेल करणारे स्वत:च फसले गुन्हा दाखल होताच जेलमध्ये जाऊन बसले

जळगाव/क्राईम रिपोर्टर



आजच्या युगात महिलांना देखील पुरुषांच्या बरोबरीने स्थान मिळाले आहे. नोकरी व्यवसायात पुरुषांच्या बरोबरीने महिला देखील सरसावल्या असून त्यांची जीवनशैली बदलली आहे. त्यांच्या राहणीमानात बदल झाला आहे. आता तर लाचखोरी करण्यात काही महिला देखील पारंगत झाल्याचे दिसून येते. ज्याप्रमाणे पुरुष लाच अथवा खुशाली घेतात त्याप्रमाणे काही महिला देखील आता लाच अथवा खुशाली घेण्यासाठी सरावल्याचे चित्र दिसून येत आहे. लाच अथवा खुशाली मागण्यासह ती स्विकारण्याची सवय अंगवळणी पडत जाते आणि एके दिवशी संबंधीत व्यक्ती दुष्टचक्रात अडकते. संगत आणि संधीचा फायदा घेण्याची प्रवृत्ती नंतर सवयीचा भाग बनते.

जळगाव पंचायत समितीमधील रोजगार हमी योजनेच्या कामकाजाचे ऑनलाईन फिडींग करण्यासाठी एक महिला सन २००८ पासून कंत्राटी स्वरुपावर काम करत आहे. डाटा एंट्री ऑपरेटर पदावर काम करणारी ही महिला पतीपासून विभक्त राहते. पतीच्या त्रासामुळे आपण विभक्त रहात असल्याचे या महिलेचे ...पान २ वर

## समजावण्याचे सर्व प्रयत्न फोल ठरले पत्नीच्या यारालाच पतीने ठार मारले

सातारा (चाफळ)/क्राईम रिपोर्टर



मयत सीताराम

अनैतिक संबंधांचा शेवट ठरलेला असतो. कारण ज्याच्या कुटुंबातील बाईचे दुसऱ्याशी अनैतिक संबंध असतात, त्याच्या इज्जतीचा सवाल असतो. त्यामुळे तो कुठल्याही थराला जाऊ शकतो आणि कुठलाही पती किती जरी व्यसनी असला तरी आपल्या बायकोचे दुसऱ्याशी असलेले संबंध तो सहन करू शकत नाही. बहिरेवाडी गावातील नारायण मोडे हा दारुडा होता. त्याचाच गैरफायदा घेत त्याच्या पत्नीने दुसऱ्याशी संबंध जुळवले. मात्र नारायणला हि गोष्ट समजताच त्याने सुरुवातीला आपल्या पत्नीला आणि तिच्या प्रियकराला समजावून सांगितले. पण दोघेही जेंव्हा ऐकेनात तेंव्हा त्याने पत्नीच्या प्रियकराचा त्याच्या घरात घुसून जीव घेतला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.



चाफळ डेरवणयेथील ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या बहिरेवाडी येथे सीताराम देसाई हा आपली पत्नी संगिता आणि दोन मुलासह राहयला आहे. तो वडापचा व्यवसाय करीत असल्याने त्याच्या हातात कायम पैसे खुळखुळत असायचे. त्याने गावात एक घर बांधले होते. तर गावाबाहेर असणाऱ्या आपल्या शेतामध्ये एक घर वजा जनावरांचा गोठा बांधला होता. त्या गोठ्यात तो रात्री एकटाचा झोपायला जात होता. त्याच्या घरची परिस्थीती ही सधन होती.त्याच्या घरची थोडीफार शेती व एक दोन जनावरे असल्याने त्यातून त्याला उत्पन्न मिळत होते. त्यातच तो रिक्षा वडापचा धंदा करीत असल्याने त्याची ती वरकमाई होती.त्याला बायकांचा नाद होता. कुठली बाई चालू वाटली की तो तिला आपल्या नादी लावीत होता. यातूनच त्याचे नारायण मोडे याची पत्नी सुनिता हिच्याशी संपर्क आला होता. सुनिता ही तशी चालू आणि बाहेरख्याली ...पान ६ वर

## पतीला ठार मारून हार्टफेलचा बनाव केला अखेर फोन कॉलमुळे खुनाचा उलगडा झाला

चंद्रपूर/क्राईम रिपोर्टर



मयत शाम रामटेके

कुठलाही गुन्हा कधीच लपून राहत नसतो. कधीना कधी तो उघडकीस येतो आणि सध्याच्या मोबाईल फोनच्या जमान्यात तर गुन्हेगार कितीही शातीर असला तरी गुन्हा करताना त्याने मोबाईल वापरला तर तो १०० टक्के पकडला जातो. चंद्रपूर शहरात एका महिलेचे दुसऱ्या पुरुषाशी अनैतिक संबंध होते, पण त्यात पतीचा अडसर येत असल्याने तिने रात्री पतीला झोपेच्या १० गोळ्या देऊन अगोदर बेशुद्ध केले आणि नंतर त्याच्या तोंडावर उशी दाबून त्याला ठार मारले आणि हे सर्व केल्यावर तिने पती हृदय विकाराच्या झटक्याने मेल्याचे आपल्या विवाहित मुलीना सांगितले. पण तिने एक चूक केली होती. पतीला ठार मारल्यानंतर प्रियकराला फोन करून पतीला कसे ठार मारले ते सांगितले होते आणि हाच कॉल त्या मोबाईलमध्ये रेकॉर्ड झाला होता आणि एकेदिवशी तिच्या मुलीच्या हाती लागला. त्यानंतर मुलीने आपल्या आईच्या पापाची पोलिसांना माहिती देताच पोलिसांनी तिला आणि तिच्या प्रियकराला अटक केली.



आरोपी मुकेश | आरोपी रंजना

सध्या मोबाईल युग सुरु आहे. या मोबाईलमुळे अनेक कठीण कामे सोपी झाली. घरबसल्या इकडचे पैसे तिकडे आणि तिकडचे पैसे इकडे करणे या मोबाईलमुळे शक्य झाले आहे. महत्वाचा निरोप धावपळ न करता एका क्षणात संबंधीत व्यक्तीला पाठवण्यासाठी देखील या मोबाईलचा उपयोग होत असतो. अशा एक ना अनेक कामासाठी हा मोबाईल महत्वाचा आहे. मात्र काळानुसार या मोबाईलचा दुरुपयोग देखील वाढला आणी विविध प्रकारच्या गुन्हेगारीने जन्म घेतला. एका ऑडीओ कॉल रेकॉर्डींगमुळे चंद्रपूर शहरात काही दिवसांपुर्वी एक हत्या उघडकीस आली. शाम पांडुरंग रामटेके हे ६६ वर्ष वयाचे गृहस्थ चंद्रपूर शहरातील गुरुदेवनगर, ब्रह्मपुरी परिसरात रहात होते. वन विभागात कारकुन पदावरुन रामटेके सेवानिवृत्त झाले होते. पत्नी रंजना आणि दोन मुली असा त्यांचा चौकोनी संसार होता. सेवानिवृत्तीनंतर ...पान ६ वर

19 TO 25 DECEMBER 2022 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 12/17/2022 8:12 PM Page 1



## पान १ वरून....

### वारकऱ्यांना कधी कळणार संतांच्या...

महाराष्ट्रात सध्या महापुरुषांच्या बदनामीची चढाओढ लागलेली आहे. राज्यपाल पदावरचा माणूस शिवाजी महाराज, ज्योतिबा फुले यांचा अपमान करतोय त्याच्या विरुद्ध भाजपवाले काही बोलायला तयार नाहीत. त्याला वाचवण्याचा प्रयत्न करीत आहे. राज्यातला एक मंत्री चंद्रू पाटील फुले-आंबेडकर भिक मागून शिकले असे म्हणतोय त्याच्या विरुद्ध भाजपवाले बोलायला तयार नाहीत. पण त्याच्या थोबाडावर शाई फेकनाऱ्यला घरात घुसून मारण्याची धमकी दिली जातेय. भाजपवाल्यांना सत्तेचा माज आलाय. सुषमाने त्यांचे कपडे फाडून तो माज उतरवण्याचा प्रयत्न केला म्हणून त्यांच्या विरोधात वारकऱ्यांना उभे करण्यात आले. एक बाई तुम्हाला आव्हान देतेय तिच्याशी विचाराने मुकाबला करण्याची हिम्मत भाजपच्या लोकांमध्ये नाही म्हणून वारकऱ्यांची ढाल करून सुषमाचा मुकाबला करण्याचा केविलवाणा प्रयत्न भाजपच्या लोकांकडून सुरु आहे. अशावेळी वारकऱ्यांना कळायला हवे कि एका बाईच्या विरोधात आपण टोकाची भूमिका घेऊन या मराठी मातीतील संतांच्या शिकवणीचा अपमान करतोय. महाराष्ट्राने महिलांचा अपमान कधीही सहन केलेला नाही. सुषमाने चुकी नसतानाही माफी मागितली आहे. एवढेच नव्हे तर आपण कबीर पंथी असून माझ्या कुटुंबातील मंडळी वारकरी आहेत. ते पायी वारी करतात. माझ्यावर संतांच्या शिकवणीचा प्रभाव आहे असे सांगून त्यांनी तुकाराम महाराजांच्या अभंगातील काही उद्बोधक ओळीही वाचून दाखवल्या. सुषमाचा संत साहित्याचा अभ्यास आहे. भाजपच्या चिथावणीवरून जे वारकरी सुषमाच्या विरोधात आवाज उठवत आहेत त्यांनी संत साहित्यावर सुष्मांशी चर्चा करावी आणि विचारांचा मुकाबला विचारांनी करावा. पण तसे न करता केवळ कुणाच्या तरी चिथावणीने सुषमाला वारकरी संप्रदाय मारण्याची भाषा करीत असेल तर इथल्या दलित मागास्वर्गीयानी हातात बांगड्या भरलेल्या नाहीत. सुषमाच्या संरक्षणासाठी संपूर्ण दलित समाज तसेच भाजपच्या विरोधात असलेला विचारवंत हिंदू कुणाशीही दोन हात करायला तयार आहे. संत महात्म्यांची महान शिकवण समाजापर्यंत पोचवणारे दूत म्हणून आजवर महाराष्ट्राने वारकऱ्यांचा आदर केला. पण कुठल्याही जाती धर्माच्या महिलेचा अपमान महाराष्ट्र सहन करणार नाही, जे कुणी असतील त्यांना जशास तसे उत्तर दिले जाईल हे सुषमाला मारण्याची धमकी देणाऱ्यांनी ध्यानात ठेवावे.

### मुलगी झाली होती डोक्याला...

जन्मदात्या बापानेच आपल्या पोटच्या लेकीला फाशी देऊन तिची हत्या केली आहे. विशेष म्हणजे प्रेताची विल्हेवाट लावण्यासाठी मुलीचा मृतदेह पेटवून दिला असल्याचे देखील पोलिसांच्या तपासात समोर आले आहे. या घटनेने जालना जिल्हा हादरला आहे. सूर्यकला उर्फ सुरेखा सरोदे अशी मृत मुलीचे नाव असून, संतोष सरोदे हत्या करणाऱ्या वडिलाचे नाव आहे. सोबतच हत्या करण्यासाठी मदत करणाऱ्या संतोष यांचा भाऊ नामदेव सरोदे याच्यावर देखील पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मयत तरुणी सूर्यकला ही तीन दिवसापूर्वी घरात कुणालाही काहीही न सांगता घरातून निघून गेली होती. दरम्यान अनेक ठिकाणी तिचा शोध सुरु असतानाच, सूर्यकला पुन्हा घरी परतली. घरी आल्यावर तिची विचारपूस केली असता, सूर्यकला एका जवळच्याच नातेवाईकाच्या मुलाबरोबर पळून गेली असल्याचं तिच्या वडिलांना समजलं. त्यामुळे याचा संतोष सरोदेला प्रचंड राग आला.

### मेव्हण्याबरोबरच्या भांडणाचे निमित्त ...

उचलत नसल्याने शेळके यांनी भुईगड यांच्या खोलीचा कुलूप तोडून घर उघडले असता त्यांना धक्काच बसला. भुईगड यांचा फोन बंद असल्याने शेळके यांनी त्यांचा घराचा दरवाजा तोडून आत प्रवेश केला. यावेळी घरातील गृहोपयोगी साहित्य गायब होते. तर घरातील किचन ओट्याखाली खोदकाम करुन तो सिमेंट-वाळूने बंद केलेला आणि त्यावर शेंदूर लावलेले दोन दगड आणि लिंबू ठेवलेले दिसून आल्याने शेळके यांना संशय आला. त्यामुळे त्यांनी खोदकाम सुरु केले. यावेळी त्यांना एका चादरीत मिठात गुंडाळलेला कुजलेला मृतदेह दिसल्याने शेळके यांना धक्काच बसला. त्यांनी याची माहिती तात्काळ वाळूज पोलिसांना दिली. घटनास्थळी दाखल होऊन वाळूज पोलिसांनी पंचनामा केला. शेळके यांनी घराचा दरवाजा उघडला असता, त्यांना घरातील किचन ओट्याखाली खोदकाम करुन तो सिमेंट-वाळूने बंद केलेला आढळलं. विशेष म्हणजे त्यावर शेंदूर लावलेले दोन दगड आणि लिंबू ठेवलेले दिसून आले आहेत. त्यामुळे हा सर्व प्रकार नरबळीचा असल्याचा संशय पोलिसांना आहे. मात्र जोपर्यंत काकासाहेब भुईगड आणि त्याचे कुटुंबातील सदस्य पोलिसांना मिळत नाही, तोपर्यंत याबाबत अधिकृत कोणताही खुलासा होऊ शकलेला नाही. औरंगाबाद येथील वाळूज येथील समता कॉलनीमध्ये आढळलेल्या मृतदेहाचं गुढ उकललं आहे. हा प्रकार नरबळीचा नसून भाडेकरूने पत्नीच्या भावाबरोबर असलेल्या वादामुळे हत्या करून घरातच मृतदेह पुरल्याचं समोर आलंय. वाळूज येथील समता नगर भागातील घरमालक सूर्यकांत शेळके यांच्या घरात किचनवट्याखाली एक शेंदूर लावलेला दगड आढळल्यानंतर पोलिसांनी तपास केला. यावेळी या खोलीत भाड्याने राहणाऱ्या भाऊसाहेब भुईगळ याला ताब्यात घेतले असता पोलिसांच्या चौकशी अंती ही बाब उघडकीस आलीय. मयत महिला ही आरोपीची पत्नी असून तिचा आजारपणामुळे मृत्यू झाल्याचा शवविच्छेदनाचा प्राथमिक अहवाल आला आहे. परंतु, पत्नीच्या भावाचा लग्नाला विरोध असल्याने मृत्यूमुळे तिच्या भावापासून धोका निर्माण होईल म्हणून आरोपीने तिचा मृतदेह घरातच पुरला, अशी माहिती वाळूज पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सचिन इंगोले यांनी दिली.

### वृद्धाला निर्घुणपणे ठार मारून...

त्यामुळे पिकांना पाणी देण्यासाठी शेतकऱ्यांना रात्री शेतात जावे लागते. बशीर सुद्धा पिकांना पाणी देण्यासाठी रात्री शेतात जात असत. सोमवारी रात्री ते नेहमीप्रमाणे बॅटरी घेऊन लुना दुचाकीवरुन शेताकडे गेले. मात्र दुसऱ्या दिवशी सकाळ झाली, तरी ते घरी परतले नाही. त्यामुळे कुटुंबीयांना काळजी वाटू लागली. घरच्यांनी त्यांना शोधण्याचा प्रयत्न केला, पण त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही. शेतात लूना तशीच होती. त्यामुळे कुटुंबीय आणखी बुचकळ्यात पडले. त्यांनी शेताच्या आसपास आणि नातेवाईकांकडे विचारपूस केली. मात्र काहीच पत्ता लागला नाही. मात्र दोन दिवसांनी बशीर यांच्या शरीराचे तुकडे शेतात आढळून आले. हात, पाय आणि मुंडके धडावेगळे होऊन विविध ठिकाणी पडले होते. हे शरीराचे तुकडे पाहून पोलिसांना याची माहिती देण्यात आली. पोलीस घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला. तर आज दुपारी बशीर यांचे धड शेजारच्या शेतात विहिरीच्या भऱ्यावर आढळून आले. कायदेशीर प्रक्रिया करून बशीर यांच्या शरीराचे तुकडे कुटुंबियांच्या स्वाधीन करण्यात आले. या प्रकरणी लातूर ग्रामीण पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. बशीर शेख यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, दोन मुले, दोन सूना, नातवंडे असा परिवार आहे. या घटनेमुळे बाभळगाव पंचक्रोशीत एकच खळबळ उडाली असून हळहळ व्यक्त केली जात आहे. बशीर मदारी शेख यांचा मृतदेह ज्या पद्धतीने तुकड्या तुकड्यात सापडला त्यावरून हा खून होता की हिंस्र पशूने हल्ला करून त्यांना आपले खाद्य बनविले अशा शंका कुशंकांना उधाण आले होते. त्यामुळे वन्य जीव विभागाचे पथकाने ही घटनास्थळाची पाहणी केली. मात्र प्राथमिक अंदाजानुसार बशीर यांचा खून झाला असावा असा अंदाज बांधण्यात येत आहे. ७१ वर्षीय बशीर यांचा स्वभाव अगदी मनमिळावू वृत्तीचा होता. त्यांचे कधी कोणाशी भांडण झाले नाही. त्यामुळे त्यांचा खून का झाला असावा असा प्रश्न ग्रामस्थांनाही पडला असल्याचे बाभळगावचे ग्रामस्थ माने यांनी सांगितले.

### सोनी ग्रामपंचायतीची निवडणूक ...

तो ज्याचा प्रचार करतो तो निवडणुक जिंकतोच अशी चर्चा होती. तो राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा कार्यकर्ता असल्याने तो आपल्या पक्षाच्या उमेदवारचा प्रचार करीत होता. गावात नरूटे याची भाऊबंदकी जास्त असल्याने उत्तम नरूटे या त्यांच्या भाऊबंदकीतील तरूणाने आपल्या समाजातील एकाला आपल्या वार्डातून उभे केले होते.त्यामुळे उत्तम याने पै.आकाश याला आपल्या उमेदवाराचा प्रचार कर. त्याला निवडून आणूया असे सांगितले होते. परंतु पै.आकाश हा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या उमेदवारचा प्रचार करीत असल्याने उत्तम याला त्याचा राग आला होता. त्याने एकदा दोनदा आकाश याला आपल्या घरी बोलावून चार गोष्टी समजूतीच्या सांगितल्या होत्या. तरी ही आकाशने त्याचे काही ऐकले नव्हते. तो त्याला म्हणाला होता की मी माझ्या पक्षाचा कट्टर कार्यकर्ता असल्याने मला माझ्या उमेदवाराचा प्रचार करणे बंधनकारक आहे तुम्ही मला जबरदस्ती करू नका. त्याने आपल्या उमेदवाराचा प्रचार करण्यास नकार दिल्याने उत्तम याला आकाशचा भयंकर राग आला होता. त्याने आपले जवळचे मित्र दत्ता कदम आणि सम्मेद चौगुले यांना बरोबर घेऊन परत एकदा दोन तीन दिवसांनी पै. आकाश याला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी ही आकाश याने त्याचे काही एक ऐकले नव्हते. त्यावेळी उत्तम याने आकाश याला तु जर आमचे ऐकला नाहीस तर तुला जिवंत ठेवत नाही अशी सरळ सरळ धमकी दिली होती. त्याच्या या धमकीला आकाश हा घाबरणारा नव्हता. उलट त्याने तुला काय करायचे ते कर जा.आता तर मी माझ्या उमेदवाराला निवडुणच आणतो की नाही बघ असे ओपन चॅलेज देऊन सांगितले होते. त्यामुळे उत्तमच्या जखमेवर त्याने मीठ चोळल्यासारखेच होते. मतदानाची जशी तारीख जवळ येऊ लागली होती तस तशी आकाशच्या उमेदवारचे पारडे जड होऊ लागले होते. त्यामुळे उत्तम नरूटे आणि त्याच्या सहकार्याच्या पाया खालची वाळूच सरकत चालली होती. ते जास्तच बिथरले होते. त्यातच आकाश हा काही सांगून ऐकत नाही म्हणून त्याला कुठे तरी अडचणीत आणायचे म्हणून उत्तम याने मागे एकदा आकाशने एका मुलीची छेड काढल्याचे प्रकरण उकरून काढले.त्याला त्या प्रकरणातून तो बदनाम करू पाहत होता. त्याला ही ती आयीतच संधी चालून आली होती. त्या मुलीच्या प्रकरणात ही उत्तम आणि आकाश हे दोघे परस्पर भिडले होते. त्यावेळी ही आकाशने उत्तम याला मात दिली होती. तो खरा पैलवानच होता. त्यामुळे त्याला पैलवानकीच्या डावातील आणि राजकारणातील डावातील फरक चांगलाच कळाला होता. त्यामुळे त्याने उत्तम याने हे प्रकरण उचलून धरल्यावर ही त्याचेवर त्याने मात केली होती.याचा राग ही उत्तमच्या मनात होता. आपला भाऊबंद असून ही आकाश हा काही आपले ऐकत नाही त्याला आता सरळ केलेच पाहिजे असा त्याने विचार केला. थोडक्यात त्याने कुठला विषय कुठे तरी नेऊन ठेवला होता. निवडणुकीच्या राजकारणात त्याने हा विषय उकरून काढल्याने आकाशच्या मनात ही त्याच्या विषयी राग निर्माण झाला. या निवडणुकीच्या धामधुमीत आकाश हा सोमवार दि.१३ डिसेंबर रोजी सायंकाळी सात वाजता आपल्या घरातून आपल्या उमेदवाराचा प्रचार करण्यासाठी बाहेर पडला. तो मतदारांच्या गाठी भेठी घेत परत घराकडे आला. त्यानंतर तो आपली दुचाकी गाडी घेऊन सोनी भोसे रस्त्यासवरील कुरली येथे येऊन थांबला.तेथे तो आपल्या एका मित्राची वाट पाहत उभा असताना तेथे उत्तम नरूटे हा आला. त्यावेळी रात्रीचे ८.३० वाजले होते. उत्तम याने आकाशला चल तुझ्याशी जरा बोलायचे आहे म्हणत सोनी करोली रस्त्यावरली न्यु इंग्लिश स्कुलच्या मागे आणले. तेथे अगोदरच दत्ता कदम आणि सम्मेद चौगले हे दोघेजण होते. ते तिघे जण होते तर आकाश हा एकटाच होता. त्याचेत वाद चालू झाला होता. ते तिघेजण आकाशच्या अंगावर मारायला जात होते. त्यावेळी त्याने आपल्या ताकदीने दोघांना बाजुला ढकलून दिले.आकाश हा काही त्यांना ऐकण्यासारखा नव्हता. तो पैलवानकी करीत असल्याने अंगाने धष्टपुष्ट होता. ते दोघे ही उठत असताना उत्तम याला आकाशचा भयंकर राग आला. यावेळी उत्तम याने आपल्याकडील कोयता काढून आकाशच्या डोक्यावर, मानेवर छातीवर सपासप वार केले. त्याच्यावर वार होत असताना त्या ही स्थिती आकाश हा त्याच्या तावडीतून निसटून जाण्याचा प्रयत्न करीत होता. पण त्यात त्याला यश आले नाही. काही अंतरावर तो गेला असताना उत्तम आणि त्याच्या दोघा मित्रांनी त्याला परत पकडले. त्याचेवर पुन्हा कोयत्याने वार केले. हे वार जवळपास १४ वेळा केले असल्याने तो रक्ताच्या थारोळ्यात खाली पडला. त्याच्या शरीरातून रक्ताच्या धारा लागल्या होत्या. तो वाचवा वाचवा म्हणून ओरडत होता. पण ती जागाच गावापासून काही अंतरावर लांब असल्याने तेथे कुणी ही नव्हते.त्याचे ओरडणे आणि किचांळणे निरर्थक होते. त्याचेवर वार करीत असताना उत्तम नरूटे हा बेभान झाला होता. त्याच्या डोक्यात फक्त आकाशला संपवायचे एवढाच विषय होता. पुढे काय होईल ते होईल असा त्याने विचार केला होता. त्याच्या कपडयावर ही रक्ताचे डाग पडले होते. तो खाली पडून तडफडत असताना त्यातच त्याचा मृत्यू झाला. त्याचा आपल्या हातून खून झाला आहे हे बघून त्यांनी घटनास्थळावरून आपली बाईक घेऊन पळ काढला. इकडे उशिरा गेलेला आकाश का घरी परत आला नाही म्हणून त्याच्या घरच्या लोकांनी त्याच्या मोबाईलवर संपर्क साधला असता त्याचा मोबाईल ही बंद येत होता. त्यामुळे त्यांना वेगळीच शंका येत होती. निवडणुकीमुळे गावातील वातावरण आधीच गढूळ झाले होते. त्यातच उत्तम याने आकाशला दिलेली धमकी त्यांना ही माहित होती. म्हणून त्याच्या घरच्या लोकांनी त्याचा शोध घ्यायला सुरूवात केली. त्याचवेळी त्याच्या घरच्या लोकांना समजले की आकाश याला रात्री ८.३०च्या दरम्यान उत्तम नरूटे याने न्यु इंग्लिश स्कुलकडे नेले आहे. त्यावरून त्याच्या घरच्या लोकांनी आणि शेजाऱ्यांनी न्यू इंग्लिश स्कुलच्या मागे जावून पाहिले असता त्यांना मोकळ्या मैदानात आकाशची दुचाकी गाडी दिसली. तर पुढे काही अंतरावर आकाश हा रक्ताच्या थारोळ्यात जमीनीवर पालथा पडला असल्याचे दिसले. त्याच्या डोक्यावर मानेवर, छातीवर धारदार हत्याराने वार केल्याचे दिसत होते.ही बातमी गावात समजताच घटनास्थळी गर्दी होऊ लागली. निवडणूकीच्या वादातून हा खून झाल्याची चर्चा घटनास्थळी होऊ लागली होती. कुणी तरी या घटनेची माहिती मिरज ग्रामीण पोलीसांना दिल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. या घटनेची माहिती मिळताच वरिष्ट पोलीस अधिकारी ही घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पोलीसांना तपासाच्या योग्य त्या सुचना दिल्या. घटनास्थळाचा आणि घटनेचा पंचनामा पोलीसांनी करून मृतदेह शवविच्छेदनासाठी मिरज येथील शासकीय रुग्णायलयात पाठवून देण्यात आला. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना ही घटना कोणत्या कारणातून आणि कुणी केली आहे याचा अंदाज पोलीसांना आला होता. घटनास्थळावरून संशयीत आरोपी पळून गेले असल्याने त्याचा शोध पोलीसांनी सुरू केला. ही घटना निवडणुकीच्या वादातून घडली असल्याने पोलीसांनी गावातील अनेकांची धरपकड केली होती. त्याचेकडे या घटनेची चौकशी करीत असताना त्यांना उत्तम नरूटे, दत्ता कदम, सम्मेद चौगुले याची माहिती मिळाली होती. पोलीस त्याचा शोध घेत असताना त्याच्या मोबाईलचे लोकेशन त्याना मिरज परिसरात सापडत होते. त्यावरून पोलीसांनी तातडीने हालचाल करीत त्याना ताब्यात घेतले. त्यांना पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता ते पोलीसांना थातूर मातूर सांगून त्याच्या तपासाची दिशा बदलत होते. पोलीसांनी त्यांना बोलते केले असता त्यांनी आपल्या गुन्हयाची कबुली दिली. मयत आकाश नरूटे याच्या भावाने दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी मिरज ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये पै.आकाश माणिक नरूटे (वय २५) याच्या खून प्रकरणी उत्तम अशोक नरूटे, दत्ता संभाजी कदम, सम्मेद शांतीसागर चौगुले रा.सर्वजण भोसे. याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२,३२ सह गुन्हा दाखल करून त्याना बुधवार दि.१४ रोजी मा.न्यायालयासमोर उभे केले असता मा.न्यायालयाने त्याना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनवली.पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेला कोयता व दोन दुचाकी जप्त केल्या. या घटनेचा पुढील तपास मिरज ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस करीत आहेत. राजकारणात गल्लीत गोंधळ आणि दिल्लीत मुजरा असे नेत्यांचे असते पण डोकी मात्र सर्वसामान्य कार्यकर्त्यांची फुटतात हेच या घटनेवरून दिसून येते. ही घटना राजकारणातून घडली आहे की याला मागील भांडणातील कारण काही आहे याचा तपास पोलीस करीत आहेत. परंतु सकृत दर्शनी प्राथमिक माहितीवरून ही घटना निवडणुकीच्या वादातूनच घडली असल्याचे बोलले जात आहे.

### महिलेला ब्लॅकमेल करणारे स्वतःच ...

म्हणणे आहे. हा तिचा व्यक्तिगत प्रश्न आहे. तिच्याकडे आलेल्या प्रत्येक कामाचे संबंधीताकडून प्रत्येकी एक हजार रुपये लाच अथवा खुशालीच्या स्वरुपात ती महिला कर्मचारी घेत होती अशी चर्चा आहे. तिच्या या तक्रारी दिवसेंदिवस वाढत होत्या असेही म्हटले जाते. एके दिवशी तिची तक्रार राजेंद्र निकम नावाच्या एका यु ट्युब चालवणाऱ्या तरुणाकडे आली. क्राईम इन्व्हेस्टीगेशन न्युज या नावाने राजेंद्र निकम हा तरुण यु ट्युब चॅनल चालवतो असे म्हणतात. कामाच्या बदल्यात त्या महिलेला एक हजार रुपये खुशाली स्वरुपात देण्याचा व्हिडीओ तयार करण्याचे राजेंद्र निकम याने मनाशी ठरवले. त्या व्हीडीओच्या बळावर त्या महिलेस ब्लॅकमेल करण्याची पुढील रणनिती त्याने आखली. याकामी ७ ऑक्टोबर २०२२ चा दिवस आणि दिड वाजेची वेळ निश्चित झाली. राजेंद्र निकम याने त्याचा साथीदार महेंद्र सोनवणे आणि इतरांना सोबत घेत ती महिला कर्मचारी काम करत असलेले कार्यालय गाठले. कुणी कुठे उभे रहायचे, छुपी व्हिडीओ शुटींग कुणी करायची? कोणत्या अँगलने करायची, कुणी काय बोलायचे, एक हजार रुपये देतांना व घेतांनाचा क्षण मोबाईलमधे कसा टिपायचा हे सर्व निश्चित झाले. ठरल्याप्रमाणे दुपारी दिड वाजेच्या सुमारास सर्व जण ती काम करत असलेल्या कार्यालयात गेले. राजेंद्र निकम आणि महेंद्र सोनवणे हे दोघेजण थेट त्या महिला कर्मचाऱ्याच्या टेबलजवळ गेले. यापुर्वीच एकाने त्याच्या शर्टाच्या खिशात ठेवलेल्या मोबाईलने व्हिडीओ शुटींग सुरु केली होती. महिला कर्मचाऱ्याजवळ आलेल्या दोघांनी आपण क्राईम इन्व्हेस्टीगेशन या युट्युब चॅनलचे रिपोर्टर आहोत अशी ओळख दिली. मी तुमच्या पतीचा लांबचा नातेवाईक आहे अशी अधिकची ओळख महेंद्र सोनवणे याने बोलतांना दिली. बोलण्याच्या ओघात महेंद्र सोनवणे याने एक हजार रुपये त्या महिलेच्या हातात शिताफीने दिले. त्या महिलेने देखील हसत हसत ती रक्कम हुशारीने आपल्या पर्समधे ठेवली. या घटनेचे व्हिडीओ शुटींग जवळच उभ्या असलेल्या त्यांच्या साथीदाराने व्यवस्थित केले होते. एक हजार रुपये देण्याघेण्याचा कार्यक्रम झाल्यानंतर सर्वजण बाहेर आले. काही वेळातच या टोळीतील तिन जण पुन्हा त्या महिलेकडे आले. एक हजार रुपयांच्या बदल्यात तिने त्यांचे काम पटकन केले होते. तुमचे काम झाले आहे असे तिने आलेल्या तिघांना कथन केले. मॅडम तुमच्याकडे एक महत्वाचे काम आहे, थोडे बाजुला या असे एकाने त्या कंत्राटी महिला कर्मचाऱ्याला म्हटले. त्यामुळे ती महिला खुर्चीवरुन उठत त्यांच्यासोबत कार्यालयाच्या बाहेर आली. त्याठिकाणी राजेंद्र निकम, महेंद्र सोनवणे आणी इतर दोघे जण उभे होते. मॅडम... एक हजार रुपये घेतांना तुमचा व्हिडीओ आम्ही तयार केला आहे. आपण अँटी करप्शन विभागाचे अधिकारी - कर्मचारी असल्याची बतावणी राजेंद्र निकम याने त्या महिलेकडे केली. आमची टीम बाहेर दडून बसली आहे. तुम्ही आत्ताच्या आता आम्हाला पंचविस हजार रुपये द्या नाहीतर गुन्हा दाखल करतो आणि हा व्हिडीओ देखील व्हायरल करतो असा सज्जड दम राजेंद्र निकम याने त्या महिलेस दिला. आतापर्यत एक हजार रुपये मिळाल्याच्या खुशीत असलेली ती महिला एका क्षणात रडकुंडीला आली. दादा...आता माझ्याकडे एवढे पैसे नाहीत. मी नातेवाईकांकडून घेवून तुम्हाला देते अशी विनवणी तिने सुरु केली. तिने हात जोडून विनवणी करत लवकरच पैशांची व्यवस्था करण्याचे आश्वासन सर्वांना दिले. त्यामुळे सर्वांनी तेथून काढता पाय घेतला. त्यानंतर दुपारी तिन वाजता राजेंद्र निकम याने तिला फोन केला. पैसे घेण्यासाठी केव्हा येवू अशी त्याने फोनवर तिला विचारणा केली. दादा मी सायंकाळी सहा वाजेपर्यत ऑफीसला असते. ऑफीसमधून बाहेर आल्यावर तुम्हाला कॉल करते असे तिने त्याला म्हटले. दरम्यानच्या कालावधीत तिने एका परिचिताकडून विस हजार उधार घेतले. सायंकाळी सव्वा सहा वाजता तिला पुन्हा राजेंद्र निकम याचा फोन आला. पैशांची व्यवस्था झाली का? अशी त्याने तिला विचारणा केली. आमचे अधिकारी गुन्हा दाखल करण्यासाठी सांगत आहेत. लवकर काय ती व्यवस्था करा आणि पैसे घेवून महामार्गावर आशय हॉस्पीटलजवळ या अशी तंबी त्याने दिली. घाबरलेल्या त्या महिलेने सायंकाळी साडे सात वाजेच्या सुमारास महामार्गावरील दवाखान्याचे नियोजीत ठिकाण गाठले. त्याठिकाणी राजेंद्र निकम आणि महेंद्र सोनवणे हे दोघे हजर होते. परिचिताकडून उधार आणलेले विस हजार तिने दोघांना दिले. विस हजार रुपये ताब्यात घेत इतकेच कसे? बाकीचे केव्हा देणार अशी विचारणा दोघांनी तिला केली. माझ्याकडे आता एवढेच पैसे आहेत. मी पैसे आले की तुम्हाला देते अशी विनवणी तिने सुरु केली. पण माझा तो व्हिडीओ व्हायरल करु नका अशी विनवणी तिने दोघांना केली. त्यानंतर सर्वजण तेथून निघून गेले आणि त्या दिवसाचा एपीसोड त्याठिकाणी संपला. त्यानंतर १० ऑक्टोबरचा दिवस उजाडला. या दिवशी सकाळीच तिने राजेंद्र निकम यास फोन करुन तो व्हिडीओ डिलीट केला का अशी विचारणा केली. पलीकडून राजेंद्र निकम याने तिला म्हटले की तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवा मात्र आज राहिलेले पैसे देवून टाका. आज आम्ही तुमच्या ऑफीसला येतो आज आम्हाला पाच हजार रुपये लागतील नाहीतर गुन्हा दाखल होईल. पलीकडून मिळालेल्या धमकीचा तिने अंदाज घेत पैशांची व्यवस्था सुरु केली. ऑफीसला जाण्यापुर्वीच कुठूनतरी पाच हजार रुपयांची व्यवस्था तिने केली. ठरल्याप्रमाणे साडे दहा वाजता राजेंद्र निकम तिच्या ऑफीसमधे आला. तिने देखील त्याला राहिलेले पाच हजार रुपये मुकाट्याने देवून टाकले. सहजासहजी राहिलेले पाच हजार रुपये मिळाल्यानंतर राजेंद्र निकमचे मन लालची बनले. तिच्याकडून वारंवार पैसे मागण्याची लालसा त्याच्या मनात निर्माण झाली. आता मला दरमहा पैसे द्यावे लागतील असे त्याने तिला बजावले. काकुळतीला येत तिने त्याला म्हटले की मी याठिकाणी कंत्राटी नोकरी करते. माझा पगार जास्त नाही. मी कुठून दरमहिन्याला पैसे देवू. त्यावर त्याने तिला म्हटले की मी ग्रामीण भागातील लोकांची कामे घेवून येईल. ती कामे माझ्या मध्यस्तीने करुन द्यावी लागतील. एवढे बोलून तो निघून गेला. आता राजेंद्र निकम यास व्हिडीओच्या बळावर तिच्याकडून पैसे उकळण्याचा जणू काही नाद लागला होता. ११ ऑक्टोबर रोजी त्याने तिला फोनवर दम दिला. माझा माणूस आज तुमच्याकडे येणार आहे. त्याला विस हजार रुपये द्यावे लागतील. फोनवर त्याने दिलेला दम बघून तिला स्वत:वरच चिड आली. कुठून त्याच्याकडून एक हजार रुपये घेतले आणी या जाळ्यात फसले असे तिला वाटू लागले. आता यातून आपली सुटका कशी होईल असा ती मनाशी विचार करु लागली. ठरल्यानुसार राजेंद्र निकम याने पाठवलेला इसम तिच्याजवळ आला. तिने त्याला विस हजार रुपये देवून टाकले. विस हजार रुपये घेतल्यानंतर आलेला अनोळखी इसम निघून गेला. तिने आतापर्यत एकुण पंचेचाळीस हजार रुपये राजेंद्र निकम यास दिले होते. त्यानंतर १५ ऑक्टोबरच्या सकाळी एक अनोळखी इसम थेट तिच्या घरीच आला. तुम्हाला राजेंद्र निकम यांनी आंबेडकर मार्केटमधे भेटण्यासाठी बोलावले आहे असा निरोप त्याने तिला दिला. आता का बोलावले असा विचार करत तिने दिड वाजता जळगाव शहरातील आंबेडकर मार्केट गाठले. भर दुपारी राजेंद्र निकम याने तिला मार्केटच्या एका कोपऱ्यातील एकांतात नेले. यावेळी त्याने आपली पातळी सोडून तिच्यासोबत बोलणे सुरु केले. मला आणखी पैसे दे नाहीतर माझ्यासोबत एक रात्र झोप असे तो तिला निर्लज्जपणे म्हणाला. त्याचे शब्द ऐकून जणू काही पायाखालची जमीनच सरकली असा तिला भास झाला. ती विचारात पडली आणि मनातल्या मनात रडू लागली. काय करायचे ते लवकर सांग असे एकेरी भाषेत तो तिला म्हणाला. त्याने तिचा हात धरुन तिला आपल्या अंगावर ओढून घेत तिचा विनयभंग केला. तिने ओरडण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याने तिला व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देत गप्प केले. तिने एक हजार रुपये घेतल्याचा व्हिडीओ राजेंद्र निकम याच्यासाठी जणू काही बेअरर चेक झाला होता. कधीही मनाला वाटली ती रक्कम तो तिला मागण्यास मागे पुढे बघत नव्हता. आता तिचा विनयभंग करण्यास देखील तो घाबरत नव्हता. त्याची भिड जणू काही चेपली होती. घाबरलेल्या अवस्थेत ती पायी पायी घरी जाण्यास निघाली. वाटेत तिला एक नातेवाईक भेटला. त्या नातेवाईकाला तिने सर्व प्रकार कथन करुन आपले मन हलके केले. त्या नातेवाईकाने तीला धीर दिला. राजेंद्र निकम व त्याच्या साथीदारांविरुद्ध जिल्हापेठ पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल करण्याचा सल्ला देखील तिला देण्यात आला. क्राईम इन्व्हेस्टीगेशन न्युज रिपोर्टर म्हणवणाऱ्या राजेंद्र निकम, महेंद्र सोनवणे आणि त्याच्या तिघा साथीदारांविरुद्ध त्या महिलेने जिल्हापेठ पोलिस स्टेशनला फिर्याद दाखल केली. तिने दिलेल्या फिर्यादीनुसार भाग ५ गु.र.न. ५७६/२२ भा.द.वि. ३५४ अ, ३५४, ३८४, ३८५, १७०, १२० ब आणि ५०९ या कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिस उप निरीक्षक गणेश देशमुख यांच्याकडे या गुन्ह्याचा आला. बरेच दिवस हुलकावणी देणाऱ्या राजेंद्र निकम आणि महेंद्र सोनवणे या दोघा खंडणीखोरांना अखेर अटक करण्यात आली. दोघे जण सध्या न्यायालयीन कोठडीत असून त्यांच्या इतर साथीदारांचा शोध सुरु आहे. अटकेतील दोघे संशयित आरोपी हे महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्षाचे पदाधिकारी असल्याचे सांगतात. यातील मुख्य संशयीत आरोपी राजेंद्र निकम याचे युट्युब वर क्राईम इन्वेस्टीगेशन न्यूज नावाचे चॅनल असल्याचे म्हटले जाते. इतर साथीदार त्याच्याकडे नोकरीला असल्याचे म्हटले जात आहे. तसे पाहिले तर मिडीया हा सशक्त लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हटला जातो. या क्षेत्राचे ग्लॅमर आणि आकर्षण बहुतेकांना असते. स्वातंत्र्यपुर्व काळात तर एक पाय तुरुंगात टाकण्याची तयारी ठेवून बरीच मंडळी पत्रकारीतेच्या क्षेत्रात आली. धनप्राप्तीपेक्षा देशप्रेम, देशभक्तीची शिदोरी हीच प्राप्ती मानून समाधानी वृत्तीने हे व्रत घेतले जात होते. या क्षेत्रातील तुटपुंज्या कमाईमुळे लग्नाच्या बाजारात पत्रकारांना बायको मिळणे कठीण असते. काळ पुढे सरकला. हळूहळू प्रिंट मिडीयातून पत्रकार मंडळी इलेक्ट्रॉनिक्स मिडीयासह डिजीटल मिडीयात सरकू लागली. आता तर कुणीही उठतो आणि पोर्टल सुरु करत असल्याचे दिसून येते. पत्रकारीतेचा गंध नसलेल्या आणि बातमीच्या दोन ओळी लिहीता येत नसणाऱ्या शिकाऊ आणी नवागत पत्रकारांनी सध्या धुमाकुळ घातला आहे. जिल्हापेठ पोलिसांनी अटक केलेले स्वत:ला पत्रकार म्हणवणारे दोघे जण आपण महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदाधिकारी असल्याचे सांगतात. समाजसेवेची जागा धंदेवाईक व्यावसायिकतेने घेतल्यानंतर विचार प्रसारणासोबत अनेक गैर प्रकार वाढले आहेत. डीजीटल मिडीयात शिरलेल्या बाजारबुणग्या पत्रकारांनी ब्लॅकमेलींगचा धुमाकुळ घातला आहे. त्यामुळे चांगले काम करणाऱ्या पत्रकारांकडे समाजाचा बघण्याचा दृष्टीकोन बदलण्याचा प्रयत्न सुरु आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

19 TO 25 DECEMBER 2022 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 12/17/2022 8:12 PM Page 1



# वृक्षदिंडीद्वारे अनुभवला वाकोदकरांनी भूमिपुत्राचा जन्मसोहळा
## विद्यार्थ्यांसह गावकऱ्यांचा सहभाग; पंचक्रोशितील सरपंचांचा गौरव

**जामनेर/प्रतिनिधी**

वाकोदचे नाव जगाच्या पाठीवर पोहचवणारे खऱ्या अर्थाने गाव आदर्श करण्यासाठी सतत प्रयत्नशील राहणारे कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' याप्रमाणे कृतिशील आचरण करणारे या गावाच्या भूमीत जन्माला आले हे गावचे भाग्य असल्याचे मत भूमिपुत्र तथा ज्येष्ठ विचारवंत पद्मश्री डॉ भवरलाल जैन यांच्या जन्मदिनानिमित्त मान्यवरांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले. यावेळी भव्य ग्रंथ पालखी व वृक्षदिंडी सोहळ्यातून भूमिपुत्राचा जन्मसोहळा वाकोदकरांनी अनुभवला.



वाकोद हे श्रद्धेय भवरलाल जैन यांचे जन्मगाव. याठिकाणी मोठ्या उत्साहात वृक्षदिंडी, ग्रंथ पालखी भवरलालजी जैन यांची ग्रंथसंपदा ठेऊन विद्यार्थ्यांसोबत प्रभात फेरी काढण्यात आली. बैल गाडीवर भवरलाल जैन यांची प्रतिमा ठेऊन भजनी मंडळीच्या साह्याने टाळ मृदुंगाच्या गजरात मिरवणूक काढून भूमिपुत्राचा जन्म सोहळा साजरा करण्यात आला. या अभियानात राणीदानजी जैन माध्यमिक व श्रीमती कांताबाई जैन उच्च माध्यमिक विद्यालय तसेच गौराई कृषी तंत्र निकेतन व विद्यालयाचे सर्व विद्यार्थी तसेच ग्रुप ग्रामपंचायत वाकोद, जैन फार्म वाकोद यांचे सर्व सभासद कर्मचारी व ग्रामस्थांनी या अभियानात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. प्रभात फेरीचे ठिकठिकाणी रांगोळया काढून पूजा करुन स्वागत करण्यात आले. माजी जि.प. सदस्य राजधर पांढरे, पोलिस पाटील संतोष देठे, शिरीन शेख यानी मनोगत व्यक्त केले. यावेळी वाकोद ग्रामपंचायतीच्या माध्यमातून आजच्या दिनानिमित्त गावातील नूतन व्यापारी संकुलला कर्मवीर पंढरीदादा पवार व्यापारी संकुल असे नाव देण्यात आले तर जुन्या व्यापारी संकुलला पद्मश्री डॉ. भवरलाल जैन व्यापारी संकुल असे नामकरण करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्धाटन जेष्ठ नागरिक तुकाराम जाधव व सरपंच सौ. सरला संजय सपकाळे यांच्याहस्ते झाले तसेच भारतीय निवडणूक आयोगाच्या पुस्तकात वाकोद येथील शिरीन शेख यांचा लेख प्रसिद्ध झाल्याबद्दल तिचा ग्रामस्थांच्यावतीने सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन महावीर गुळेचा यांनी केले. प्राचार्य डी. आर. चौधरी यांनी आभार मानले. यशस्वीतेसाठी किशोर इंगळे, डॉ. चौधरी, प्रकाश लुंकड, बाबुराव आस्कर, प्रमोद जैन, प्रदीप पाटील, मोहन देशमुख, अभय लोढा, बालु पांढरे, शेख मुस्ताक, मधुकर काटे, विजय भोसले, प्रमोद राऊत, अरूण पाटील, संजय धोबी शेख ईला शेख गुलाब, संदीप जैन, रमेश देठे यांच्यासह जैन फार्म चे सर्व सहकाऱ्यांनी सहकार्य केले.

### पंचक्रोशितील सरपंचांचा गौरव

वाकोद येथे मिरवणूकीच्या समारोपाप्रसंगी वाकोदसह पंचक्रोशितील १२ गावच्या सरपंचांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जैन इरिगेशनच्या वतीने मदन लाठी, वाकोद जैन फार्मचे व्यवस्थापक विनोदसिंह राजपूत, तोंडापूर मंडळ अधिकारी एस. बी. तिर्थकर, वाकोद तलाठी ज्ञानेश्वर घुरके, नितीन राठोड, रमेश छाजेड, महेश देशमूख, अनिल पाटील, ज्ञानेश्वर पाटील, पंडीत पाटील यांची उपस्थिती होती. त्यांच्याहस्ते संजय सपकाळे, संजू बनसोडे, श्रीराम पाटील, मुरलीधर शेळके, जगदीश पाटील, संजय पाटील, अनिल गायकवाड, दिलीप रदाळ, राजमल भागवत, शंकर जाधव, रामेश्वर पाटील, राजूभाऊ राजपूत यांचा शाल, श्रीफळ व एक न संपणारा प्रवास ग्राम विकास' हे पुस्तक देऊन सन्मान करण्यात आला.

# बोरोळ रोडकडील रहिवास क्षेत्रावरील न.प. हद्दीतील झालेल्या अतिक्रमणास देवणी नगर पंचायतीचे दुर्लक्ष!



**देवणी/प्रतिनिधी**

बोरोळ चौक ते बोरोळ जाणारा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभिलेखाप्रमाने ८० फूट रुंदीचा रस्ता असुन त्याच्या दोन्ही बाजूने दुतर्फा नाली आहे त्या नाल्या बंद करून पाण्याचा प्रवाह ठपित करून त्यावर भर चौकत कच्चे दुकाने काढली आहेत व तसेच या एका दुकनाला प्रतिवर्ष अंदाजे अडीच ते तिन लाख भाडे अतिक्रमण करून फुकट घेत आहेत. त्याला नगर पंचायत कडून कसल्याच प्रकारची नोटीस बजावण्यात आली नाही. नगर पंचायतीची सरळ सरळ डोळेझाक व दुर्लक्ष दिसत आहे. सांडपाण्याचे व पावसाचे पाणी थांबल्याने डासाचा प्रमाण वाढत आहे यामुळे डेंग्यू ची साथ पसरण्याची दाट शक्यता आहे,तरी नाल्याच्या दुतर्फा झालेली अतिक्रमण तात्काळ काढण्यात यावे, अन्यथा सामाजिक संघटनेच्या वतीने आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# भिवंडीत दुचाकीसह रिक्षा अशी वाहनासह चार लाख साठ हजारांचा चरस जप्त करून सराईत गुन्हेगारांना अटक

**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडी शहरातील विविध पोलीस स्टेशनच्या हद्दीत रस्त्यावर उभ्या केलेल्या मोटर्स सायकल व प्रवासी वाहतूक करणाऱ्या रिक्षा सारखी वाहन चोरी करणाऱ्या एका अट्टल चोरट्यास शांतीनगर पोलिसांनी मोठ्या शिताफीने अटक करून सुमारे एक लाख ८० हजार रुपयांच्या मोटरसायकली व रिक्षा असे एकूण सहा गुन्हे उघडकीस आणले असल्याची माहित पोलीस उपआयुक्त नवनाथ ढवळे, सहाय्यक पोलीस आयुक्त किशोर खैरनार, सुनील वडके यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिली. जबीरउल्ला इद्रिस अन्सारी (वय २३ रा संजय नगर शांतीनगर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून गेल्या काही दिवसांपूर्वी भिवंडी शहरातील विविध पोलीस स्टेशनच्या हद्दीत मोटरसायकल व अन्य वाहने चोरीचे प्रकार होत असल्याने पोलीस उपायुक्त नवनाथ ढवळे, सहाय्यक पोलीस आयुक्त किशोर खैरनार, सुनील वडके यांनी पोलीस अधिकाऱ्यांची विशेष बैठक घेऊन वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर इंदलकर, पोलीस निरीक्षक निलेश बडाख,गुन्हे पोलीस निरीक्षक



विक्रम मोहिते, सपोनि, शैलेंद्र म्हात्रे, पोलीस उपनिरीक्षक निलेश जाधव यांच्या विशेष पोलीस पथक निर्माण केले.त्यांना मिळालेल्या माहितीवरून आरोपी जबीरउल्ला यास शांतिनगर परिसरातून ताब्यात घेऊन त्याच्याकडून चार मोटरसायकली व दोन रिक्षा असा एकूण एक लाख ८० हजार किमतीच्या मुद्देमाल वाहन जप्त केली आहेत शांतीनगर व भोईवाडा पोलीस स्टेशन हद्दीतून ही वाहन चोरी करण्यात आल्याची माहिती एसीपी खैरनार, वडके यांनी दिली. तसेच शहरातील जब्बार कंपाउंड शांतीनगर या परिसरात गांजा सारखा अमली पदार्थ विक्री करण्यासाठी आलेल्या होनूकुमार विराना मिस्तरी (वय २९ रा. गायत्री नगर, भिवंडी) यास पोलीस निरीक्षक विक्रम मोहिते,सपोनि शैलेंद्र म्हात्रे यांच्या पथकाने ताब्यात घेऊन त्याच्याकडून सुमारे एक लाख पाच हजार ९४० रुपये किमतीचा पाच किलो १०० ग्रॅम गांजा व एक मोबाईल फोन जप्त केले आहे. विविध गुन्ह्यात आरोपींना अटक करण्यात आली असून वरिल गुन्हयाचा अधिक तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक विक्रम मोहिते, सपोनि शैलेंद्र म्हात्रे,पो.उपनिरीक्षक निलेश जाधव, पोलीस उप निरीक्षक भोलासो शेळके, पो.हवा.महेश चौधरी, सय्यद, श्रीकांत पाटील, चौधरी, किरण जाधव, सायखेडकर रवींद्र पाटील, नरसिंह क्षीरसागर, मुके करीत आहेत.

# पालघरमध्ये जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा संपन्न



**पालघर/प्रतिनिधी**

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय पालघर आयोजित जिल्हास्तरीय कबड्डी व ताईकवंडो स्पर्धेचे आयोजन पालघर जिल्हा क्रीडा संकुल, खारेकुरण रोड पालघर येथे करण्यात आले. याप्रसंगी उद्धाटक म्हणून अर्जुन पुरस्कार विजेते आंतरराष्ट्रीय खेळाडू व अतिरिक्त पोलीस अधिक्षक पंकज शिरसाठ यांनी ऑलम्पिक मेडलिस्ट खेळाडूंचे उदाहरण देऊन खेळाडूच्या मनात खेळ व पदक प्राप्त करण्यासाठी जिद्द कशी असावी या बाबत मनोगत व्यक्त केले. उपस्थिताचे स्वागत जिल्हा क्रीडा अधिकारी सुहास वनमाने यांनी केले. यावेळी पालघर जिल्ह्यातील ४०० खेळाडू, शिक्षक व प्रशिक्षक प्रसंगी सम्राट बॅडमिंटन अॅकॅडमीचे निशांत गवई, राम पाटील सर, श्री. पाखरे, सारिका फडतरे, इम्रान, चेतन मोरे, जिल्हा कबड्डी असोसिएशन चे सचिव श्री. ठाकूर व इतर तांत्रिक पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय पंच, दांडेकर महाविद्यालयाचे क्रीडा संचालक श्री. रक्तकर्ण, प्रा. किरण थोरात यांनी केले. तर आभार प्रदर्शन तालुका क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ यांनी केले.

# गिरगाव चौपाटीवर १३ देशांतील स्पर्धकांचा नौकानयनाचा थरार

**मुंबई/प्रतिनिधी**

महाराष्ट्र, गुजरात आणि गोवा एरियल आर्मी यॉचिंग नोड यांनी २०२२ ऑप्टिमिस्ट आशियाई आणि ओशनियन चॅम्पियनशिप'चे १३ ते २० डिसेंबर या कालावधीत गिरगाव चौपाटी येथे आयोजन केले आहे. तब्बल १९ वर्षानंतर भारतात होणाऱ्या या स्पर्धाचा थरार मुंबईसह भारतवासियांना अनुभवता येणार आहे.

मुंबईला या स्पर्धेचे यजमानपद मिळाले असून १३ डिसेंबर रोजी स्पर्धकांची नोंदणी करण्यात येणार आहे. तर १४ डिसेंबर रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर येथे या कार्यक्रमाचा उद्धाटन समारंभ आयोजित करण्यात आला आहे. १९ डिसेंबर पर्यत चालणाऱ्या १० शर्यतींमध्ये प्रति दिवशी जास्तीत जास्त तीन फ्लीट शर्यती आयोजित केल्या जातील. या चॅम्पीयनशीपचा समारोप १९ डिसेंबर रोजी ठाकर्स, चौपाटी येथे होईल. महाराष्ट्र शासनाच्या युवा कल्याण आणि क्रीडा मंत्रालयाच्या सहकार्याने, याचिंग असोसिएशन ऑफ इंडिया (YI) आणि नॅशनल ऑप्टिमिस्ट असोसिएशन ऑफ इंडिया (NOI) यांच्या सहकार्याने या स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा आशियाई आणि आशियाई महासागरातील सदस्य राष्ट्रांसाठी कॉन्टिनेंटल चॅम्पियनशिप आहे. आशियाई आणि ओशनिया प्रदेशातील १३ देशांतील १०५ स्पर्धात्मक खलाशी या आठवडाभर चालणाऱ्या स्पर्धात सहभागी होणार आहेत. अर्जेंटिना, थायलंड, न्यूझीलंड, दक्षिण कोरिया, तुर्की, जपान, कॅनडा आणि भारतातील सुमारे २५ अधिकारी आंतरराष्ट्रीय ज्युरी/ रेस मॅनेजमेंटमध्ये सहभागी असणार आहेत.

युवकांची ऊर्जा क्रीडा क्षेत्रासाठी उपयोगात यावी, चारित्र्यनिर्मिती, त्यांच्यात साहसाची भावना जागृत करणे आणि भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी त्यांना सक्षम करणे जेणेकरून राष्ट्र उभारणीत त्यांचे योगदान लाभेल, हे या खेळाचे उद्दिष्ट असल्याचे कमाडिंग ऑफीसर कर्नल नछतर सिंग जोहल यांनी सांगितले. मुंबईकरांनी या आशियाई नौकानयन स्पर्धाचा थरार अनुभवावा, असे आवाहनही त्यांनी केले.

## थोडक्यात वृत्तांत

### कोकण विभागीय लोकशाही दिनी १ अर्ज निकाली

नवी मुंबई : कोंकण विभागीय लोकशाही दिन कोंकण भवनमध्ये उपायुक्त (सामान्य) मनोज रानडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी नागरिकांनी आपल्या तक्रारी मांडल्या. त्यांच्या समस्या जाणून प्रकरणे उचित कार्यवाहीसाठी संबंधित कार्यालयाकडे पाठविण्यात आली. यावेळी विभागीय स्तरावरील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. कोंकण विभागीय स्तरावर आतापर्यंत झालेल्या लोकशाही दिन कार्यक्रमात एकूण प्रलंबित अर्जाची संख्या ०५ असून आज आलेल्या अर्जाची संख्या ०४ असे एकूण प्राप्त अर्ज ०९ होते. त्यापैकी ०१अर्ज निकाली काढण्यात आला. सध्या ०८ तक्रारी प्रलंबित आहेत.

### शिंदे गटाच्या देवणी शहर प्रमुखपदी सूर्यवंशी यांची निवड



देवणी : बाळासाहेबांची शिवसेना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाच्या देवणी शहर प्रमुख पदी सुशीलकुमार सूर्यवंशी यांची निवड लातूर जिल्हाप्रमुख गोपाळ माने यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन निवड करण्यात आली,यावेळी उपजिल्हा प्रमुख सूधीर पाटील, विकास जाधव, देवणी तालुका प्रमुख संदिप पेठे, तालुका संघटक व्यंकट बिरादार आदी उपस्थित होते. सुशील यांच्या निवडीमुळे देवणी तालुक्यात बाळासाहेबांची शिवसेना एकनाथ शिंदे गटाला उभारी मिळली असून शहरात व तालुक्यात प्रत्येक गावा गावात येत्या काळात शाखा स्थापन करणार असल्याचे सुशील सूर्यवंशी बोलताना सांगतले.

### बेशिस्त वाहनचालकांविरुद्ध कडक पावले उचलणार!

नांदेड : शहरातील वाहतूक सुरळीत करण्यासाठी व वाहतुकीचा होणारा खोळंबा आणि त्यामुळे उद्भवणारी वाहतूक कोंडी लक्षात घेता बेशिस्त वाहनचालकांविरुद्ध आता कडक पावले उचलण्यात आली आहेत. वाहनधारकांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचना शहर वाहतूक शाखेला पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी दिल्या आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी महिनाभरापूर्वी नांदेड पोलीस अधीक्षकपदाचा पदभार स्वीकारला. गुन्हयांच्या वाढत्या प्रभावामुळे पोलीस यंत्रणा वेळेवर पोहंचते की नाही, अंमलदारांना दिलेले बीट व त्यांच्या त्या भागातील हालचाली टिपण्यासाठी त्यांनी लोकेशन अॅपचा प्रयोग काही भागात सुरू केला. आता कोकाटे यांनी शहरातील वाहतुकीच्या संदर्भात लक्ष घालण्यास प्रारंभ केला आहे. नांदेड शहरात दुपारी, सायंकाळचे वेळी काही ठिकाणी विशेष करून कुसुमताई चौक, फुले मार्केट, अशा डॉक्टर लाईन परिसर, मध्यवर्ती बसस्थानक, उड्डाणपूल, शिवमंदिर, कॅनॉल रोड येथे वाहनांच्या गर्दीमुळे वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण होत आहे. बदल केलेल्या मोटारसायकली वापरू नयेत. बुलेट मोटारसायकलचे बदल केलेले सायलेन्सर वापरू नये, वाहन चालविताना मोबाईलवर बोलत वाहन चालवू नये, हातगाडीवाले यांनी आपले हातगाडे रोडच्या बाजूला सुरक्षित लावावेत, शिस्तीने वाहने चालवावीत, असे आवाहन पोलिस प्रशासनाने केले आहे.

### फेर मोजणीसाठी गेलेल्या कर्मचाऱ्याला मारहाण

भिवंडी : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे ड्रीम प्रोजेक्ट असलेल्या बुलेट ट्रेन प्रकल्पात बाधित झालेल्या जमिनीची फेर मोजणी करण्यासाठी गेलेल्या भूमी अभिलेख विभागाच्या कर्मचाऱ्याला दोन स्थानिकांनी मारहाण केल्याची घटना बुधवारी घडली असून याप्रकरणी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुर्योधन गणपत काटे व मारुती काटे दोघे रा. खारबाव असे मारहाण करणाऱ्या दोघा इसमांची नावे आहेत.तर परीक्षित खुशाल कांबळे वय ४२ रा.कुळगाव बदलापूर असे मारहाण झालेल्या भूमी अभिलेख विभागाच्या कर्मचाऱ्याचे नाव आहे.बुधवारी भूमी अभिलेख विभागाचे कर्मचारी कांबळे हे बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या फेर चौकशी मोजणीसाठी गेले असता त्या ठिकाणी दुर्योधन काटे व मारुती काटे यांनी फेरमोजणी कामात हरकत घेऊन कांबळे यांना चापटीने मारहाण केली तर कांबळे यांच्या सोबत असलेल्या पराग पाटील यांना लाकडी दांडक्याने मारहाण केली आहे.या मारहाण प्रकरणी कांबळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दुर्योधन काटे व मारुती काटे या दोघां विरोधात सरकारी कामात अडथळा व मारहाण प्रकरणी भिवंडी तालुका पोलीस पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### तरुणीची नैराश्येतून आत्महत्या



वाडा: वाडा तालुक्यातील निंबवली येथील २४ वर्षीय तरुणीने नैराश्येतून राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली असल्याची दुःखद घटना समोर आली आहे. निंबवली येथे राहनारी तरुणी ममता परशुराम परेड (२४) या तरुणीने गळ्यात दोरीचा फास लावून आत्महत्या केल्याचा प्रकार रविवारी सकाळच्या सुमारास उघडकीस आला आहे. तिच्या आत्महत्येचे कारण समजू शकले नाही. शवविच्छेदना नंतर तिचा मृतदेह नातेवाईकांना सुपूर्द केला असून अधिक तपास वाडा पोलीस करत आहेत. ममताला वसई महापालिकेत जनसंपर्क अधिकाऱ्याची नौकरी लागली असून उद्या ती कामावर रुजू होणार होती.

# लातूर जिल्ह्यातील ९८ आरोग्य संस्थांना 'कायाकल्प' पुरस्कार

**लातूर/प्रतिनिधी**

आरोग्य संस्थांमधील सेवांची गुणवत्ता वाढविण्यासाठी केंद्र शासनाने सुरु केलेल्या 'कायाकल्प' उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील ९८ आरोग्य संस्थांना सन २०२१-२२ या वर्षातील कामगिरीबद्दल 'कायाकल्प पुरस्कार' जाहीर झाला आहे. या संस्थांच्या पुरस्काराची एकत्रित रक्कम सुमारे ४२ लक्ष रुपये आहे. राज्यस्तरीय कायाकल्प पुरस्कारामध्ये लातूर येथील स्त्री रुग्णालयाला तीन लक्ष रुपयांचा प्रोत्साहनपर पुरस्कार जाहीर झाला आहे. उदगीर आणि निलंगा येथील उपजिल्हा रुग्णालय, तसेच किल्लारी, अहमदपूर, रेणापूर, चाकूर, बाभळगाव आणि मुरुड येथील ग्रामीण रुग्णालयाला प्रत्येकी एक लक्ष रुपयांचा प्रोत्साहनपर पुरस्कार जाहीर झाला आहे. उदगीर तालुक्यातील हरंडगुळी प्राथमिक आरोग्य केंद्राला प्रथम क्रमांकाचा जिल्हास्तरीय कायाकल्प पुरस्कार जाहीर झाला असून या पुरस्काराची रक्कम दोन लक्ष रुपये आहे. तसेच अवलकोंडा येथील आरोग्यवर्धिनी केंद्राला एक लक्ष रुपयांचा जिल्हास्तरावरील प्रथम क्रमांकाचा, एकुर्गा आरोग्यवर्धिनीला ५० हजार रुपयांचा द्वितीय पुरस्कार आणि किनी यल्लादेवी आरोग्यवर्धिनी केंद्राला ३५ हजार रुपयांचा तृतीय पुरस्कार जाहीर झाला आहे. जिल्ह्यातील २४ प्राथमिक आरोग्य केंद्रांना प्रत्येकी ५० हजार रुपयांचा जिल्हास्तरीय प्रोत्साहनपर पुरस्कार आणि ६१ आरोग्यवर्धिनी केंद्रांना प्रत्येकी २५ हजार रुपयांचा प्रोत्साहनपर पुरस्कार जाहीर झाला आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. एच. व्ही. वडगावे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. एल. एस. देशमुख, जिल्हा माताबाल संगोपन अधिकारी, डॉ. एस. एल. हरिदास, सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी ए. सी. पंडगे व जिल्हा गुणवत्ता नियमन समन्वयक डॉ. पल्लवी रेड्डी यांनी कायाकल्प अभियानाच्या अनुषंगाने जिल्ह्यातील अधिकारी, कर्मचारी यांना मार्गदर्शन केले. दरम्यान रूग्णालयातील स्वच्छता व टापटीप, जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन, संसर्ग नियंत्रणासाठी केलेले प्रयत्न, इतर समर्थन सेवा, स्वच्छता प्रचार व प्रशिक्षण सेवा आदी विविध निकषांच्या आधारे कायाकल्प पुरस्कारासाठी आरोग्य संस्थांची निवड केली जाते. या निकषांनुसार संबंधित संस्थेचे कर्मचारी प्राथमिक स्तरावर गुणांकन करतात. त्यानंतर जिल्हा व राज्यस्तरीय पथकाकडून आरोग्य संस्थेचे तपासणी होवून ७० टक्केपेक्षा अधिक गुणप्राप्त करणाऱ्या संस्थांना पुरस्कार दिला जातो.

अहमदपूर तालुक्यातील हाडोळती, शिरूर ताजबंद, सताळा, किनगाव, अंधोरी, उदगीर तालुक्यातील देवर्जन, हेर, वाढवणा बु., औसा तालुक्यातील लामजना, जवळगा पो., भादा, उजनी, मातोळा, जळकोट तालुक्यातील वांजरवाडा, अतनूर, निलंगा तालुक्यातील कासार बालकुंदा, निटूर, रेणापूर तालुक्यातील खरोळा, लातूर तालुक्यातील भातांगळी, चिकुर्डा, तांदूळजा, निवळी, शिरूर अनंतपाळ तालुक्यातील साकोळ प्राथमिक आरोग्य केंद्राला जिल्हास्तरीय प्रोत्साहनपर पुरस्कार जाहीर झाला आहे. अहमदपूर तालुक्यातील ढाळेगाव, कुमठा बु., डोंगर शेळकी, वळसंगी, काजळा हिप्परगा, मांडणी, उजना, शिंदगी बु., रुध्दा, उदगीर तालुक्यातील करडखेल, बनशेळकी, गुडसूर, वाढवणा खु., दावणगाव, तोंडार, बामणी, मोघा, औसा तालुक्यातील लोदगा, तळणी, सारोळा, आशिव, चाकूर तालुक्यातील घरणी, उजळंबा, जढाळा, झरी खु., बोथी, जळकोट तालुक्यातील गव्हाण, जगळपूर, कोळनूर, घोणशी, गुत्ती, तिरूका, चेरा, कुणकी, माळहिप्परगा, देवणी तालुक्यातील सावरगाव, निलंगा तालुक्यातील अनसरवाडा, सावरी, भूतमुगळी, रेणापूर तालुक्यातील तळणी, लातूर तालुक्यातील खंडापूर, खोपेगाव, हरंगूळ खु., काटगाव, बोरगाव काळे, गाधवड, सोनवती, हरंगूळ बु., भोईसमुद्रा, कव्हा, वांजरखेडा, मुरुड अकोला, माटेफळ, गातेगाव, एकुर्गा, शिरूर अनंतपाळ तालुक्यातील राणी आंकूलगा, तळेगाव बोरी, धामणगाव, हिप्पळगाव, उजेड, शिवपूर या आरोग्यवर्धिनी केंद्रांना प्रोत्साहनपर पुरस्कार प्राप्त झाला आहे.

19 TO 25 DECEMBER 2022 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 12/17/2022 8:13 PM Page 1



# हे वारकरी की राजकीय धारकरी!

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे आणि या भूमीत ज्ञानेश्वर माऊली, तुकोबा महाराज, एकनाथ, नामदेव, मुक्ताई, जनाबाई, कान्होपात्रा यांच्या सारखे महान संत होऊन गेले या सर्वांनी समाज जागृतीचे समाजाला दिशा दाखवण्याचे महान कार्य केले. आज भागवत धर्माची हीच भगवी पथाका खांद्यावर घेऊन आमचे वारकरी बांधव संतांचा महान संदेश खेड्यापाड्यात पोचविण्याचे काम करीत आहेत. त्यामुळे वारी आणि वारकऱ्यांच्या विषयी लोकांच्या मनात आदर आहे. मात्र सुषमा अंधारे यांच्या एका विधानावरून वारकऱ्यांनी त्यांच्या विरोधात जी मोहीम उघडली आहे ती चुकीची आहे. कारण सुषमा अंधारे यांनी आपल्या त्या विधानाबद्दल कुणाच्या भावना दुखावल्या असतील तर मी माफी मागते असे म्हटलेले असताना त्यांची प्रतीकात्मक अंत्ययात्रा काढणे, त्यांना शिवीगाळ करणे, भर रस्त्यात गाठून मारू अशा धमक्या देणे वारकरी संप्रदायाला शोभणारे नाही. कारण ज्या संतांची शिकवण ते समाजापर्यंत पोचविण्याचे महान कार्य करीत आहेत त्यात महिलांच्या सन्मानाला अधिक महत्व आहे असे असताना जातीवादी भाजपच्या चिथावणी वरून आंबेडकरी चळवळीतील एक दलीत महिलेच्या बाबतीत अशी आडमुठी भूमिका घेऊन तिच्या विरोधात भाजपचा अजेंडा चालवणे वारकरी संप्रदायाला शोभणारे नाही. सुषमा अंधारे यांनी त्यांची भूमिका स्पष्ट करताना आपण कबीर पंथीय असून आपल्या घराला वारकरी संप्रदायाची परंपरा आहे. माझे कुटुंबीय पायी वारी करतात असे असताना मी वारकरी विरोधी आहे असे का समजले जाते असा सवाल केला आहे. या वेळी त्यांनी तुकोबा आणि ज्ञानेश्वर माऊलीं यांच्या महान ग्रंथातील काही ओळी वाचून दाखवल्या त्यांचा संत साहित्याचा दांडगा अभ्यास आहे स्वतःला वारकरी म्हणवून घेणारे पण सुषमा अंधारे याना मारण्याची धमकी देणाऱ्या संत साहित्याचा जितका अभ्यास नसेल तितका सुषमा अंधारे याना आहे आणि त्यांनी त्यांच्या विधानातून कुठल्याही संताचा किंवा भागवत धर्माचा अपमान केलेला नाही. ज्ञानेश्वर महाराजांनी रेड्याच्या तोंडून वेद वधवून घेतले, पण त्याच काळात गोरगरीब दलितांना मात्र शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आले यात ज्ञानेश्वर महाराजांचा अपमान कसा झाला? उलट आज वारकरी भाजपातील ज्या भट बामनांच्या चिथावणी वरून सुषमा अंधारे सारख्या दलीत पण अभ्यासू महिलेला मारण्याची भाषा करीत आहेत त्याच भट बामनानी ज्ञानेश्वर माऊलींच्या कुटुंबाला त्रास दिला होता. ज्ञानेश्वरांच्या वडिलांनी संन्यास घेऊन पुन्हा संसारात परतल्याने त्यावेळच्या भट बामननी ज्ञानेश्वर माऊलींच्या कुटुंबावर बहिष्कार टाकला. त्यांच्या भावंडांचे हाल हाल केले. वारकरी संप्रदायाला या गोष्टीचा कसा काय विसर पडला. हिंदुत्वाच्या नावाखाली भाजपला या देशात मनुवाद आणायचा आहे. जाती पतीच्या भिंती उभ्या करून हिंदू समाजाचे नेतृत्व पुन्हा बाबांच्या हाती द्यायचे आहे. ज्या गोष्टीला संत महात्म्यांनी त्या काळी विरोध केला होता त्याच गोष्टी पुन्हा आणायच्या आहेत. मग अशा लोकांना वारकरी संप्रदाय मदत करून हिंदू धर्मात फूट पाडण्याचा भाजपच्या पापात वारकरी संप्रदाय सामील होणार आहे का? महिलांचा सन्मान करा ही आमच्या संत महात्म्यांनी दिलेली शिकवण आहे. जी वारकरी संप्रदायाला बंधनकारक आहे हे बंधन तोडून वारकरी संप्रदाय संतश्रेष्ठ मुक्ताई, जनाबाई, कान्होपात्रा, संत सखू या महान महिला संतांचा अपमान करणार आहे का? उलट भागवत धर्माची महान शिकवण अंगिकारून सुषमा अंधारे सारखी एक दलीत महिला नावारूपाला आली. स्वतःच्या कर्तुत्वावर तिने समाजात स्वतःची ओळख निर्माण केली. त्याबद्दल तिचे कौतुक करायला हवे. पण भाजपासारख्या पक्षाच्या चिथावणी वरून वारकरी बंधूंनी राजकारण करू नये. कारण अशा राजकारणातून दलीत मागासवर्गीय समाजातून पुढे येऊन समाजासाठी काहीतरी चांगले करू पाहणाऱ्या महिलांचे खच्चीकरण होणार आहे. आणि भाजपला तेच हवे आहे आणि त्यांच्या याच योजनेला वारकरी पाठींबा देणार असतील तर समाजाच्या मनात वारकरी सांप्रदाय विषयी जो आदर आहे तो नष्ट होईल. जे समाजासाठी घातक ठरू शकेल म्हणूनच वारकऱ्यांनी भाजपच्या राजकारणाला बळी पडू नये. जात, धर्म, पंथ, भाषा, अस्मिता या सर्वांच्या पलीकडे आहे देश आणि देशाचे ऐक्य, देशाची सुरक्षा देशातील बंधुभाव पण २१०४ पासून या देशात जे काही सुरु झाले आहे त्याचा गेल्या ७ वर्षात ज्या झपाट्याने प्रचार आणि प्रसार सुरु आहे ते पाहिल्यावर या देशात १९४७ सारखी परिस्तिथी निर्माण होते कि काय अशी भीती वाटायला लागलीय. कारण या देशातील जनतेने एक फाळणी पहिली आहे आणि त्या फाळणीचे चटके ७५ वर्षांच्या नंतरही देश भोगतोय. असे असताना देशाची पुन्हा एकदा फाळणी हि कल्पनाच सहन होत नाही. कारण धर्माच्या आधारे वेगळ्या झालेल्या पाकिस्तानची आज काय अवस्था आहे हे संपूर्ण जग बघतेय. अशा स्थितीत ड्रमच्या नावाने आणखी एका फाळणीची जी बीजे रोवली जात आहेत, त्याच्या विरोधात या देशातील जनता संघटित झाली नाही तर या देशाचे काही खरे नाही. भारतीय संविधानाने धर्माचे अस्तित्व कधीच नाकारलेले नाही. प्रत्येकाला त्याच्या धर्मानुसार आचरण करण्याची पूर्णपणे मुभा आहे. पण प्रत्येक गोष्टीकडे धर्माच्या चष्म्यातून पाहणे योग्य नाही आणि मुख्य म्हणजे या देशात संविधान असताना धर्म संस्कृतीचा आग्रह धरणे आपल्या धर्मातील चुकीच्या गोष्टी दुसऱ्यांवर लादण्याचा प्रयत्न करणे चुकीचे आहे. हिंदू धर्म संस्कृतीने स्त्रीला साक्षात देवी मानलेले आहे. आणि तिच्या विविध रूपाची आपण पूजा करतो. तरीही एक काळ असा होता कि स्त्रीला चार भिंतीच्या आत मर्यादांच्या कुंपणात बंदिस्त केले जात असे. चूल आणि मूळ याच्या पलीकडे स्त्रीचे अस्तित्व नव्हते. पण बदलत्या काळाच्या ओघात परिवर्तनाची जी लाट आली त्या लाटेने समाजाला बदलायला भाग पाडले. आणि हे बदल अर्थातच क्रांतिकारी होते. त्यासाठी समाजात काही सुधारणावादी महापुरुषांचा जन्म झाला. त्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वर्षोनुवर्षे जातीपातीच्या चिखलात खितपत पडलेल्या दलित समाजाला त्याच्या न्याय हक्काची जाणीव करून देत त्याला त्याचा न्याय हक्क मिळवून दिला. आणि त्या समाजाला देशाच्या मूळ प्रवाहात आणले तर सावित्री बाई फुलेंनी महिलांना शिक्षणाची दारे खुले करून देत त्यांना रूढी परंपरांच्या जोखडातून बाहेर काढले. आज प्रत्येक क्षेत्रात स्त्री पुरुषाच्या बरोबरीने काम करीत आहे. पण काही मनुवाद्यां स्त्रीची हि प्रगती समाजातील तीच उंचावलेले स्थान काही रुढि परंपरा वाद्यांच्या नजरेत खुपतंय म्हणून आजच्या विज्ञानवादी स्तररील विरोध केला जातोय. सुषमा अंधारे हि चळवळीतील दलित महिला आहे. इन तिच्या भाषणात अनावधानाने केलेल्या एक विधानाबद्दल माफी मागितली आहे. तरीही काही लोक तिच्या विरोधात आकांडतांडव करीत आहेत. तिची प्रेतयात्रा काढण्यापर्यंत त्यांची मजल गेलीय. एक स्त्रीबद्दल इतका द्वेष दाखवून काय मिळणार आहे. भाजपवाल्यांकडून सुष्मावर होणारी टीका टिप्पणी हा त्यांच्या मनुवादी विचारसरणीचा आणि गलिच्छ राजकारणाचा भाग आहे. पण आमच्या वारकरी संप्रदायातील संत परंपरा जोपासणाऱ्या लोकांनी सुषमा सारख्या महिलेच्या बाबतीत एवढी टोकाची भूमिका घेणे योग्य आहे का? आपल्या संत महात्म्यांनी आपल्याला स्त्रीचा आदर करण्याची शिकवण दिली आहे . एखाद्या महिलेच्या हातून भलेही काही चूक झाली असेल आणि आपल्या चुकीची तिला जाणीव होऊन तिने माफी मागितली असेल तर तो विषय थांबवायला हवा. पण तिच्या विरोधात बंद पाळणे तिला मारण्याची धमकी देण्याची भाषा करणे हे वारकरी बांधवाना शोभणारे नाही.

# मुली कुठे चुकतात..?

**(प्रेमसंबंधात मुलीची फसवणूक होणे, त्यांन मारहाण होणे तसेच टोकाचे पाऊल म्हणजे त्यांची हत्या होणे हे प्रकार वाढले आहेत. वसई विरारचा विचार केला तर मागील दोन वर्षात शहरात प्रियकरांकडून ६ तरुणींच्या हत्या घडल्या आहेत. श्रध्दा वालकरच्या हत्येने मुलींना होणारी मारहाण आणि अत्याचाराचा मुद्दा समोर आला आहे. पण यात मुलींची चूक आहे का? पालकांची जबाबदारी काय? तरुण हिंसक का बनत चालले आहेत, त्याचा शोध घेणे गरजेचे आहे.. )**

श्रध्दा वालकरची ज्या क्रूरतेने झाली ते पाहून सारा देश हादरला आहे. रोज नवनवीन खुलासे होते आहेत ते पाहून संवेदनशील मनं पार गोठून जात आहे. एवढं कौर्य येतो कुठून असा प्रश्न पडतो. पण तरुण वर्ग हिंसक बनत चालला आहे हे वास्तव आहे. श्रध्दाने आपल्या जोडीदाराच्या वर्तणुकीचा धोका ओळखला असता तर कदाचित ती वाचली असती. आफताब तिला मारहाण करत होता. डिसेंबर २०२० मध्ये आफताबच्या मारहाणीमुळे तीन दिवस रुग्णालयत दाखल होती. तरी देखील तिने त्याल माफ करून त्याच्यासोबत राहिली आणि हीच चूक तिला भारी पडली. ती आपल्या प्रेमात आकंठ बुडालेली आहे, आफताबने जाणलं आणि तिच्यावर अत्याचार करत राहिला. शेवटी त्याने तिची विकृत पध्दतीने हत्या देखील केली.. प्रेम करणं, लिव्ह इन मध्ये राहणं चूक नाही. पण प्रेमात मुलींनी वेळीच दक्षपणा दाखवला नाही तर फसवणूक होण्याची शक्यता असते. परंतु प्रेमात बुडालेल्या मुली त्याचा विचार करत नाही, वाहवत जातात आणि मग पश्चातापाची वेळ येते.

**दिशायन**

या वर्षी मार्च महिन्यात वसईत राहणाऱ्या सायली शहासने या २६ अभियंता तरुणीची तिचा प्रियकर सागर नाईक यानेम लॉज मध्ये हत्या केली होती. या घटनेनंतर त्याने देखील गळफास लावून आत्महत्या केली होती. पोलिसांनी या घटनेचे विश्लेषण करताना सांगितले की, सागर याला मोबाईल गेमचे व्यसन होते. रात्र रात्रभर तो मोबाईल गेम खेळत असायचा. तो अभियंता झाला नव्हता पण त्याने खोटे सांगितले होते. तो सायली कडून खर्चाला पैसे घेत होता. सायलीने आंधळेपणाने त्याच्यावर विश्वास ठेवल. त्याला पैसे देत गेली. त्याची चौकशी केली नाही. लग्न करण्याचा तगादा त्याने लावला म्हणून सागरने तिची हत्या केली. सायलीने वेळीच सावध झाली असती तर तिचा जीव गेला नसता.

प्रेम ही नैसर्गिक भावना आहे. त्यात चूक नाही. परंतु सध्या प्रेमाची परिभाषा बदलली आहे. बाह्य आकर्षणाला प्रेम मानलं जात आहे. वसई विरार शहरातून दररोज ३ अल्पवयीन मुली प्रेमाच्या आकर्षणाला भूलून घर सोडून जात असतात. सुरवातील चेहऱ्यावर सभ्यतेचा मुखवटा असतो. नंतर खरा चेहरा समोर येतो. मग प्रेमसंबंधात मारहाण केली जाते. मुलींने वेळीच हा धोका ओळखायला हवं आणि त्याच्यापासून दूर जायला हवं. सहन करण्याची मर्यादा असते. मुलं सुरवातीला वेगवेगळ्या प्रकारे मुलींना प्रभावित करून आपल्या प्रेमात पाडतात. मुलगी प्रेमात पडली म्हणजे ती आपल्याच मालकिची झाली असं त्यांना वाटतं. त्यामुळे ते तिच्याशी कसेही वागतात. प्रियकरांकडून मुलींना मारहाणीच्या घटना वाढत आहे. मानसोपचापतज्ञांकडे अशी अनेक प्रकरणे येत असतात. मुली देखील निमूटपमे त्यांच्या शिव्या आणि मार सहन करतात.

**ब्लॅकमेलला बळी पडू नये**

प्रेमसंबंधाच्या वेळी प्रियकर खासगी क्षणांची छायाचित्रे, चित्रफिती काढून ठेवतात. नंतर हीच गोष्ट मुलींसाठी त्रासदायक ठरते. मुलगा कसाही वागला तरी मुलींना सहन करावं लागतं. कारण हा प्रियकर याच छायाचित्रांच्या आधारे ब्लॅकमेल करत असतो. मुलींनी अशा ब्लॅकमेलला बळी न पडता कुटुंबाला विश्वासात घेऊन पोलिसांकडे तक्रारी करायला हव्यात. कुठल्याही दबावाला बळी पडता कामा नये. महिलांच्या बाजून कायदे भक्कम



आहे. महिलांच्या तक्रारी गांभिर्याने घेऊन कारवाई केली जाते. त्यामुळे न घाबरता मुलीनी वेळीच तक्रारी केल्या त्यांना न्याय मिळतो. मार्च महिन्यात नालासोपारा येथील कळंब येथील लॉज मध्ये अल्पवयीन मुलीची तिच्या प्रियकराने हत्या केली होती. या मुलीला तो अश्लील छायाचित्रांच्या आधारे ब्लॅकमेल करून पैसे उकळत होता शिवाय तिचे शारिरिक शोषणही करत होता. शेवटी याच वादातून तिची हत्या झाली. त्यामुळे मुलींना अशा प्रकरणात वेळीच सावध व्हायला हवे. तक्रार केल्यास ब्लॅकमेल करणाऱ्यावर गुन्हा दाखल होतो शिवाय त्याचे मोबाईल, लॅपटॉप न्यायवैद्यक प्रयोगशाळेत पाठवून सर्व डेटा कायमस्वरूपी डिलीट करता येतो.

**तरुणाईमधील हिंसा चिंताजनक**

ज्याच्यावर प्रेम करतो त्या व्यक्तीला कसं मारू शकतो? पण हे प्रकार वाढू लागले आहेत. तरुण हिंसक बनू लागले आहेत. मुळात समाजमाध्यमांचे आभासी जर, नात्यांमधील निर्जीवपणा यामुळे तरुणांची मने बोथट आणि संवेदनाहीन बनू लागली आहेत. मोबाईल गेम, हिंसक वेबसिरीज, घरातील संस्कारांचा अभाव यामुळे मनातील संवेदना कमी होऊन मन यांत्रिक बनू लागली आहेत. तरुणांच्या या हिंसक स्वभावाचा फटका मुलींना बसतो. निर्जीव आणि विक्षिप्त बनलेली मुले आपल्या प्रेयसींवर विक्षिप्तपणे अत्याचार करत असतात, त्यांना मारहाण करत असतात. मुलींवर अत्याचार करणाऱ्यांची मानसिकता पाहिली तर हेच दिसून येते. क्षुल्लक घटनांचे पर्यवसान गंभीर गुन्ह्यात होऊ लागले आहे.

**पालकांनी साथ द्यायला हवी!**

आकर्षणाला भूलून मुली घरातून पळून जातात. नंतर त्यांना वास्तवतेची जाणीव होते. परंतु परतीचे मार्ग बंद झाले आहेत असे त्यांना वाटते. प्रेमसंबंधात घरच्यांचा विरोध असतो. अशा वेळी माघारी परतलो तर घरचे स्विकार करतील का? ते काय म्हणतील अशी चिंता असते. मग ते सहन करतात. अशावेळी पालकांची मुख्य भूमिका असते. पालकांनी देखील मुलीला समजून तिला विश्वास आणि धीर द्यायला हवा. तिला दूषणे न देता तिचा स्विकार करायला हवा. तरच ती मुलगी ठामपणे प्रियकरला नकार देऊन घरी परतू शकते. घरच्यांची साथ असणे महत्वाचे आहे. मुलगी अजाणतेपणे चुकते. त्यामुळे तिला समजून, तिच्या चुका पोटात घेऊन स्विकार करणे गरजेचे आहे.

दुसरीकडे, कुटुंबात हरवलेला संवाद मुलांना एकलकोंडा बनवतो आणि मग ते बाहेर आधार शोधण्याचा प्रयत्न करतात. मुलींना पालक स्वातंत्र्य देतात. त्यांच्या वैयक्तित जीवनात बघत नाही. एका ठराविक पातळीपर्यत ते ठिक आहे. मात्र पालकांनी मुलांशी संवाद ठेवायलाच हवा, त्यांना मार्गदर्शन करायला हवे. अन्यथा त्यांचा मार्ग चुकण्याची शक्यता असते.

# लोकाभिमुख सरकारचे हिताचे निर्णय!

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली यशस्वीपणे चालल्या लोकाभिमूख शासनाला शंभरहून अधिक दिवस झाले आहेत. या कालावधीत या शासनाने जनतेच्या हितासाठी, जनतेच्या दृष्टीने महत्त्वाचे, शेतकरी, नोकरदार, उद्योजक, पर्यटन अशा विविध क्षेत्रांशी निगडीत सामान्य जनतेला केंद्र बिंदू मानून महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत.

शासनाने सत्तास्थापनेनंतर ७३ हून अधिक धोरणात्मक निर्णय घेतले, तर ७०० हून अधिक शासन निर्णय जारी केले आहेत. यातील अनेक निर्णयांचे सामान्य जनतेकडून स्वागत करण्यात आले. शेतकऱ्यांच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे असे कृषि विभागासाठी महत्त्वाचे निर्णय या शासनाने घेतले आहेत. त्यापैकीच एक म्हणजे गेल्या अनेक वर्षापासून मागणी होत असलेले हळद संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र, संशोधन आणि प्रक्रिया धोरण राबविण्यास राज्य सरकारने मंजुरी दिली. यासाठी सरकारने १०० कोटी रुपये निधी उपलब्ध करून दिला आहे. हळद संशोधन केंद्र हे हिंगोलीमध्ये होणार आहे. या केंद्राला बाळासाहेब ठाकरे राज्य हळद संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र असे नाव देण्यात आले आहे.

भारतात हळदीचे उत्पादन प्रामुख्याने महाराष्ट्र, तेलंगणा, कर्नाटक, तामिळनाडू, छत्तीसगड, आंध्रप्रदेश इ. राज्यात घेतले जाते. सन २०१९-२० मध्ये देशात हळद पिकाखालील क्षेत्र २.१८ लक्ष हेक्टर होते. त्यापैकी ५४ हजार ८८५ हेक्टर क्षेत्र हे महाराष्ट्रात होते. सन २०२१-२२ च्या आकडेवारीनुसार राज्यात एकूण १.०२ लक्ष हेक्टर क्षेत्र हळद पिकाखाली आहे. राज्यात हळदीचे क्षेत्र प्रामुख्याने मराठवाड्यात सर्वाधिक आहे. राज्यातील हळद पिकाखालील क्षेत्रापैकी मराठवाड्यात एकूण ८२ हजार ९ हेक्टर क्षेत्र (८०%) आहे. त्यामुळे हा प्रकल्प मराठवाडयात उभारण्यात आला आहे. राज्यात शेतकरी बांधवांसाठी पीक विमा योजना राबविण्याकरिता संपूर्ण महाराष्ट्र राज्यात पीक विमा बीड पॅटर्न लागू केला आहे. या पॅटर्ननूसार जर शेतकरी बांधवांच्या शेत मालाचे नुकसान कमी झाले तर, पीक विमा कंपनीला ८०% पेक्षा कमी रक्कम द्यावी लागल्यास कंपनीने शेतकरी बांधवांना नुकसान भरपाई म्हणून दिलेली रक्कम तसेच २० % नफा कंपनीकडे ठेऊन उर्वरित सर्व रक्कम ही राज्य सरकारला परत द्यावी लागणार आहे. त्यामुळे ही रक्कम सरकार विकास कामाकरीता वापरू शकणार आहे. ही रक्कम जिल्ह्याच्या विकासाकरिता वापरण्यात येणार आहे. तसेच शेतकरी बांधवाचे नुकसान जास्त झाल्यास अधिकची रक्कम ही शासन शेतकऱ्यांना देणार आहे. त्यामुळे शेतकरी बांधवांना सुद्धा या योजनेअंतर्गत फायदा होणार आहे. या पीक विमा योजना बीड पॅटर्न मध्ये शेतकरी बांधवांना पीक विमा नोंदणी करताना रब्बी हंगामासाठी १.५ टक्के तर खरीप हंगामासाठी २ टक्के इतकी रक्कम ही शेतकरी बांधवांच्या हिष्याची प्रीमियम रक्कम असणार आहे. कापूस व कांदा इत्यादी पिकांकरिता ही रक्कम ५ टक्के असणार आहे. शेतकरी बांधवांनी भरलेल्या पीक विमा प्रीमियम व्यतिरिक्त प्रीमियम हा राज्य तसेच केंद्र शासन भरणार आहे. पीक विम्याचा बीड पॅटर्न राबविल्याने शेतकरी बांधवांचा तसेच जिल्ह्याचा विकास होणार आहे. त्याच प्रमाणे कृषी विभागाला सुद्धा वित्त पुरवठा होणार असल्याने या पॅटर्न मुळे शेतकरी आणि जिल्ह्याच्या विकासाला हातभार लागणार आहे.

अतिवृष्टी, विमा क्षेत्र जलमय होणे (भात पीक सोडून), भस्खलन ,गारपीट सारख्या नैसर्गिक आपत्ती मुळे शेतातील उभ्या पिकाचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांनी सदर नुकसान झाल्यापासून ७२ तासांच्या आत संबंधित विमा कंपनीस पीक विमा प, टोल फ्री क्रमांक, ई-मेल द्वारे नुकसानीची सूचना देणे बंधनकारक आहे. यानंतर संबंधित क्षेत्राचा पंचनामा करून येणारी नुकसान भरपाईची रक्कम विमा कंपनीमार्फत संबंधित शेतकऱ्यास अदा केली जाते. पिकाची काढणी करून शेतात सुकवणुकीसाठी पीक पसरून ठेवले असताना पीक काढणी नंतर १४ दिवस पर्यन्त अतिवृष्टी, गारपीट सारख्या नैसर्गिक आपत्ती मुळे पिकाचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांनी सदर नुकसान झाल्यापासून ७२ तासांच्या आत संबंधित विमा कंपनीस पीक विमा प, टोल फ्री क्रमांक, ई-मेल द्वारे नुकसानीची सूचना देणे बंधनकारक आहे. यानंतर संबंधित क्षेत्राचा पंचनामा करून येणारी नुकसान भरपाईची रक्कम विमा कंपनीमार्फत संबंधित शेतकऱ्यास अदा केली जाते. ही बाब भात पिकाला सुद्धा लागू आहे.

शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी, प्रश्न प्रशासनाने समजून घ्यावेत, त्यावर कोणत्या उपाययोजना करुन धोरणात्मक निर्णय घेता येतील यासाठी अधिकारी, पदाधिकारी यांनी संपूर्ण एक दिवस शेतकऱ्यांसोबत व्यतीत करुन अडचणी समजून घेण्यासाठी 'माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी' हा उपक्रम १ सप्टेंबर ते ३० नोव्हेंबर २०२२ या कालावधीत सुपूर्ण राज्यात राबविण्यात आला होता. राज्यात अनेक जिल्हे हे आत्महत्याग्रस्त जिल्हे म्हणून समोर आलेले आहेत. आपल्या राज्यातील शेतकरी हे शेती करताना मोठ्या प्रमाणात अडचणींचा सामना करत असतात परिणामी त्यांना आत्महत्या करावी लागते. शेतकऱ्यांना या योजनांविषयी पुरेशी माहिती व्हावी. यासाठी कृषी अधिकारी, पंचायत समिती त्याचप्रमाणे विविध योजनांचे अधिकारी,शेती विषयातील नवनवीन तंत्रज्ञान असेल तसेच इतरही शेती विषयक माहिती, विविध योजना यांच्या विषयीची माहिती शेतकऱ्यांना त्यांच्या गावांमध्ये, त्यांच्या दारात उपलब्ध व्हावी याकरिता हा उपक्रम राबविण्यात आला होता.

यासाठी राज्यस्तरावरील कृषी आयुक्त, प्रधान सचिव, कृषी संचालक, कृषी विद्यापीठांचे कुलगुरू, कृषी विद्यापीठांचे विभाग प्रमुख, विभाग स्तरावरील विभागीय कृषी सहसंचालक, विभागीय आयुक्त, कृषी उपसंचालक, प्रकल्प संचालक आणि इतर जिल्हास्तरीय अधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य अधिकारी, जिल्हा कृषी अधिकारी, कृषी विकास अधिकारी, जिल्हास्तरावरील अधिकाऱ्यांमध्ये जिल्हाधिकारी आणि प्रकल्प संचालक इत्यादी अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला. तालुकास्तरीय तहसीलदार, नायब तहसीलदार, इतर तालुकास्तरीय अधिकारी, तालुका कृषी अधिकारी व इतर अधिकारी. महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांमध्ये त्या भागातील आमदार तसेच खासदार आणि इतर लोकप्रतिनिधी स्वेच्छेने सहभागी झाले. या अधिकाऱ्यांनी महिन्यातून तीन दिवस गावांना भेटी दिल्या. त्याचप्रमाणे महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना आणि ग्रामविकास विभागाच्या व इतर विभागाच्या अधिकाऱ्यांना महिन्यातून एक दिवस गावांना भेटी दिल्या. या उपक्रमांतर्गत दुर्गम डोंगराळ भाग तसेच कोरडवाहू व आदिवासी सामाजिक क्षेत्र असणाऱ्या गावांची निवड करण्यात आली होती. या उपक्रमाअंतर्गत गावाची निवड ही संबंधित अधिकारी पदाधिकारी यांचे मुख्यालय ज्या ठिकाणी आहे, त्या ठिकाणापासून दूर करण्यात आली होती. शासनाने कृषि विभागासाठी राबविलेले हे नवनवीन प्रकल्प, उपक्रम आणि कृषि क्षेत्राच्या विकासाच्या दृष्टीने घेतलेले महत्त्वाच्या निर्णयांमुळे भविष्यात कृषि क्षेतत्रात मोठा बदल घडून आलेला पहायला मिळणार आहे. या उपक्रमांमुळे शेतकऱ्यांचे आत्महत्येचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार असून बळीराजा सुखावला जाईल हे खरे. शेवटी हे सरकार सामान्य जनतेचे सरकार आहे. लोकाभिमुख सरकार आहे हेच या निर्णयावरुन दिसते.

**विभागीय माहिती कार्यालय,**
**कोकण विभाग, नवी मुंबई**

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

क्राईम संध्या | सोमवार दि. १९ डिसेंबर २०२२ ते रविवार दि. २५ डिसेंबर २०२२ | लातूर/पालघर/सोलापूर | www.crimesandhya.com | ५

# १४ गुन्ह्यातील फरार आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेने केले जेरबंद; बारा लाखांचा ऐवज जप्त

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर ग्रामीणच्या स्थानिक गुन्हे शाखेने खून दरोडात जबरी चोरी अशा १४ विविध गुन्ह्यातील फरार असलेल्या आरोपीस जेरबंद करून त्यांच्याकडून १२ लाखांचा ऐवज जप्त केल्याची माहिती सोलापूर पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे. मयूर रामा भोसले (२४) असे अटक करण्यात आलेल्या आरोपींचे नाव आहे.




खून, दरोडा, जबरी चोरी, घरपोडी मोटरसायकलचोरी अशा १४ विविध गुन्ह्यात फरार असलेला आरोपी मोहोळ तालुक्यातील वटवटे येथील चौकात येणार असल्याची गोपनीय माहिती सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास मिळाले त्यानुसार पथकाने तात्काळ एका मालवाहतूक पिकअप वाहनात वेषांतर करून वटवटे येथे धाव घेतली त्या ठिकाणी पथकाने सापळा रचून आरोपीस जेरबंद केले. त्यांच्याकडे पोलिसांनी कौशल्यपूर्ण तपास करून मोहोळ, सांगोला, पंढरपूर आदी पोलीस ठाण्याच्या हद्दीत आरोपीने आपल्या साथीदारासह दरोडा, जबरी चोरी यासारखे गुन्हे दाखल केले आहेत. त्याच्याकडून दहा गुन्हे उघडकीस आले आहेत. मोहोळ येथील घरपोडी येथील दोनशे दहा ग्रॅमचे बारा लाखांचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे त्यांच्याकडून एक अवैद्य देशी बनावटीचे पिस्तूल व दोन चोरीच्या मोटरसायकली जप्त करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेच्या दुसऱ्या पथकाने घरपोडी करणाऱ्या आंतरराज्य गुन्हेगाराला जेरबंद करून पाच गुन्हे उघडकीस आणण्यात यश आले आहे. त्यांच्याकडून सव्वा लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला, बंड्या ऊर्फ बंदेनवाज मधुकर पवार (२२) व निशांत विशाल शिंदे (२०) अशी अटक करण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. ही सदरची कारवाई सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव, स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुहास जगताप यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल संनगले, फौजदार सुबोध जमदाडे, सहाय्यक फौजदार खाजा मुजावर, शिवाजी घोळवे, विजया मोहिते, गोलेकर, कारटकर, गाडे, मोहन मनसावाले पोलीस नाईक रवी माने, अनिस शेख, अंनिसा शेख, अक्षय दळवी आदींनी केले आहेत.

**बनावट नोटा प्रकरणी चौघांना पोलीस कोठडी**

माढा तालुक्यातील कुर्डूवाडी येथे पाचशेच्या बनावट नोटा बनवणाऱ्या टोळीतील चौघांना आतापर्यंत अटक करण्यात आली असून त्यांना १५ डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे. हर्षल शिवाजी लोकरे, सुभाष दिगंबर काळे, प्रभाकर व गणेश सदाशिव शिंदे, पप्पू भारत पवार (३०) अशी आरोपींची नावे आहेत. त्यांच्याकडून पाचशेच्या ११७३ नोटा बनावट नोटात जप्त केल्याची माहिती सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी दिली आहे.

# रेणापूर येथील राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्त्यांचा भाजपामध्ये प्रवेश!

**लातूर/प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून रेणापूर आणि तालुक्यात होत असलेल्या विकास कामावर प्रभावित होऊन भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. रमेशआप्पा कराड साहेब यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसचे रेणापूर शहर युवा अध्यक्ष उत्तम चव्हाण यांच्यासह अनेकांनी भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला. आ. रमेशआप्पा कराड साहेब यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसचे रेणापुर शहर युवा अध्यक्ष उत्तम चव्हाण, विकास चव्हाण राष्ट्रवादीचे विद्यार्थी आघाडीचे शहराध्यक्ष सुरज फुलारी, उत्तम राठोड, आशिष राठोड, नेताजी चव्हाण, बालाजी राठोड, कारभारी चव्हाण, मनोज चक्रे यांच्यासह अनेकांनी भारतीय जनता पार्टी जाहीर प्रवेश केला.

प्रवेश केलेल्या सर्व कार्यकर्त्यांचे भारतीय जनता पार्टीत स्वागत करून यावेळी बोलताना भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ.रमेशआप्पा कराड म्हणाले की, देशामध्ये पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी साहेबांच्या नेतृत्वात देशात आणि मा देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या नेतृत्वात भाजपाचे सरकार सत्तेत आले आहे. केंद्र आणि राज्य या दोन्ही शासनाच्या माध्यमातून सामान्यांना दिलासा देणाऱ्या त्याचबरोबर गावागावात सर्वांगीण विकासाच्या योजना सुरू केल्या आहेत राज्याचे. उपमुख्यमंत्री मा. देवेंद्रजीं फडणवीस साहेब यांच्या नेतृत्वात रेणापूर शहर आणि तालुक्याबरोबरच लातूर ग्रामीण मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही सदैव कटीबद्ध असून, प्रवेश केलेल्या सर्व कार्यकर्त्यांना भारतीय जनता पार्टीमध्ये निश्रि्चत न्याय दिला जाईल असे बोलून दाखविले. भाजपाच्या लातूर येथील संवाद कार्यालयात झालेल्या पक्ष प्रवेश प्रसंगी रेनापुर चे माजी नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, रेणापूरचे शहराध्यक्ष दत्ता सरवदे माजी तालुकाध्यक्ष श्रीकृष्ण जाधव, पद्माकर चिंचोलकर, रेणापुरचे माजी सभापती विजय चव्हाण, उज्वल कांबळे, शेख अजीम, सोशल मीडिया जिल्हा संयोजक महेश गाडे, पानगावचे माजी सरपंच सुकेश भंडारे, प्रदीप राठोड, रमेश चव्हाण, अंतराम चव्हाण, लखन आवळे, शिवाजी जाधव, गणेश चव्हाण, दिलीप चव्हाण, पप्पू कुडके, सचिन शिरसकर, नंदकुमार मोटेगावकर, भरत राठोड, रावसाहेब राठोड, शरद जाधव, दिलीप राठोड, दीपक ठाकूर, रावसाहेब राठोड, सचिन लोकरे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# वडूनवघर ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी हर्षला पाटील



**भिवंडी/अभिजित हिरे**

तालुक्यातील वडूनवघर ग्रामपंचायतच्या उपसरपंच पदी हर्षला सचिन पाटील यांची बुधवारी बिनविरोध निवड करण्यात आली आहे.त्यांच्या निवडीने कार्यकर्त्यामध्ये आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामपंचायत वडूनवघरच्या कार्यालयात बुधवारी उपसरपंच पदासाठी निवडणूक आयोजित करण्यात आली होती.या निवडणुकीत उपसरपंच पदासाठी हर्षला पाटील यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने पिठासीन अधिकारी तथा सरपंच यांनी त्यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड जाहीर केली आहे.पाटील यांची निवड जाहीर होताच ग्राम पंचायतीचे माजी उपसरपंच सचिन गोरखनाथ पाटील यांनी त्यांना शुभेच्छा देत पुढील राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या. ग्रामपंचायत सदस्य कमिटी बरोबरच ग्रामस्थांनी माझ्यावर दाखविलेल्या विश्वासास कधीही तडा जाऊ न देता ग्राम विकासासाठी सदैव प्रयत्न करीत राहीन अशी प्रतिक्रिया नवनिर्वाचित उपसरपंच हर्षला पाटील यांनी व्यक्त केले आहे.

# सोलापूर शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी जप्त केला साडे सहा लाखांचा मुद्देमाल

**सोलापूर/प्रतिनिधी**

तुमच्या दूध वाल्याचा पाहुणा आहे असे सांगून महिल्याच्या गळ्यातील दागिने लुटणाऱ्या आंतरजिल्हा गुन्हेगारांच्या टोळीतील आरोपी अशोक उर्फ डॉन नामदेव गंगावणे (वय ३२), अशोक उर्फ कंट्या विश्वनाथ गंगावणे (वय २९), अनिल रघुनाथ बिरदवडे (वय ३४) या तिघांना सोलापूर शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून सोन्याचे दागिने व दोन मोटारसायकली असा सहा लाख पन्नास हजार रुपयांची मुद्देमाल जप्त करण्यात आली आहे असे सोलापूर शहर गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त डॉ. दिपाली काळे यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली.



सोलापूर शहरात सप्टेंबर, ऑक्टोबर, नोव्हेंबर महिन्यात जेलरोड, फौजदार चावडी व जोडभावी पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बंगले व सोसायटीमध्ये राहणाऱ्या वृद्ध महिलांना मी तुमच्या दूध वाल्यांचा पाहुणा आहे दूध वाल्याने तुमच्यासाठी दुधाचा चिक (खरवस) पाठवला आहे. मुलीचे लग्न आहे त्यासाठी तिला तुमच्या गळ्यातील दागिन्यासारखे दागिने बनवायचे आहेत अशी विविध कारणे सांगून वृद्ध महिलांच्या गळ्यातील हातातील सोन्याचे दागिने जबरदस्तीने हिसका मारून चोरून नेण्याचे असे अनेक प्रकार घडले होते विजापूर रोडवरील नेताजी हाऊसिंग सोसायटीमध्ये राहणाऱ्या उर्मिला देविदास गोगी (वय ७५) यांच्या घरात २० नोव्हेंबर २०२० रोजी व त्यांचे पती देविदास, सून अनिता हे घरी असताना दोन अनोळखी चोरट्यांनी आम्ही तुमच्या पत्नीस ओळखतो आम्ही तुमच्या दूधवाला भोसले यांचा पाहुणा आहे आम्ही तुमच्यासाठी दुधाचा चिक आणला आहे त्यांना दुधाचे भांडे आणण्यास सांगितले. त्यावेळी उर्मिला गोगी या दुधाचे भांडे घेऊन आल्या दुधाचा चिक घेण्यासाठी वाकल्या त्या दोघांपैकी एकाने वृद्ध उर्मिला यांच्या गळ्यातील साडेतीन तोळ्याचे दागिने जबरदस्तीने हिसका मारून ओढून घेतले याची फिर्याद विजापूर नाका पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली होती. जबरी चोरीचा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी सोलापूर शहर गुन्हे शाखेचे अधिकाऱ्यांना आदेश दिले होते. त्यानुसार शहर गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुनील दोरगे यांनी घटनास्थळी भेट देऊन अधिकाऱ्यांना सूचना दिल्या होत्या. त्यानंतर गुन्हे शाखेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी खबऱ्यामार्फत माहिती काढली व आरोपींची नावे निष्पन्न केले सहाय्यक पोलीस निरीक्षक दादासाहेब मोरे व जीवन निरगुडे यांच्या पथकातील कर्मचारी यांच्या मदतीने आरोपी अशोक उर्फ डॉन गंगावणे, अशोक उर्फ कंट्या गंगावणे व अनिल बिरदवडे या तिघांना अटक केली त्यांच्याकडून चोरीतील सोन्याचे दागिने व दोन मोटरसायकली असा सहा लाख पन्नास हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पाच गुन्हे उघडकीस आणले. ही सदरची कामगिरी सोलापूर शहर पोलीस आयुक्त डॉ राजेंद्र माने, पोलीस उपायुक्त डॉ दिपाली काळे यांच्या मार्गदर्शनाखाली शहर गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुनील दोरगे यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक दादासाहेब मोरे, जीवन निरगुडे व पोलीस कर्मचाऱ्यांनी पार पाडले.

# कॅरम स्पर्धेत नितीन जाधव, ऋषीकेश सुगावे विजयी

## माईर्स एमआयडीएसआर दंत महाविद्यालयात आरंभ क्रीडा संमेलन

**लातूर/प्रतिनिधी**



लातूर येथील एमआयडीएसआर दंत महाविद्यालयात घेण्यात आलेल्या बुद्धिबळ स्पर्धेतील अंतिम सामन्यात बी. डी. एस. आंतरवासिता डॉ. नितीन भानुदास जाधव, ऋषीकेश बस्वराज सुगावे यांनी विजय मिळवून प्रथम क्रमांक पटकावला तर श्रुती शशीकांत देशमुख, सोनाली उध्दवराव सुर्यवंशी यांनी व्दितीय क्रमांक मिळवला आहे. विजेत्या खेळाडूंचा एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश कांबळे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देवून सत्कार करण्यात आला. यावेळी उप प्राचार्य डॉ. यतीशकुमार जोशी, कार्यालयीन अधिक्षक बळीराम हांडगे, सांस्कृतीक समिती प्रमुख डॉ. वर्षा सांगळे, क्रिडा विभाग प्रमुख डॉ. सुजित झाडके, महिला क्रिडा विभाग प्रमुख डॉ. प्रज्ञा भटनागर, संयोजक डॉ. माधुरी आग्रवाल, समिती सदस्य डॉ. शशी पाटील, डॉ. अजित शिंदे, डॉ. योगेश नागरगोजे उपस्थित होते. एमआयडीएसआर दंत महाविद्यालयात आरंभ क्रीडा संमेलन २०२२' अंतर्गत घेण्यात आलेल्या कॅरम स्पर्धेत एकुण १५ सामने झाले. या मधील चार संघात उपांत्य फेरीत होऊन डॉ. नितीन जाधव, ऋषीकेश सुगावे व श्रुती देशमुख, सोनाली सुर्यवंशी या दोन संघात अंतीम सामना झाला. या मध्ये डॉ. नितीन जाधव, ऋषीकेश सुगावे यांनी विजय मिळवला.

# उत्तमचंद मंगनीराम गेल्डा यांचे निधन

**लातूर/प्रतिनिधी**

लाहोटी परिवारातील अत्यंत विश्वासू लेखापाल उत्तमचंद मंगनीराम गेल्डा वय वर्ष ७८ यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, ३ भाऊ, पत्नी, मुलगा, मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. लातूर येथील मारवाडी स्मशानभुमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सीए तेजमल बोरा, भाजपाचे माजी शहराध्यक्ष शैलेश लाहोटी, तसेच लातूर येथील नामवंत वकील, डॉक्टर, पत्रकार यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.


**जिल्हा परिषद पालघर**

**ग्रामीण पाणीपुरवठा विभाग**

जा.क्र.:पाजिप/पापुवि/निविदा/४६/२०२२ दिनांक : १३/१२/२०२२

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांच्या वतीने कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद पालघर यांचेकडील जलजीवन मिशन कार्यक्रम २०२१-२२ अंतर्गत जव्हार तालुका मौजे कौलाळे येथे नवीन नळ पाणी पुरवठा योजना करणे.जि. पालघर Online द्वारे निविदा मागविण्यात येत आहे.

- विस्तृत माहिती व सविस्तर निविदा प्रपत्रे हे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- सदरची निविदा दिनांक १३/१२/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून दिनांक १४/१२/२०२२ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत Download करता येतील.
- यापुढील सर्व शुद्धीपत्रक अथवा इतर माहिती ही http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरूनच प्रसिद्ध केली जाईल.

निविदा अटी शर्तीमध्ये बदल करणे. प्राप्त निविदेपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. पालघर यांनी राखून ठेवला आहे.

सही/-
(जी.पी. निवडंगे)
कार्यकारी अभियंता
ग्रामीण पाणीपुरवठा विभाग
जिल्हा परिषद, पालघर



**वसई-विरार शहर महानगरपालिका**

**प्रभाग समिती 'आय' कार्यालय, वसई**

**जाहिर नोटीस**

वसई-विरार शहर महानगरपालिका सर्व नागरिकांना सुचित करण्यात येते की, खालील नमूद मिळकत धारकांनी मामलत्ता हस्तांतरण करणेकामी लेखी अर्ज तसेच कागदपत्रे प्रभाग समिती-आय कार्यालयात सादर केली आहेत. उक्त फेरफार प्रकरणी कोणतीही हरकत/तक्रार असल्यास त्यांनी कार्यालयात जाहीर नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासून ७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात कागदपत्रासह नोंदवावी. सदर बाबतीत कोणतीही हरकत/तक्रार न आल्यास कार्यालयामार्फत पुढील मालमत्ता हस्तांतरणाची कार्यवाही करण्यात येईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्रमांक | ज्याचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजेच विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|
| १. | वसई | VV10/8503 | मिश्री अजमद जे रहेमान | अनफाल मेहमूद मिस्त्री |
| २. | वसई | VV14/12072 | काशिनाथ शिनवार मथुरेकर | मिरा काशिनाथ मथुरेकर |
| ३. | वसई | VV17/13905 | विनोद आयोध्या साव | पोपट विठ्ठल करे |
| ४. | वसई | VV10/8860 | गोपाळ सिंग खाती | प्रथमेश मेघःश्याम राऊळ/ अंकिता प्रथमेश राऊळ |
| ५. | मुळगांव | ML01/251 | मेरीबाई आलेक्स घोन्सालविस | ऑज्वन आलेक्स घोन्सालवीस/ अनिता जॉन्सन लेमॉस/ लेसी ऑस्लर डिमेलो |
| ६. | मुळगांव | ML01/199 | इस्टेप जॉन परेरा | टोनी स्टीफन परेरा/ लविना टोनी परेरा |
| ७. | उमेळा | UL01/590/17 | नोव्हेल रेमंड डिसोझा | जयवंत नामदेव उईके |
| ८. | उमेळा | UL01/836 | अजित गणेश चौधरी/रेखा | उत्पल अजित चौधरी |
| ९. | उमेळा | UL01/905/1 | महेंद्र कृष्णा शेलार | प्रसाद कृष्णा शेलार/ प्रणीता प्रसाद शेलार |
| १०. | उमेळा | UL01/1132/31 | थीम कंन्स्ट्रक्शन | अरुलराज दुरईस्वामी |
| ११. | उमेळा | UL01/996/6 | चंद्रशेखर दशरथ कटके | विजय सुरेश उन्नतेकर |
| १२. | उमेळा | UL01/759/10 | मेल्वीन मेंडोसा | मायरा स्टीफन फरेरा |
| १३. | उमेळा | UL01/733 UL01/734 | प्रिसिला बेनेडीक्ट परेरा | प्रिबेन बेनेडिक्ट परेरा |
| १४. | उमेळा | UL01/611/2 | रघुनाथ विष्णू काळे | जय रघुनाथ काळे |
| १५. | उमेळा | UL01/271/3 | शरद रामचंद्र चौधरी | कुणाल शरद चौधरी |
| १६. | उमेळा | UL01/133 | दत्तात्रेय जिवन राऊत | किरण दत्तात्रय राऊत/रुपेश दत्तात्रय राऊत |
| १७. | उमेळा | UL01/434/16 | किथ घोन्सालविस | तृषांत राजकुमार भावसार |
| १८. | उमेळा | UL01/445/1 | ओल्गा लोबो | तृषांत राजकुमार भावसार |
| १९. | वसई | VV10/5092 | ॲलन सेबेस्टीन कुटीन्हो | ब्रायल सेबेस्टीन कुटीन्हो |
| २०. | वसई | VV10/15606 | परेष एस. ठक्कर | महेंद्र मुनिम गुप्ता/ धनराज मुनिम गुप्ता |
| २१. | वसई | VV16/14249 | जलिल अहमद अमीर शेख | मोहम्मद उस्मान मोहम्मद मुजम्मील मोमिन |
| २२. | वसई | VV11/7094 | फ्रांसीस पेद्रू पांग्या | प्रितम पेद्रू भरको |

जा.क्र. : वविशम/कर विभाग/वसई/४६६/२०२२-२३
दिनांक : १५/१२/२०२२

सही/-
प्र.सहा.आयुक्त
प्रभाग समिती 'आय'
वसई-विरार शहर महानगरपालिका

पान १ वरून...

## समजावण्याचे सर्व प्रयत्न फोल...

पणाने वागणारी होती.एकदा दोनदा सीतारामने तिला पैशाची मदत केल्याने ती त्याच्या नादाला लागली होती. गावातून चाफळला जाताना ती त्याच्याच वडापमधून जात येत होती. त्यामुळे त्याचा आणि तिचा संपर्क वाढला होता. ती चालू असल्याचे सीतारामला माहित होते. म्हणून तो ही तिच्यावर गळ टाकून होता. गावातील एका दुसऱ्या माणसाला ती लागली आहे हे देखील त्याला माहित होते. परंतु त्याला ती त्या कामासाठी पाहिजे असल्याने तो तिच्या मागे लाळ घोळीत होता. ती त्याच्या वडापमधून येत जात असल्याने ती ही त्याला भावोजी म्हणून बोलवित होती. एकदा तिला पैशाची गरज होती. ती गरज सीतारामने काढली होती. त्यावेळी सीताराम याच्याकडे पैसे असतात आणि त्याच्या मनात आपल्या विषयी काय आहे हे तिने ओळखले होते. तिने घेतलेले पैसे त्याला परत दिले नव्हते. त्याने ही ते पैसे तिच्याकडे मागितले नव्हते. यातूनच दोघांनीही काय समजायचे ते समजले होते. त्याला कुठे भाडे नसले की ती त्याला मुद्दामच कुठे तरी घेऊन जायची. ते दोघे बाहेर गेले की गाडीतच एकमेकाला चिकटून बसून बोलत होते. गुलगुलू गप्पा मारत होते. सीतराम हा तिच्या दृष्टीने पैशाचा खजिना होता. तिने पैसे मागायचे आणि त्याने दयायचे असा त्याचा अलिखित नियम होता. त्या बदल्यात तो आपले शरीर मागणार हे देखील तिला माहित होते. अशा संबंधात अडकलेली माहिला ही जशी चालू असते तशी ती तेवढी हुशार ही असते. चमडी देऊन दमडी कशी काढायची हे तिला चांगले माहित असते म्हणून ती सुरूवातीला पुरूषाला आपल्या दोन बोटावर खेळवत असते. तशी सुनिता ही होती. तिला त्या कामासाठी सीताराम पाहिजे होता. पण मुद्दामच ती त्याला खेळवत होती.तो पण तेवढाचा चालू होता. त्याला ही दमडी देऊन चमडी कशी मिळवायची हे चांगले माहित होते. म्हणून तो ही संधीच्या शोधात होता. एकदा तशी त्याला संधी मिळाली. तिने त्याला फोन करून त्याची गाडी एका कामासाठी पाहिजे आहे बाहेर येणार का म्हणून विचारले? तो तयारच होता. तिच्यासाठी त्याने गाडी बाहेर काढली. दिवसभर तिचे काम झाल्यावर ते दोघेजण गाडीतून येत असताना रात्री ८ ते ९ च्या दरम्यान त्याने गाडी आडरानात घेतली. गाडीतच त्यादोघांनी आपला तो कार्यक्रम आटोपला.त्याला पाहिजे ते तिने दिले. तो ही तिच्यावर खुश झाला.त्यावेळेपासून त्या दोघांचे संबंध आधिकच वाढले. सुनिताची कमसीन जवानी लुटायला तो कमी पडत नव्हता. इकडे तिचा नवरा नारायण हा काही ही कामधंदा न करता दिवसभर दारू पिऊन राहत होता. त्यामुळे तिला नवऱ्यात काही इंटेरस्ट राहिला नव्हता. तिच्या दृष्टीने तो बिनकामाचा नवरा होता.त्या कामात ही तो कमी पडत होता. त्यामुळे ती आपली कसर सीतारामकडून पुर्ण करून घेऊ लागली होती. ते दोघे ही मिळेल तेथे मिळेल त्यावेळी संधी साधून ते सुख घेऊ लागले. या गोष्टीची कुणकुण गावातील काही जणांना लागली होती. बहिरेवाडी गाव तसे छोटेसे गाव. गावात एकादी सुई जरी पडली तरी त्याचा आवाज इतरांना येत होता.सुनिता ही सीतारामला लागली आहे याची चर्चा गावात होत असताना ही चर्चा नारायणच्या कानावर पडली होती.तो अशधीच दारू पित असल्याने दारूच्या नशेत तो घरी येऊन याचा जाब तो पत्नी सुनिताला विचारीत होता. त्यातच तो शिव्या देऊन तिला मारहाण करू लागला की तो उलट त्याच्याच नावाने बोंब ठोकून तू काही कामाचा नाहीस तुझ्यात दम नाही असे म्हणत त्याच्या मर्दानगीवर बोट ठेवीत होती. आपल्या पत्नीचे गावातीलच दोघाबरोबर संबंध असल्याचे त्याला समजल्यावर तो सैरभैर झाला. त्याला आपल्या जीवनात काही नाही असे वाटत होते.तो आता तर जास्तच दारू पिऊ लागला होता. तरीही तो बायकोला नीट वाग कोणाचा संसार मोडू नकोस असे सांगत होता.पण त्याचे सांगणे ही तिच्यासाठी पालथ्या घड्यावरचे पाणी होते. ती उलट जास्त त्या दोघाबरोबर गुलर्छरे उडवित होती. आपल्या पत्नीच्या सैर वागण्याने तो वैतागलेला होता. ती समाजावून सांगून ही ऐकत नाही म्हणून त्याने सीताराम देसाई याला देखील भेटून माझ्या बायकोचा नाद सोड नाही तर त्याचे परिणाम गंभीर होतील असे सांगितले.पण तो ही त्याचे काही ऐकत नव्हता. सीतारामला ताकीद दया म्हणून त्याने सीतारामची पत्नी संगिता देसाईला ही भेटून तुझ्या नवऱ्याला माझ्या बायकोचा नाद सोड म्हणुन सांग असे सांगितले होते.तिला ही तिच्या नवऱ्याचे गुण माहित असल्याने तिने त्याया सांगण्याकडे पुर्ण दुर्लक्ष केले होते. दोघे ही सांगून ऐकत नाहीत त्यातून आपली गावात बदनामी होत आहे हे बघून नारायण मनातून सीताराम आणि त्या दुसऱ्या इसमावर चिडून होता. तो दोघांची ही गेम करण्याच्या विचारात होता.त्याची गेम करून आपण आत्महत्या करावी असा त्याने विचार केला होता.

त्या दोघांनीच आपल्या जीवानाची वाट लावली आहे आपल्या सुखी संसारात विष कालवले आहे असा त्याने विचार केला.सीतारामचा काटा काढायचा कसा याचा त्याने पुर्ण विचार केला. तो गावाबाहेरच्या घरात रात्री एकटाच झोपायला असतो हे त्याला माहित होते. शुक्रवार दि.९ डिसेंबर २०२२ रोजी रात्री त्याने फुल्ल दारू पिली. दारूच्या नशेत त्याने त्या रात्री घरात सुनिताबरोबर भांडण काढून तिला मारहाण केली.ती त्याला त्याकामासाठी जवळ ही घेत नसल्याने याचा ही राग त्याच्या मनात येत होता. ही दोघा दोघाच्या बरोबर झोपणार आणि मला उपाशी ठेवणार म्हणत त्याने वेगळाचा विचार केला.तो रात्री २च्या दरम्यान तसाच झोपेतून उठला. तडक तो गावाबाहेर असणाऱ्या सीतारामच्या जनावरांच्या गोठयाकडे आला.त्याच्या डोक्यात वेगळाच विचार येत होता.त्याने गोठयात येऊन बघितले असता सीताराम हा गाढ झोपत असल्याचे त्याला दिसले. त्याने त्याला झोपेतून उठविले तो डोळे चोळत उठला इतक्या रात्री आपल्याला कोण झोपेतून उठवित आहे याचा त्याला अंदाज आला नाही. डोळे चोळत असताना त्याच्या समोर नारायण मोडे हा उभा होता. तो रागाने लालबुंध झाला होता. नारायण त्याला शिव्या देत असताना त्याने त्याची गळफाट फकडली. सीतारामला ही काही कळाले नाही. नारायण त्याला मारहाण करीत असताना तो अंधारात खाली पडला. नेमके हिच संधी साधून नारायण याने बाजुलाच पडलेला एक लाकडी दांडका उचलला आणि सीतारामच्या डोक्यात जोराने हाणला.त्यासरशी तो ओरडत तडफडत लोळू लागला. पण जवळ कुणी नसल्याने त्याच्या मदतीला ही कुणी येणारे नव्हते. एवढयावरच न थांबता नारायण याने बाजुलाच पडलेली वीट आणि दगड त्याच्या डोक्यात रागाने घालत मर साल्या माझ्या बायकोच्या नादाला लागतोस काय? म्हणत त्याच्यावर प्रहार केला. त्याच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्तस्राव झाल्यावे त्याचा जागीच मृत्यू झाला.ही गोष्ट त्याच्या लक्षात आल्यावर त्याने तेथून पळ काढला. दुसऱ्या दिवशी सकाळी पाण्याला जाणाऱ्या काही बायकांच्या लक्षात ही गोष्ट आल्यावर त्यांनी या घटनेची माहिती सीताराम देसाई यांची पत्नी संगिता देसाई हिला दिली.काही वेळात खूनाच्या या घटनेची माहिती गावात कळताच गावातील लोकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली. घटनास्थळी रडा रडी चालू होती. कुणी तरी या घटनेची माहिती चाफळ मल्हारपेठ पोलीसांना दिल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळी रक्ताच्या थारोळ्यात सीतारामचा मृतदेह पडला होता. बाजुलाच लाकडी दांडके आणि रक्ताने माखलेली वीट पडली होती. पोलीसांनी घटनास्थळचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी चाफळ येथील रुग्णायलयात पाठवून दिला. या घटनेची माहिती पोलीसांनी मयत सीतारामची पत्नी संगिता देसाई याच्याकडून घेतली असता ही घटना कोणत्या कारणातून आणि कुणी केली आहे याचा अंदाज पोलीसांना आला. मयत सीतारामचे नारायण मोडे याच्या पत्नीशी संबंध असल्याची माहिती पोलीसांना मिळाली होती. या घटनेनंतर संशयीत नारायण मोडे हा घटनास्थळावरून पळून गेला होता. पोलीसांनी घटनास्थळी श्वान पथकाला पाचारण केले. परंतु श्वान थोडया पुढे जावून तेथच घुटमळले. पोलीस त्याचा शोध घेत असताना तो गावाबाहेरील गणेशवाडी जंगलात लपून बसला असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. रात्र भर तो जंगलात एका झाडावर बसला होता.पोलीसांनी त्या जंगलात त्याचा शोध घेऊन त्याला ताब्यात घेतले. त्याला पोलीस स्टेशनला आणून या घटनेची चौकशी त्याच्याकडे केली असता त्याने मयत सीताराम देसाई याचे माझ्या बायकोशी संबंध होते म्हणून मी रागाच्या भरात त्याला लाकडी दांडक्याने मारहाण करून व त्याच्या डोक्यात वीट घालून त्याचा खून केल्याचे कबुल केले. त्याने आपल्या गुन्हयाची कबुली दिल्यावर पोलीसांनी मयत सीताराम देसाई याची पत्नी संगिता देसाई याच्याकडून या घटनेची लेखी फिर्याद लिहून घेतली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार सीताराम बबन देसाई (वय ४८) याच्या खून प्रकरणी नारायण तुकाराम मोडे (वय ४६) याच्या विरोधात मल्हारपेठ पोलीस ठाण्यात भा.दं.वी.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याला तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनवाली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेला लाकडी दांडा व वीट जप्त केले. या घटनेचा तपास पाटणचे पोलीस उपविभागीय अधिकारी विवेक लावंड, यांच्या मार्गदर्शनाखाली मल्हारपेठ पोलीस स्टेशनेचे स.पो.निरी. उत्तम भापकर, उप.निरी.अजित पाटील, मनोहर सुर्वे, सिध्दनाथ शेंडगे यांनी केला. पत्नीचा बाहेरख्यालीपणा पतीच्या लक्षात आला की तो सैर भैर होतो आणि होत्याचे नको ते करून बसतो. हेच या घटनेवरून दिसून येते. विवाहबाहय संबंध हे असेच असतात यातूनच अशा घटना या घडत असतात एवढे मात्र नक्की.

## पतीला ठार मारून हार्टफेलचा...

चंद्रपूर शहरातील आंबेडकर चौकात त्यांनी एक जनरल स्टोअर टाकले. या दुकानावर कधी ते कधी त्यांची पत्नी रंजना बसत असे. त्यांच्या दोन्ही मुली श्वेता आणि योगेश्री या नागपूर येथे रहात होत्या. मोठी मुलगी श्वेता ही नागपूरच्या एका मॉलमधे नोकरी करत होती. दोन्ही मुली नागपुर येथे असल्यामुळे इकडे चंद्रपूरला शाम रामटेके आणि त्यांची पत्नी रंजना असे दोघेच जण रहात होते. शाम रामटेके यांचे वय ६६ वर्ष होते. याउलट त्यांची पत्नी रंजना हिचे वय जेमतेम पन्नाशीकडे झुकले होते. चंद्रपूर शहरातील आंबेडकर नगर परिसरात रामटेके दाम्पत्याचे जनरल स्टोअर आहे. या जनरल स्टोअरजवळच मुकेश त्रिवेदी याचे फळ आणि बांगड्या विक्रीचे दुकान आहे. दोन्ही दुकाने जवळ जवळ असल्यामुळे रंजना रामटेके आणि मुकेश त्रिवेदी यांच्यात नजरानजर झाली. बघता बघता दोघांमधे प्रेमसंबंध झाल्याची चर्चा देखील सुरु झाली. दोघांच्या प्रेमाचा सिलसिला थांबत नसल्याचे म्हटले जात होते. बघता बघता फळ दुकानदार मुकेश त्रिवेदी हा रामटेके यांच्या घरी देखील येवू लागला. रंजना आणी मुकेश यांच्यात गप्पांचा फड रंगू लागला. ही बाब परिसरातील लोकांना खटकत होती. मात्र उघडपणे कुणी बोलत नव्हते. ६ ऑगस्ट २०२२ चा तो दिवस उजाडला. या दिवशी रामटेके दाम्पत्याची नागपूर येथे राहणारी मुलगी श्वेता ही आपल्या नोकरीच्या ठिकाणी मॉलमधे जाण्याची तयारी करत होती. मॉलमधे जाण्याची तिची तयारी सुरु असतांनाच तिला तिची आई रंजना हिचा फोन आला. आई रंजनाचा फोन असल्यामुळे तिने तो पटकन उचलला. श्वेता आज सकाळीच तुझे बाबा आपल्याला सोडून गेले. पहाटे पहाटे त्यांच्या छातीत वेदना सुरु झाल्या. मी त्यांच्याजवळ जाण्यापुर्वीच ते गेले असे पलीकडून रंजनाने रडत रडत फोनवर श्वेताला म्हटले. आपल्या वडीलांचे निधन झाल्याचे समजताच तिने लहान बहिण योगेश्री हिच्यासोबत चंद्रपूर गाठले. दोन्ही मुली आल्यानंतर शाम रामटेके यांच्यावर अंत्यसस्कार करण्यात आले. वडील गेल्यानंतर एकाकी पडलेल्या आईची देखभाल करण्यासाठी श्वेताने लहान बहिण योगेश्रीला तिच्याकडेच राहण्याचा सल्ला दिला. त्यामुळे रंजना रामटेके हिची लहान मुलगी योगेश्री आता नागपूर सोडून आईजवळ चंद्रपूर येथे राहण्यास आली. पती निधनानंतर काही दिवस बंद असलेले जनरल स्टोअर रंजना रामटेके हिने पुन्हा सुरु केले. घरातील कामे मुलगी योगेश्रीवर सोपवून ती दुकानावर जात होती. शाम रामटेके यांच्या निधनानंतर जवळपास तिन महिन्यांचा कालावधी उलटला. या तिन महिन्यातच योगेश्रीला आपल्या आईच्या वागण्यात – बोलण्यात बदल दिसू लागला. त्यांच्या दुकानाजवळ फळ आणि बांगड्यांचे दुकान चालवणारा मुकेश त्रिवेदी त्यांच्या घरी येवू लागला. मुकेश घरी आला म्हणजे रंजनाची कळी खुलत असे. तिच्या चेह–यावर समाधानाची लकेर दिसून येत होती. नेमकी हिच गोष्ट योगेश्रीला खटकत होती. आपल्या आईसोबत मुकेश तासनतास गप्पा का मारतो? आपली आई त्याला एवढा प्रतिसाद का देते? हा देखील प्रश्न योगेश्रीला पडत होता. एकेदिवशी योगेश्रीने तिची आई रंजनाला दिलेला मोबाईल फोन आपल्या ताब्यात घेतला. आपल्या आईने कुणाकुणाला कॉल लावले याची तिने सहज पडताळणी केली. ६ ऑगस्ट २०२२ रोजी मुकेश त्रिवेदीसोबत झालेल्या एका कॉलने तिचे लक्ष वेधून घेतले. भल्या पहाटे दोन वाजेच्या सुमारास झालेला तो कॉल तिला संशयास्पद वाटला. याचे कारण म्हणजे तो कॉल जवळपास अकरा मिनीटांचा होता. याच दिवशी ६ ऑगस्ट रोजी तिच्या वडीलांचे म्हणजे शाम रामटेके यांचे निधन झाले होते. या दिवशी आपल्या आईचे मुकेश त्रिवेदीसोबत एवढे काय महत्वाचे काम होते असा प्रश्न तिला सतावू लागला. योगायोगाने तो कॉल त्या मोबाईलमधे रेकॉर्ड झाला होता. तिने ते कॉल रेकॉर्डींग ऐकले आणि तिला धक्काच बसला. आपल्या वडीलांच्या मृत्यूचे रहस्य तिला या कॉल रेकॉर्डींगमधून समजले. आपल्या वडीलांचा मृत्यू हा हृदयविकाराने नसून त्यांना झोपेच्या गोळ्या देण्यात आल्या होत्या. याशिवाय त्यांच्या तोंडावर आपल्याच आईने उशी दाबून त्यांना ठार केल्याचे या ऑडीओ क्लिपच्या माध्यमातून उघड झाले. तिने ती कॉल रेकॉर्डींग बारकाईने पुन्हा पुन्हा ऐकली. त्यानंतर तिने हा प्रकार नागपुरची मोठी बहिण श्वेताच्या कानावर टाकला. आपल्या वडीलांची हत्या आपल्याच आईने केल्याचे समजल्यानंतर श्वेताच्या मनाला मोठा धक्का बसला. दरम्यान योगेश्रीने ती ऑडीओ क्लिप आपल्या मोबाईलमधे ट्रांसफर करुन घेतली. मुकेश त्रिवेदीसोबत आपल्या आईचे असलेले प्रेमसंबंध या ऑडीओ क्लिपच्या माध्यमातून दोघा बहिणींना समजले होते. प्रेमसंबंधातील अडथळा दूर करण्यासाठी रंजना हिने पद्धतशीरपणे शामचा काटा काढला होता. मात्र कॉल रेकॉर्डींगमुळे हा प्रकार तिन महिन्यानंतर का होईना उघड झाला होता. आपल्या वडीलांचा मृत्यू नैसर्गीक नसून त्यांची हत्या झाल्याची खात्री दोघा बहिणींना झाली होती. दोघा बहिणींनी ब्रम्हपुरी पोलिस स्टेशन गाठत पोलिस निरीक्षक रोशन यादव यांची भेट घेत त्यांना ऑडीओ क्लिप ऐकवली. वडील शाम रामटेके यांच्या हत्येप्रकरणी दोघा बहिणींनी दिलेल्या तक्रारीनुसार ब्रह्मपुरी पोलीस स्टेशनला १२ नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. रंजना शाम रामटेके आणि मुकेश राजबहादूर त्रिवेदी या दोघांविरुद्ध गु.र.न. ५६३/२२ भा.द.वि. ३०२, २०१, १२० (ब) आणि ३४ नुसार दाखल गुन्ह्याचा तपास सुरु करण्यात आला. मोबाईलमधील कॉल रेकॉर्डींगची ऑडीओ क्लिप या एकमेव पुराव्यावर दोघा संशयीतांना ताब्यात घेत अटक करण्यात आली. पोलिस कोठडी दरम्यान रंजना आणि मुकेश यांनी आपले प्रेमसंबंध कबुल केले. शाम रामटेके याचा अडथळा दूर साराण्यासाठी मुकेशने रंजनाला झोपेच्या दहा गोळ्या आणून दिल्या होत्या. तिने चहामधून त्या गोळ्या शाम यास दिल्या होत्या. चहामधून झोपेच्या गोळ्या घेतल्यानंतर शाम रामटेके यास लवकरच गाढ झोप लागली. गाढ झोपेत असतांनाच रंजनाने पती शाम याच्या नाका–तोंडावर उशी दाबून त्यास ठार केले. त्यानंतर रंजनाने आपले काम पुर्ण झाल्याचे सांगण्यासाठी मुकेशला फोन लावला. तो खरंच मेला का? त्याची छाती वाजते का हे तपासण्याचा सल्ला मुकेशने रंजनाला दिला होता. या सर्व संभाषणाची ऑडीओ क्लिप मोबाईलमधे रेकॉर्ड झाली होती. ती ऑडीओ क्लिप रंजनाची मुलगी योगेश्रीच्या हाती लागली आणि गुन्हा उघडकीस आला. आपल्या हातून झालेला खून पचला अशी दोघांची समजूत झाली होती. मात्र उशिरा का होईना सत्य बाहेर आले. अटकेतील दोघांची रवानगी जिल्हा कारागृहात करण्यात आली असून या गुन्ह्याचा पुढील तपास डीवायएसपी मल्लिकार्जुन इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली ब्रह्मपुरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रोशन यादव आणि त्यांचे सहकारी करत आहेत. सोळा वर्षाच्या मुलींचा पाय घसरण्याची दाट शक्यता असते. तारुण्याच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या मुलींकडून कळत नकळत एखादी घोडचूक होत जाते. या कालावधीत पालकांची जबाबदारी वाढलेली असते. मात्र असे असले तरी रंजना सारख्या काही विवाहीत महिलांचा वयाच्या पन्नाशीत पाय घसरतो हे देखील एक वास्तव आहे. पती पत्नीच्या वयातील मोठे अंतर हे या गुन्ह्याचे कारण म्हणता येईल. रंजनाचा पती शाम यांचे वय ६६ वर्ष आणि रंजनाचे वय पन्नाशीच्या आसपास होते. दोघांच्या वयात जवळपास पंधरा ते सोळा वर्षाचे अंतर होते. हे सोळा वर्षाचे अंतर रंजना रामटेके या विवाहीतेला कदाचीत पर पुरुषाकडे आकर्षित होण्यास कारणीभुत ठरले असावे. लग्न संस्कारच्या माध्यमातून महिलांना पत्नीचा दर्जा मिळत असतो. पतीच्या रुपाने महिलांना समाजमान्य कायदेशीर कवच प्राप्त होते. मात्र ते कवच तोडून काही विवाहित महिला पर पुरुषाच्या नादी लागतात आणि आपले आयुष्य खराब करुन घेतात. चंद्रपूरच्या रंजना रामटेके या पन्नाशी गाठलेल्या विवाहीतेचे पाऊल वाकडे पडले. मोबाईलमधील कॉल रेकॉर्डींग ऑडीओ क्लिपमुळे तिच्या नशीबी जेलमधे जाण्याची वेळ आली.

## बीलोशी येथील महिंद्रा रोझीन कंपनीत दोन कामगारांचा मृत्यू




**वाडा** : वाडा तालुक्यातील बीलोशी येथील महिंद्रा रोझीन अँड टर्पेटाईन प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीतील अनुभट्टी मध्ये साफ सफाईसाठी एक कामगार उतरला होता. आतील रसायानाच्या वासामुळे त्याचा जीव गुदमरल्याने त्याने जीव वाचवण्यासाठी आरडा ओरड केली त्याचा आवाज ऐकून दुसरा कामगार अनुभट्टीत उतरला मात्र त्याचाही जीव गुदामाऱ्याने दोघांचाही मृत्यू झाला. मंगळवारी रात्री नऊ वाजताच्या सुमारास ही घटना घडली असून सचिन बाळकृष्णा भोईर (वय ३४) रा. बीलोशी व किशोर फरले (वय२७ ) रा. गोऱ्हा असे मयत झालेल्या कामगारांची नावे आहेत. कंपनी प्रशासना कडून कामगारांच्या सुरक्षेसाठी कोणतीही साधन सामग्री नसल्याने या कामगारांचा मृत्यू झाला असल्याचे सांगून त्यांच्या मृत्यूस कारणी भूत असलेल्या कंपनीची सखोल चौकशी करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थानी केली आहे. याप्रकरणी वाडा पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. अधिक तपास वाडा पोलीस करत आहेत.

पान ८ वरून...

## जिल्हा परिषद मुख्यकार्यकारी पदाचा ...

कार्यकारी अभियंता सुनील कटकधोंड, समाज कल्याण अधिकारी सुनील खमीतकर, जिल्हा कृषी अधिकारी विवेक कुंभार, कार्यकारी अभियंता पंडित भोसले, ग्रामीण विकास यंत्रणा विभागाचे प्रभारी प्रकल्प संचालक उमेशचंद्र कुलकर्णी, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव, उमेद चे अभियान व्यवस्थापक सचिन चवरे, प्रमुख उपस्थित होते. या प्रसंगी उप शिक्षणाधिकारी सुधा साळुंखे व उप शिक्षणाधिकारी सुलभा वठारे यांना माध्यमिक शिक्षणाधिकारी पदी पदोन्नती मिळाले बद्दल स्वागत करणेत आले.

**नाविण्य उपक्रमाचे सातत्य टिकवा – सिईओ दिलीप स्वामी**

जिल्हा परिषदे च्या विभाग प्रमुख यांची बैठकीत आज सिईओ दिलीप स्वामी यांनी विविध राबविलेल्या ३८ अभियानाची माहिती देऊन या उपक्रमाचे सातत्य टिकवून ठेवा. नव्याने नियोजन करून दिलेल्या उमेद अभियान अंतर्गत महिला डेअरी प्रकल्पाची अंमलबजावणी करणेचे सुचना विभाग प्रमुख यांना दिल्या.

## ग्रामपंचायत निवडणूक मानधन वाढीसाठी...

महसूल विभागाचे तहसीलदार दत्तात्रय मोहोळे यांची समक्ष भेट घेऊन त्यांना निवेदनाची प्रत दिली व त्यांच्या मार्फत हे निवेदन राज्य निवडणूक आयोगाकडे पाठवण्याची विनंती केली. मोहोळे साहेबांनी तात्काळ याची दखल घेऊन सदर निवेदन राज्य निवडणूक कार्यालयाकडे पाठवण्याची कार्यवाही केली. यापूर्वी झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत आलेल्या अनुभव पाहता कर्मचाऱ्यांनी भत्ता मागितल्यानंतर तहलशीदार कार्यालयामार्फत तरतूद उपलब्ध नाही, आल्यावर खात्यावर जमा करू, फोन नंबर व बँक खाते नंबर दया अशी उत्तरे दिले जातात आणि नंतर ते मिळतच नाही. याकरिता कर्मचाऱ्यांना अल्पभत्यासाठी वारंवार हेलपाटे मारावे लागतात. संघटनेला पाठपूरावा करावा लागतो. त्यामुळे यंदा मतदान केंद्रावरच निवडणूक भत्ता दया असे या निवेदनात म्हटले आहे. यावेळी जिल्हा कार्यकारी अध्यक्ष विठ्ठल काळे, कार्याध्यक्ष संतोष जाधव, कोषाध्यक्ष राजकुमार खाडे, प्रवक्ता बालाजी जाधव, जेष्ठ नेते संभाजी फुले, अ. कोटचे अध्यक्ष अभिजित सुर्डीकर, दक्षिणचे अध्यक्ष सतिश वाले आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## भारतीय राज्यघटनेच्या मुल्यांना नष्ट ...

संविधानातील उद्देशिकेतील मानवी मूल्य जपली पाहिजेत व आपले अधिकार व कर्तव्यासोबत संविधानाचे महत्व आपल्या सर्वाना पुन्हा पुन्हा समजून घेण्याची गरज निर्माण झाली आहे म्हणून दिनांक २७ नोव्हेंबर २०२२ ते २६ जानेवारी २०२३ पर्यंत गावागावात, वस्त्यांमध्ये, पाड्यांमध्ये जाऊन संविधानाच्या उद्देशिकेच्या माध्यमातून प्रचार प्रसार केला जाणार आहे. संविधानामध्ये नमूद असलेल्या सर्वसामान्यांच्या उन्नतीच्या मार्गाचा उलगडा करून सांगण्यासाठी संविधान जागर जागृती अभियानाअंतर्गत संविधान निष्ठा यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील यात्रेत संविधानाचा रथ निघाला आहे. सदरील निष्ठा यात्रेचा शुभारंभ डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण मा.हरीभाऊ कांबळे, प्रदेश अध्यक्ष री पा ई डेमोक्रेटिक व मा.अब्दुल लतिफ शेख समाज सेवक यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रजा सुराज्य संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शरद अण्णा तिगोटे यांच्या हस्ते करण्यात आले. महापुरुषांना अभिवादन करून सुरवात करण्यात आली. सिध्दार्थ नगर, कोर्ट नाका, घाटेआळी, वाल्मिकी नगर, कोळीवाडा, हात्ती मोहल्ला, सोमवार पेठ, मुसाजी गल्ली, झेंदाबजार मुख्य रस्ता, भास्कर आळी, रमेदी, होळी, वासलई, देवतलाव,बगली, भाबोळा, पापडी, तामतलाव सागरशेत, एस.टी डेपो ते कामगार वसाहत नरर्सरी बाग या प्रभाग समिति आय (I)च्या पूर्ण कर्यक्षेत्रात 'संविधान निष्ठा यात्रा' मा.जितेंद्र शिरसाट कार्याध्यक्ष राष्ट्रीय बहुजन विकास संघटना यांच्या नेतृत्वखाली निघाली. यात्रेला मा. बच्चुभाई कनोजिया,राष्ट्रीय प्रभारी प्रजा सुराज्य पक्ष यांनी मार्गदर्शन केले तर प्रजा सुराज्य पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष मा.संजय पवार, प्रजा सुराज्य पक्षाचे उद्योग विभागाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष मा. छोटेलाल गोंड मा. मकसूद हक्कानी, प्रवक्ता प्रजा सुराज्य पक्ष मा. संजू तडवी उपाध्यक्ष प्रजा सुराज्य पक्ष मा. आसिफ शेख, युवा प्रदेश अध्यक्ष राष्ट्रीय बहुजन विकास संघटना मा.नजीर मुलाणी, पत्रकार, मा. गणेश महाजन वसई तालुका उपाध्यक्ष राष्ट्रीय बहुजन विकास संघटना इत्यादि उपस्थित होते. अविनाश जाधव, मुन्ना सिंग, सिताराम चौरसिया, राजकुमार बौद्ध, डॉक्टर ओंकार यादव, तुषार घायवट, अंश शेष, संदीप वाघ, हर्ष घायवट, सुनील साळुंखे, प्रवीण मोरे, नोमान शेख व इतर पदाधिकारी व कार्यकर्त्यांना यासाठी विशेष सहकार्य केले.

## समाजाला उत्क्रांत अवस्थेत देण्याची क्षमता...

नामांकित कविंची मोठी परंपरा या गावाला असल्याचे ते म्हणाले. आरंभी दिपक चांदोरकर यांनी पसायदान तर शेवटी राष्ट्रगित म्हटले. सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन ज्ञानेश्वर शेंडे यांनी केले.

**साहित्य पुरस्कार प्राप्त मान्यवरांचे मनोगत!**

**स्त्रीवादाची पाळंमुळं भारतीय साहित्यात – संध्या नरे–पवार**

श्रेष्ठ लेखिका म्हणून कवयित्री बहिणाई पुरस्काराने सन्मानीत श्रीमती संध्या नरे–पवार यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, स्त्रीवादी विचारांची जेव्हा ओळख झाली तेव्हा अभ्यास केला असता त्यामध्ये संत मुक्ताई, संत जनाबाई, सोयराबाई, बहिणाबाई चौधरी यांच्या साहित्यात विज्ञानवादी दृष्टी दिसली. सर्वांच्या साहित्यात भारतीय स्त्रीवादाची पाळेमुळे मातीत रूजली आहेत. ज्या नावाने हा पुरस्कार त्या बहिणाईंच्या साहित्यात महिलांच्या अडचणींसह कणखर पणा दिसतो. मातीत पांडुरंग पाहणाऱ्या कृतीशील विचारांची रूजवात जैन हिल्स परिसरात असल्याचेही त्या म्हणाल्या.

**कवितेने ओळख दिली – वर्जेश सोलंकी**

कविता ही माणसाला ओळख करून देतात यासाठी अभिव्यक्त झाले पाहिजे. श्रेष्ठ कवी म्हणून बालकवी ठोमरे पुरस्काराने सन्मानीत केल्याने वर्जेश सोलंकी यांनी आयोजकांचे आभार मानत १९९० हा पुरस्कार प्रदान करण्यात येत आहे त्याच वर्षापासून मी कविता लिहायला लागलो याचा आनंद व्यक्त करून स्वरचित कविता सादर केली.

**साहित्यातुन दुभंगलेली मने जोडली जातात – प्रविण बांदेकर**

सध्याच्या वातावरणात आपापसातील द्वेषाची, तिरस्काराची भावना वाढीला लागत असताना समाजातील दुभंगलेली मने साहित्यातुन जोडले जातात. साहित्य, संस्कृती, कला यांच्यासह समाजातील प्रत्येक घटकांपर्यंत पोहचणा–या भवरलाल ण्ड कांताबाई जैन फाऊंडेशनतर्फे कौतुकाची, उमेदाची थाप पुरस्काराच्या रूपाने दिल्याचे त्यांनी सांगत कृतज्ञता व्यक्त केली.

**चित्रातून स्वतःला व्यक्त करा – प्रभाकर कोलते**

चित्रकलेतुन परमेश्वराचे रूप पाहता येते. चित्र ही बोलत नाही ती मनाने पाहायची, अनुभवयाची असतात. कुठलीही अपेक्षा न ठेवता चित्र काढत राहिलो यातुनच आयुष्याला जीवंतपणा आला. एखादा विषय घेऊन काम करू नये त्याची नक्कल करू नका त्याचा विचार करा आणि ते चित्रातुन व्यक्त करा. त्यांचे गुरू पळशीकर सरांचा उल्लेख करत शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मदत न करता काय करावे ह्याचा विचार करण्याची क्षमता त्यांच्यात निर्माण करावी अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

## महागड्या कारचे म्युझिक सिस्टीम...

आरोपी असून त्याच्यावर कर्नाटक, गोवा महाराष्ट्र राज्यामधील विविध ठिकाणी ३५ पेक्षा जास्त गुन्हे दाखल आहेत. पोलीस उपआयुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक प्रमोद बडाख, पो.उपनिरक्षक शिवाजी खाडे, पो.उपनिरक्षक उमेश भागवत, पोहवा. अशोक पाटील, मुकेश तटकरे, सागर बारवकर, सचिन घेरे, शंकर शिंदे, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, पोकॉ. राकेश पवार, सुमित जाधव, प्रवीण वानखेडे (सर्व नेम– गुन्हे शाखा कक्ष–३) तसेच सफौज. चव्हाण (नेम– सायबर सेल) यांनी उत्कृष्टरित्या पार पाडली आहे.

# पाचवी पासपासून बीई, एमबीए पदवीप्राप्त उमेदवारांना मिळाली रोजगाराची संधी

## • मुंबईत महारोजगार मेळाव्यात विविध कंपन्यांमधील ९ हजार २७८ रिक्त जागांसाठी मुलाखती संपन्न



**मुंबई/प्रतिनिधी**

भायखळा येथील वीरमाता जिजाबाई भोसले उद्यानाजवळील राणीबाग मैदानात आज झालेल्या महारोजगार मेळाव्यात अगदी पाचवी पास उमेदवारांपासून बीई, एमबीए अशा विविध पदवीप्राप्त उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली. पाचवी पास विद्यार्थ्यांसाठी डिलीव्हरी एक्झिक्युटीव्हच्या कामासाठी ३ हजार पदे उपलब्ध करुन देण्यात आली. होमकेअर नर्ससाठी एका कंपनीने २०० पदांसाठी मुलाखती घेतल्या. विविध कंपन्यांनी अशा एकूण ९ हजार २७८ पदांसाठी आज मुलाखती घेतल्या. राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा तसेच शालेय शिक्षण मंत्री तथा मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत आमदार यामिनी जाधव यांच्या हस्ते मेळाव्याचा प्रारंभ करण्यात आला. कौशल्य विकास विभागांतर्गत मुंबई शहर जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत आयोजित या मेळाव्यास विद्यार्थी आणि नोकरी इच्छूक उमेदवारांचा मोठा प्रतिसाद मिळाला. विविध कंपन्या, उद्योग, कॉर्पोरेट यांनी विद्यार्थ्यांच्या थेट मुलाखती घेतल्या. याप्रसंगी माजी नगरसेविका सुरेखा लोखंडे, कौशल्य विकास विभागाचे विशेष कार्य अधिकारी डॉ. प्रमोद शिंदे, कौशल्य विकास उपायुक्त डी. डी. पवार, उपायुक्त शालिक पवार, उपनगर जिल्ह्याचे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी प्रदीप दुर्गे यांच्यासह विविध कंपन्या, आर्थिक विकास महामंडळे यांचे अधिकारी, प्रतिनिधी उपस्थित होते.

**राज्यात होणार ३०० रोजगार मेळावे**

मंत्री श्री. लोढा म्हणाले की, आमच्या विभागाने तरुणांना कौशल्य विकासाबरोबरच रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी पुढाकार घेतला आहे. यासाठी मुंबईमध्ये मागील ८ दिवसात हा दुसरा रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. राज्य शासनाने ७५ हजार सरकारी नोकऱ्या देण्याचा निर्धार केला आहे, त्याचबरोबर कौशल्य विकास विभागाद्वारे विविध कंपन्या, उद्योग, कॉर्पोरेट क्षेत्र यांच्याशी समन्वय साधून येत्या काळात ५ लाख रोजगार देण्यात येतील. युवक-युवतींना त्यांच्या आवडीनुसार कौशल्य प्रशिक्षण आणि त्यानंतर खात्रीची नोकरी देण्यासाठी कौशल्य विकास विभाग विविध उपक्रम प्रभावीपणे राबवेल. राज्यभरात ३०० रोजगार मेळावे घेण्याचे नियोजित आहे, असे त्यांनी सांगितले.

**विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी शिक्षण विभागाचा पुढाकार – मंत्री दीपक केसरकर**

शालेय शिक्षण मंत्री तथा पालकमंत्री श्री. केसरकर म्हणाले की, राज्यात उद्योग आणण्याबरोबरच तरुणांना रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी राज्य शासनाने पुढाकार घेतला आहे. १ लाख ४० हजार नोकऱ्यांसाठी राजभवन येथे विविध कंपन्यांबरोबर नुकतेच सामंजस्य करार करण्यात आले. ११ वी आणि १२ वीतील विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी शालेय शिक्षण विभाग पुढाकार घेत आहे. यासाठी टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस, एचसीएल, मेझॉनसारख्या नामांकीत संस्था, कंपन्यांबरोबर सामंजस्य करार करण्यात येत आहेत. आपल्या देशात युवक लोकसंख्या अधिक आहे. कुशल माणसाला जगभरात मागणी आहे. त्याअनुषंगाने कौशल्य विकासासाठी राज्य शासनाने घेतलेला पुढाकार महत्वाचा आहे. शालेय शिक्षण विभागामार्फत या कामात व्यापक सहकार्य करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

**ऑफिस बॉयपासून कौन्सेलर पदापर्यंतच्या जागांसाठी मुलाखती**

पाचवी पास, दहावी-बारावी पास-नापास उमेदवार, पदविकाधारक, पदवीधारक, विविध शाखांमधील अभियंते, आयटीआय उत्तीर्ण विद्यार्थी, मॅनेजमेंट, आयटी, डीएड, बीएड पदवीधारक, एमबीए अशा विविध पात्रताधारकांसाठी मेळाव्यामध्ये नोकऱ्या उपलब्ध करून देण्यात आल्या. बीपीओसाठी विविध प्रादेशिक भाषा जाणणारे उमेदवार, बँक जॉब, एचआर डमिन, एज्युकेशन कौन्सेलर, हाऊसकेअर नर्स, आयटी जॉब्स, बँक ऑफिसर, सेल्स ऑफिसर, सेल्स एक्झिक्यूटिव्ह, टेली कॉलर, स्टोअर इन्चार्ज, कस्टमर सर्विस, फोन बँकिंग, ब्रांच बँकिंग, फॅसिलिटी अटेंडंट, हाउसकीपिंग, वॉर्ड बॉय, पॅन्ट्री बॉय, डाटा सायंटिस्ट, सॉफ्टवेअर डेव्हलपर, कारपेंटर, वेल्डर, सिक्युरिटी गार्ड, ऑफिस बॉय, इलेक्ट्रिशियन, ड्रायव्हर, प्लंबर अशा विविध पदांसाठी कंपन्यांनी मुलाखती घेतल्या. घरबसल्या काम करण्यासाठीही रेसिडेन्ट जिओ असोसिएटसारख्या पदांकरीता काही कंपन्यांनी मुलाखती घेतल्या.

**मेळाव्यात विविध कंपन्यांचा सहभाग**

एअरटेल, रिलायन्स जिओ, अपोलो होम हेल्थकेअर, रोप्पन ट्रान्सपोर्टेशन सर्व्हीसेस, टीएनएस एंटरप्राइजेस, फास्टट्रॅक मॅनेजमेंट सर्विसेस, इम्पेरेटिव्ह बिझनेस, युवाशक्ती स्किल इंडिया, अभिनव इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट, स्पॉटलाईट, इनोवेशन कम्स जॉईन्टली, बीव्हीजी इंडिया लिमिटेड, कल्पवृक्ष स्टाफींग सोल्युशन्स, मॅट्रिक्स कॅड अकॅडमी, स्टेलर सिक्युरिटी अँड फॅसिलिटी सर्विसेस, टीम हायर, क्रिस्टल सोल्युशन्स लिमिटेड, हिंदू रोजगार डॉट कॉम, पियानो प्रेसिडेल, केव्हीजी स्टाफींग सोल्युशन आदी कंपन्यांनी त्यांच्याकडील विविध रिक्त जागांसाठी उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या.

**स्वयंरोजगारविषयक विविध योजनांचे मार्गदर्शन**

याबरोबरच बेरोजगार उमेदवारांना स्वयंरोजगारासाठी मार्गदर्शन देण्याकरिता मेळाव्यामध्ये संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, दिव्यांग वित्त व विकास महामंडळ, शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, इतर मागासवर्ग विकास महामंडळ, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य मत्स्योद्योग विकास महामंडळ यांनी सहभागी होत उमेदवारांना विविध योजनांची माहिती दिली.

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील कुस्ती प्रशिक्षण केंद्राचे उज्वल यश



**लातूर/प्रतिनिधी**

श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचालित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील कुस्ती प्रशिक्षण केंद्रातील कुस्तीगीरांनी नुकत्याच जिल्हा क्रीडा संकुल, लातूर येथे पार पडलेल्या जिल्हास्तर मनपा शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये उज्वल यश संपादन केल्यामुळे त्यांची विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी नियुक्ती झाली आहे. या स्पर्धेत १४ वर्षाखालील विजयी खेळाडू कार्तिक धायगुडे, सुरेश कोलटकर, श्रेयश शेळके, पृथ्वीराज चव्हाण, १७ वर्षाखालील आदित्य शिंदे, संकेत जगताप, शंतनु घुगरे, सदानंद बोरुळे, शिवदर्शन पाटील, शंकर कतलाकुटे, युसुफ बिराजदार, सुदर्शन लहाने, गणेश धायगुडे, शरद सुरवसे, प्रणव कुटवाडे अथर्व चव्हाण, १९ वर्षाखालील बाळासाहेब जमादार, प्रणव जाधव, महेश कांदे, समाधान भोसले आदींचा समावेश होता. या सर्व विजयी खेळाडूंचा महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सन्माननीय ज्येष्ठ संचालक शि.वै.खानापुरे आणि ॲड.श्रीकांतजी उटगे यांच्या शुभ हस्ते पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.दिनेश मौने, उपप्राचार्य डॉ.राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य प्रा.संजय पवार, क्रीडा विभाग प्रमुख डॉ.नल्ला भास्कर रेड्डी, मराठी विभाग प्रमुख डॉ.रत्नाकर बेडगे, डॉ. गुणवंत बिरादार, डॉ.संजय गवई, डॉ.शिवप्रसाद डोंगरे, डॉ.जितेंद्र देशमुख, प्रा.रमेश तडवी, प्रा.आशिष क्षिरसागर, विष्णू तातपूरे, शुभम बिराजदार आणि संदीप मोरे यानी विजयी खेळाडूंना हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# बुद्धिबळ स्पर्धेत मिरुप शहा विजयी; लातूर येथील माईर्स एमआयडीएसआर दंत महाविद्यालयात आरंभ क्रीडा संमेलन

**लातूर/प्रतिनिधी**



लातूर येथील एमआयडीएसआर दंत महाविद्यालयात घेण्यात आलेल्या बुद्धिबळ स्पर्धेतील अंतिम सामन्यात बी. डी. एस. अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षातील विद्यार्थी मिरुप रुपल शहा यांने विजय मिळवून प्रथम क्रमांक पटकावला तर भक्ती विठ्ठल पट्टेवार हिने व्दितीय क्रमांक मिळवला आहे. विजेत्या खेळाडूंचा एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश कांबळे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देवून सत्कार करण्यात आला. यावेळी उप प्राचार्य डॉ. यतीशकुमार जोशी, कार्यालयीन अधिक्षक बळीराम हांडगे, सांस्कृतीक समिती प्रमुख डॉ. वर्षा सांगळे, क्रिडा विभाग प्रमुख डॉ. सुजित झाडके, महिला क्रिडा विभाग प्रमुख डॉ. प्रज्ञा भटनागर, संयोजक डॉ. माधुरी आग्रवाल, समिती सदस्य डॉ. शशी पाटील, डॉ. अजित शिंदे, डॉ. योगेश नागरगोजे उपस्थित होते. एमआयडीएसआर दंत महाविद्यालयात आरंभ क्रीडा संमेलन २०२२' अंतर्गत घेण्यात आलेल्या बुध्दीबळ स्पर्धेत पहिल्या फेरीत एकुण चार सामने झाले. या मधील दोन संघ उपांत्य फेरीत खेळून मिरुप शहा व भक्ती विठ्ठल पट्टेवार या दोघात अंतीम सामना झाला. यामध्ये मिरुप शहा यांने भक्ती पट्टेवार हिला मात देवून विजय मिळवला.

# लातूरात बसवेश्वर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत अफरातफर

## बिंदू नामावलीची मुळ नोंदवही गायब केल्याप्रकरणी प्रा. सिद्राम डोंगरगे यांच्यावर गुन्हा दाखल

**लातूर/प्रतिनिधी**

लातूर येथील महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेच्या महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाच्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी समाजकल्याण कार्यालयामार्फत मिळणारा निधी व शिष्यवृत्तीची रक्कम राष्ट्रीयकृत बँकेत न ठेवता त्याची मुदत ठेव संस्थेच्या परवानगी विना अंबाजोगाई येथील एका सहकारी बँकेमध्ये मुदत ठेव करून ठेवणे, एक कोटी रुपयाच्या मुदत ठेवीच्या मुळ पावस्था महाविद्यालयात जमा न करणे, अभिलेखे गायब करणे, महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापकांच्या बिंदू नामावलीचे मूळ रजिस्टर गायब करणे व महाविद्यालयाच्या कामकाजात नवीन प्राध्यापक भरती प्रक्रियेत अडथळा आणल्या प्रकरणी महाविद्यालयाचे संस्थेचे अध्यक्ष शिवशंकरआप्पा बिडवे यांच्या तक्रारी वरून लातूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

यासंदर्भात दि. २५ नोव्हेंबर रोजी ३७९, ४०६, ४०९४२०, ४३८. ४६७ ४७१ नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिवशंकर आय्या बिडवे यांनी ७ नोव्हेंबर रोजी पोलीस अधीक्षक, अधीक्षक निरीक्षक, शिवाजीनगर पोलीस स्टेशन, प्राचार्य प्रा. सिद्राम माणिकआप्पा डोंगरगे विरोधात आर्थिक हेराफेरी व आर्थिक २०२२ च्या आदेशानुसार, निर्देशित केल्याप्रमाणे माननीय धर्मादाय उपायुक्तोवेळी पत्रव्यवहार करून सुद्धा लातूर यांनी ९ सप्टेंबर २०२२ महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेच्या न्यासाचा बदल अर्ज क्रमांक १४२० / या कालावधीसाठी बिडवे यांच्या माजी प्राचार्य सिद्राम डोंगरगे यांच्या विरोधात महात्मा बसवेश्वर शिक्षण महाविद्यालयाचे तत्कालीन प्रभारी हकामध्ये सदरचा अर्ज मंजूर केलेला आयुक्त, मागासवर्गीय कक्ष औरंगाबाद आहे. महाविद्यालयाचे रेकॉर्ड गहाळ आहे असे बिडवे यांनी या अर्जात म्हटले संचालक संजय जड व अंबाजोगाई शाखेचे मुख्याधिकारी आर. एन कांबळे नसल्यामुळे त्रुटी दाखवल्या जात केली होती. यावेळी आर एन कांबळे यांनी आम्ही कोणतेही कागदपत्रे ठेवून नाहीत असे सांगितले होते. त्यानंतर जाणून बुजून प्रा सिद्राम डोंगरगे एफडी च्या मूळ पावत्या संस्थेकडे जमा करत आहे. तसेच बिंदु नामावली चे मूळ यांच्याकडे सादर केल्यानंतर, संचालक, पोर्टलमध्ये मूळ नोंदवही अपलोड केली भरती प्रक्रिया ठप्प झाली आहे. शासनाकडून चालविलेल्या पदभरती प्रक्रियेस अडथळा जाणून-बुजून प्रा डोंगरगे यांच्याकडून आणला जात आहे. त्यामुळे रोजगाराच्या संधीला नवीन प्राध्यापक मुकणार आहेत. अध्यापन असल्यामुळे महाविद्यालयाच्या करणे, कामकाजात अडथळा आणणे, तक्रार दाखल करण्यात आली आहे.

**लातूरचे एक कोटी रुपये अंबाजोगाईत आले कसे?**

लातूरच्या बसवेश्वर महाविद्यालयाच्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचे व निधीचे एक कोटी रुपये बीड जिल्ह्याच्या सहकारी बँकेकडे एफ डी करण्यासाठी आले कसे व या मोठ्या रकमेला अंबाजोगाई कडेच पाय कसे कार्यालय लातूर जिल्हा व पोलीस २०१९ (चेंज रिपोर्ट) २०१९ ते २०२४ नसल्याचे बिडवे यांनी या अर्जात म्हटले करण्यासाठी प्राध्यापकांची संख्या कमी फुटले या संदर्भात अंबाजोगाई मध्ये चर्चेला उधाण आले आहे.

महाविद्यालय लातूरला असताना ही रक्कम लातूरच्या लातूर यांच्याकडे महात्मा बसवेश्वर नेतृत्वाखाली कार्यकारी मंडळाच्या रजिस्टर (नोंदवही) मा. विभागीय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत अंबाजोगाईतील सहकारी बँकेमध्ये ठेवण्यात आली. एकाच बँकेत प्राचार्यानी का ठेवली नाही कोणाच्या दबावाखाली संस्थेच्या दोन कार्यकारणी नेमक्या कोणत्या कारणासाठी (रा.जयश्री अपार्टमेंट लातूर) यांच्या आहे. यासंदर्भात बँकेचे कार्यकारी उच्च शिक्षण यांच्या ऑनलाइन अभिलेखे गायब करणे या आरोपाखाली अस्तित्वात आहेत हे अंबाजोगाईच्या शिक्षण क्षेत्रातील जाणकारांना चांगलीच ठाऊक असल्याचे बोलले जात आहे.



**वसई विरार शहर महानगरपालिका**

**प्रभाग समिती 'जी' वालीव, विभागीय कार्यालय जूचंद्र**

**जाहिर नोटीस**

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका विभागीय कार्यालय जूचंद्र येथे झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ई कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरीददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|
| १. | जूचंद्र | JC02/1769/437 | माड कन्ट्रक्शन | गुडीया कुमारी सिंह/ मुकेश कुमार बी. सिंह |
| २. | जूचंद्र | JC03/652/45 | सिटीझन को.ऑप.हौ.सो. | जोसेफ रोझारिओ फर्नांडिस/एस्परान्स जोसेफ फर्नांडिस |
| ३. | जूचंद्र | JC01/1348/18 | अंकुश सोनू लोलगे | माणिक कांतप्पा हंगरगे |
| ४. | जूचंद्र | JC01/1348/20 | अंकुश सोनू लोलगे | विजय पांडुरंग बांगरकर |
| ५. | जूचंद्र | JC01/1348/16 | अंकुश सोनू लोलगे | सुमित पांडुरंग खोपरे |
| ६. | जूचंद्र | JC01/1348/17 | अंकुश सोनू लोलगे | राजेश रघुवीर पवार |
| ७. | जूचंद्र | JC01/1348/12 | अंकुश सोनू लोलगे | सुरेश बब्रुवान गायकवाड |
| ८. | जूचंद्र | JC01/1348/15 | अंकुश सोनू लोलगे | रविंद्र तुळशीराम हुलगुते |
| ९. | जूचंद्र | JC01/1348/14 | अंकुश सोनू लोलगे | सतेज सदानंद खोपरे |
| १०. | जूचंद्र | JC01/1348/19 | अंकुश सोनू लोलगे | उमेश गणपत रहाटवळ |
| ११. | जूचंद्र | JC01/1608/19 | रत्नेश लालचंद बी.काळे | अंबादास बी. काळे |
| १२. | जूचंद्र | JC02/1300/184 | सिमा सिंग | निम्रत चिमा |
| १३. | जूचंद्र | JC01/1620/10 | सुनीता विनोदकुमार सहानी | निमा मोनू शर्मा |
| १४. | जूचंद्र | JC02/1755/148 | फहीम शेख | अब्दुल फहिम हकिम खान |
| १५. | जूचंद्र | JC03/723/7 | प्रदिपकुमार एस. शुक्ला/मीना पी. शुक्ला | सुधीर कृष्णा माडये/ सुमेधा सुधीर माडेय |
| १६. | जूचंद्र | JC03/726/21 | सुरेश बाबुराव भावेकर | दिनेशचंद्र यादव/ सविता दिनेशचंद्र यादव |
| १७. | जूचंद्र | JC01/1205/2 | घनश्याम मेवालाल गुप्ता | भुवनेश्वरी देवी |
| १८. | जूचंद्र | JC01/1255/16 | योगेश सेतोष झेपले | हेमंत सुभाष बागवे |
| १९. | जूचंद्र | JC01/755/4 | टनंत दत्ताराम गुरव | अशोक गंगाराम आग्रे/ आरती अशोक आग्रे |
| २०. | जूचंद्र | JC04/1744/94 | सिलिंक कंन्स्ट्रक्शन | प्रधान सरोज कुमार सिन्हा / निशा सिन्हा |

जावक क्र. वविशम/विवा/२१४६/२०२२-२३
दिनांक : १६/१२/२०२२

सही/-
सहा.आयुक्त
प्रभाग समिती 'जी' वालीव
वसई-विरार शहर महानगरपालिका

19 TO 25 DECEMBER 2022 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 12/17/2022 8:15 PM Page 1



# नागपूर-बिलासपूर 'वंदे भारत एक्सप्रेस'ला प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी दाखवला हिरवा झेंडा!





**नागपूर/प्रतिनिधी**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नागपूर रेल्वे स्थानकावर नागपूर-बिलासपूर शहरांदरम्यान धावणाऱ्या वंदे भारत एक्स्प्रेस' या वेगवान रेल्वे गाडीला हिरवा झेंडा दाखवून मार्गस्थ केले. या गाडीमुळे या दोन्ही शहरांदरम्यान वेगवान रेल्वेगाडीचा पर्याय उपलब्ध झाला असून ही देशातील सहावी तर महाराष्ट्रातील दुसरी वंदे भारत एक्सप्रेस ठरली आहे. राज्यपाल भगत सिंह कोश्यारी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आमदार चंद्रशेखर बावनकुळे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. प्रधानमंत्री मोदी यांनी यावेळी रेल्वे स्थानकावर उभ्या वंदे भारत एक्सप्रेसच्या डब्यामधील प्रवाशांशी संवाद साधला. तसेच या एक्सप्रेस गाडीच्या कॅबिनलाही भेट देवून कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. मुख्य कार्यक्रमस्थळी त्यांनी या एक्सप्रेस गाडीला हिरवा झेंडा दाखवून मार्गस्थ केले. यावेळी उपस्थित मान्यवर, विद्यार्थ्यांसह रेल्वे अधिकारी कर्मचारी व नागरिकांनी टाळयांच्या गजराने या एक्सप्रेस गाडीला निरोप दिला. वंदे भारत एक्सप्रेसमुळे नागपूर ते बिलासपूर हे अंतर अवघ्या साडेपाच तासात गाठता येणे शक्य होणार आहे. दक्षिण पूर्व मध्ये रेल्वे मार्गावर ही एक्सप्रेस चालवली जाणार आहे. वेगवान प्रवासासोबत सुरक्षेची काळजी घेण्यात आलेल्या या एक्सप्रेस गाडीला १६ कोच असून या गाडीची आसनक्षमता १ हजार १२८ आहे. नागपूर ते बिलासपूर दरम्यान या गाडीला फक्त गोंदिया, दुर्ग आणि रायपूर एवढेच थांबे देण्यात आले आहेत.

## वंदे भारत एक्सप्रेस गाडीविषयी

- आज प्रारंभ झालेली देशातील ही सहावी तर महाराष्ट्रातील दुसरी वंदेभारत एक्सप्रेस ठरली आहे.
- स्वदेशी बनावटीची वंदे भारत एक्सप्रेस ही भारतीय अभियंत्यांच्या क्षमतेची साक्ष आणि मेक इन इंडिया' उपक्रमाचे फलित आहे.
- या एक्सप्रेस गाडीच्या माध्यमातून महाराष्ट्राची उपराजधानी नागपूर आणि छत्तीसगडची राजधानी रायपूर आणि बिलासपूर ही महत्वाची शहर जोडली जाणार.
- नागपूर - बिलासपूर एकूण अंतर: ४१२ कि.मी.
- प्रवास वेळ : ५.३० तास
- उभय शहरांदरम्यान आठवड्यातून ६ वेळा धावणार वंदे भारत एक्सप्रेस (शनिवारी सेवा बंद असणार)
- गाडीला एकूण १६ कोच असून प्रत्येक कोचमध्ये प्रवाशांच्या माहितीसाठी ३२ इंचीच्या डिजिटल स्क्रिन.
- प्रवासी घेणार वेगवान व सुरक्षित प्रवासाचा अनुभव. विमान प्रवासाचा अनुभव देतानाच 'कवच' या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून या एक्सप्रेस गाडीत सर्वोत्तम सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे.
- प्रत्येक कोचमध्ये प्रवाशांची माहिती आणि इंफोटेनमेंट उपलब्ध आहे. दिव्यांग प्रवाशांची विशेष काळजी घेण्यात आली आहे, ठीक -ठिकाणी ब्रेल लिपीतून माहिती व सूचना देण्यात आल्या आहेत. टच फ्री सुविधांसह व्हॅक्यूम प्रसाधनगृहे, उच्च कार्यक्षमतेच्या कंप्रेसरद्वारे उत्कृष्ट वेंटिलेशन आणि वातानुकूलन नियंत्रण राखण्यात आले आहे.

# जिल्हा परिषद मुख्यकार्यकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार मनिषा आव्हाळे यांचेकडे सुपर्द!



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार सिईओ दिलीप स्वामी यांनी सहाय्यक जिल्हाधिकारी मनिषा आव्हाळे यांचेकडे सुपूर्द केला आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे दालनात विभाग प्रमुख यांचे बैठकीत आज सिईओ दिलीप स्वामी यांनी सहाय्यक जिल्हाधिकारी मनिषा आव्हाळे यांचा आज वाढदिवसाचे औचित्य साधून त्यांना पुष्पगुच्छ व मिठाई व देऊन स्वागत केले. त्यानंतर त्यांचेकडे मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविला. सोलापूर जिल्हा परिषदेच्या कामकाजा बाबत मार्गदर्शन करून त्यांनी विभाग प्रमुखांची ओळख करून दिली. नुतन प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांनी सिईओ दिलीप स्वामी यांना पुष्प गुच्छ देऊन त्यांना प्रशिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी उप मुख्य कार्यकारी अधिकारी चंचल पाटील, मुख्य लेखा व वित्त अधिकारी अजय पवार, शिक्षणाधिकारी संजय जावीर, प्रकल्प अधिकारी जावेद शेख, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता दिपक कोळी, ...पान ६ वर

# ग्रामपंचायत निवडणूक मानधन वाढीसाठी राज्य निवडणूक आयोगाकडे जिल्हा शिक्षक संघाचे निवेदन



**सोलापूर/प्रतिनिधी**

ग्रामपंचायत निवडणूक ही इतर निवडणूकीपेक्षा जास्त जठील, किचकट व अत्यंत जबाबदारीने पार पाडावयाची प्रक्रिया असल्याने याकरिता नेमलेल्या कर्मचाऱ्यांना निवडणूकपूर्व तीन-तीन दिवस प्रशिक्षण दिली जाते. त्यामानाने कर्मचाऱ्यांना निवडणूक भत्ता जास्त अपेक्षित असतांना उलट शासनाकडून मिळालेल्या अल्प मानधनामुळे भत्ताच दिला जात नाही. दिलेच तरी ते अत्यल्प असते म्हणून या मानधन वाढीसाठी सोलापूर जिल्हा प्राथ. शिक्षक संघाच्या वतीने राज्य निवडणूक आयोगाकडे निवेदन देण्यात आले आहे. याकरिता आज सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष वीरभद्र यादवाड व सरचिटणीस सूर्यकांत हत्तुरे (डोगे) व सिद्राम कटगेरी यांच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी कार्यालयातील ...पान ६ वर

# राष्ट्रीय बहुजन विकास संघटनेतर्फे संविधान निष्ठा यात्रेचा शुभारंभ

# भारतीय राज्यघटनेच्या मुल्यांना नष्ट करू पाहणाऱ्यांना वेळीच रोखले पाहिजे -शरदअण्णा तिगोटे

**वसई/प्रतिनिधी**

११ डिसेंबर २०२२ दुपारी १२:३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सिध्दार्थ नगर,कोर्ट नाका, वसई येथुन संविधान गौरव दिन, जागर जागृती अभियान या कार्यक्रमाचा एक महत्वपूर्ण भाग म्हणून संविधान निष्ठा यात्रा २०२२-२३ ह्या उपक्रमाचा शुभारंभ दिनांक ११/१२/२०२२ रोजी मोठ्या उत्साहात करण्यात आला. 'संविधान जाणीव जागृती अभियान' ह्या उपक्रमा अंतर्गत 'सविधान निष्ठा यात्रा' सुरु करण्याचा मुख्य हेतू भारतीय संविधानाचा सारांश असलेली संविधानाची उद्देशिका घराघरात पोहचवणे व त्या माध्यमातुन भारतीय राज्यघटनेमधील समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय व धर्मनिरपेक्षता या मानवी मूल्यांचा प्रचार प्रसार करणे असा आहे. भारतीय राज्यघटनेच्या मुल्यांना नष्ट करू इच्छिणाऱ्या सांप्रदायिक शक्तींचा समाजात वाढत चाललेला कट्टरतावाद आणि त्यामुळे जातीजातींमध्ये, धर्माधर्मामध्ये एकमेकांबद्दल द्वेष वाढवून दंगल घडवून इच्छिणाऱ्या काही समाज कंटकांशी मुकाबला



करण्यासाठी असं होऊ नये यासाठी तसेच एकमेकांच्या जाती, धर्माबद्दलचा द्वेष कमी करण्यासाठी संविधान जाणीव जागृती अभियानाच्या अंतर्गत संविधान निष्ठा यात्रेचा शुभारंभ करण्यात आला आहे. या माध्यमातुन आपल्या सर्वांना घराघरात जाऊन जनजागृती करावी लागणार आहे. असे आवाहन अण्णासाहेब तिगोटे यांना कार्यक्रमप्रसंगी उपस्थितांना संबोधित करताना केले. काही धर्मांध शक्ती सामान्य माणसांमध्ये धर्माच्या नावाने इतर धर्माबद्दल, जातींबददल तिरस्काराची भावना वाढविण्याचे काम करीत आहेत तर दुसरीकडे विनाशकारी आर्थिक धोरणाच्या स्वीकारामुळे सर्वसामान्यांच्या हातून जगण्याची सर्व साधने, संसाधने पळून नेले जात आहेत, भारतीय संविधानाला छेद देणाऱ्या घटना दिवसोंदिवस वाढत चालल्या आहेत, हे कुठेतरी थांबलं पाहिजे. ...पान ६ वर

# समाजाला उत्क्रांत अवस्थेत देण्याची क्षमता कलांमध्ये -डॉ.भालचंद्र नेमाडे

## जैन हिल्स येथे कस्तूरबा सभागृहात २०२१ साहित्य पुरस्कार वितरण सोहळा संपन्न



**जळगाव/प्रतिनिधी**

ज्या समाजात कला आणि साहित्य सोबत वाढत असते त्या समाजाची उत्क्रांती होत असते. आपली संस्कृती कलेमुळे समृध्द झाली. जेवढे इतर शिक्षण महत्त्वाचे आहे तितकीचे महत्त्वाची कला आहे. आर्टिस्ट होणं किंवा होऊ देणं हे महत्त्वाचे असून कला, साहित्य, चित्रकला शिल्प कला अशा विविध कलांच्या माध्यमातून आपण समृद्ध होऊया समाजाला उत्क्रांत अवस्थेत नेण्याची क्षमता केवळ कलांमध्ये असते असे प्रतिपादन ज्ञानपीठकार डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी केले. जैन उद्योग समूहाची सेवाभावी संस्था भवरलाल अॅण्ड कांताबाई जैन फाउंडेशनतर्फे दुसरा व्दिवार्षिक 'कांताई जैन साहित्य-कला जीवनगौरव पुरस्कार' जगप्रसिद्ध चित्रकार श्री. प्रभाकर कोलते यांना तर श्रेष्ठ लेखिका म्हणून कवयित्री बहिणाई पुरस्कारा'साठी श्रीमती संध्या नरे-पवार (कुलपवाडी-बोरिवली, मुंबई), श्रेष्ठ कवी म्हणून बालकवी ठोमरे पुरस्कारा'साठी श्री. वर्जेश सोलंकी (आगाशी-वसई, मुंबई) तर श्रेष्ठ गद्यलेखक म्हणून ना. धों. महानोर पुरस्कारा'साठी प्रवीण बांदेकर (सावंतवाडी) यांना कस्तुरबा सभागृह, गांधीतीर्थ येथे साहित्य-कला पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष सुप्रसिद्ध साहित्यिक ज्ञानपीठ सन्मानित डॉ. भालचंद्र नेमाडे यांच्याहस्ते सन्मानपूर्ण प्रदान केला गेला. कांताई साहित्य-कला जीवनगौरव पुरस्काराचे स्वरूप दोन लक्ष रूपये, आकर्षक सन्मानचिन्ह, शाल-श्रीफळ असे आहे तर कवयित्री बहिणाई, बालकवी ठोमरे, ना. धों. महानोर या तिघंही पुरस्काराचे स्वरूप एक लक्ष रूपये, सन्मानचिन्ह, शाल-श्रीफळ असे आहे. याप्रसंगी डॉ. भालचंद्र नेमाडे बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर पद्मश्री कविवर्य ना. धों. महानोर, संघपती दलिचंद जैन, भवरलाल अॅण्ड कांताबाई जैन फाऊंडेशनचे अध्यक्ष अशोक जैन, सौ. ज्योती जैन, सौ.निशा जैन, डा. भावना जैन व सन्मानार्थी उपस्थित होते. उपस्थितांच्या हस्ते बहिणाई पुस्तक प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी पुस्तकाचे संपादक अशोक चौधरी, संपादन सहाय्यक ज्ञानेश्वर शेंडे, अथर्व प्रकाशनचे युवराज माळी उपस्थीत होते. यावेळी जैन इरिगेशनचे सहव्यवस्थापकीय संचालक अतुल जैन व नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक बि. जी. शेखर पाटील यांचीही उपस्थीती होती. यावेळी चौघेही पुरस्कार्थींची कार्य परिचयात्मक डॉक्युमेन्ट्री दाखविण्यात आली. प्रास्ताविक ज्येष्ठ रंगकर्मी शंभू पाटील यांनी केले. यात त्यांनी श्रध्देय भवरलालजी जैन हे कला, साहित्य आणि संस्कृती ही विश्वाची किल्ली मानत असे सांगितले. जळगाव हे कवितेचे गाव असून ...पान ६ वर

# महागड्या कारचे म्युझिक सिस्टीम टेप चोरी करणारी सराईत टोळी गजाआड!




**विरार/प्रतिनिधी**

मागील काही महिन्यांपासून वसई विरार शहरात महागड्या कारची काच फोडून म्युझिक सिस्टीम, कार टेप चोरीच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होऊन कार टेप चोरी करणारी टोळी सक्रिय झाली होती. विरार (पूर्व) येथे भोलानाथ फर्निचर समोर देवेंद्र खेमराज जैन यांनी आपली टोयोटा कंपनीची इनोवा कार पार्क केली होती. मात्र अज्ञात चोरट्याने त्यांच्या गाडीच्या डाव्या बाजूकडील दरवाजाची काच तोडून कार मधील कार टेप चोरी केल्याबाबत विरार पोलीस ठाणे येथे गुन्हा दखल करण्यात आला होता. अशा गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी विरार गुन्हे शाखा कक्ष-३ च्या पथकाने कंबर कसली होती. अखेर गुप्त बातमीदारामार्फत आरोपी जुबेर रईस अहमद (वय ३२), शहनवाज मोहम्मद अलीयार खान (वय १९) दोघे रा. तळोजा, नवी मुंबई, परवेज इकबाल सैय्यद रा. कुर्ला, मुंबई यांना एकामागून एक शिताफीने ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. त्यांच्याकडून गुन्हा करण्याकरिता वापरण्यात आलेली एक आयटेन कर, एक स्विफ्ट कार व चोरी केलेले २० म्युझिक सिस्टीम कार टेप असा एकूण १० लाख ३२ हजार १६० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. तसेच विरार, अर्नाळा, तुळींज, आचोळे, माणिकपूर, नायनगर व विठ्ठलवाडी ठाणे येथील आणखी १५ गुन्हे उघडकीस आणण्यात गुन्हे शाखेला यश आले आहे. हे सर्व आरोपी सराईत गुन्हेगार आहेत. आरोपी जुबेर हा कार टेप चोरीचा ...पान ६ वर

# निरोगी आयुष्य जगण्यासाठी नियमित व्यायाम आवश्यक -रविंद्र चव्हाण



**पालघर/प्रतिनिधी**

धकाधकीच्या जिवनामध्ये व्यायाम करण्यास वेळ मिळत नाही याचा परिणाम व्यक्तीच्या आयुष्यावर होतो. निरोगी आयुष्य जगण्यासाठी प्रत्येकांनी नियमित व्यायाम करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), अन्न, नागरी परवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांनी केले. चारोटी, ता. डहाणू येथे व्यायाम शाळेचे उदघाटन श्री. चव्हाण यांच्या हस्ते झाले त्यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यायाम शाळेचे संचालक फरीद मनेशीया, आमदार श्रीनिवास वनगा, निरंजन डावखरे माजी आमदार अमित घोडा, विलास तरे तहसीलदार अभिजित देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते. पूर्वी प्रत्येक गावामध्ये व्यायाम शाळा होत्या कुस्तीसाठी तालीम मिळत असे त्यामुळे गावातील लोकांचे आरोग्य चांगले राहत असे आधुनिकतेच्या काळामध्ये व्यक्ती व्यस्त असल्यामुळे व्यायाम शाळेचे महत्व कमी होत गेले. विविध व्याधींमुळे आज तरुणांना व्यायामाची गरज भासत असल्याचे पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांनी सांगितले. घर तिथे नळ ही योजना संपूर्ण जिल्ह्यात राबविण्यात येत असून प्रत्येक घराला नळ जोडणी देण्यासाठी जिल्हा प्रशासन कटीबध असल्याचे पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांनी डहाणू नगरपरिषद यांच्या पाणी पुरवठा योजनेचे लोकार्पण केले, त्यावेळी श्री. चव्हाण बोलत होते. यावेळी खासदार राजेंद्र गावित, आमदार श्रीनिवास वनगा, निरंजन डावखरे, नगराध्यक्ष भरत राजपूत, जिल्हाधिकारी गोविंद बोडके, पोलीस अधिक्षक बाळासाहेब पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

# डॉ. विजयलक्ष्मी माले यांच्या संशोधनास द्वितीय पारितोषिक



**लातूर/प्रतिनिधी**

भारतीय मौखिक औषध शास्त्र आणि क्ष - किरण शास्त्र संस्थेच्या वतीने ३३ वी तीन दिवशीय राष्ट्रीय परिषद नुकतीच ओरिसातील भुवनेश्र्वर येथे घेण्यात आली. या परिषदेत लातूर येथील माईर्स एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील मौखिक औषध शास्त्र आणि क्ष - किरण शास्त्र विभाग प्रमुख डॉ. विजयलक्ष्मी प्रशांत माले यांनी सादर केलेल्या 'तोंडाचा कर्करोग' या विषयावरील शोध निबंधास व्दितीय व 'सर्वव्यापी उर्जा' या विषयावरील भितीपत्रकास विशेष भितीपत्रकाचे पारितोषिक मिळाले आहे. या यशाबद्दल एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांच्या हस्ते डॉ. विजयलक्ष्मी माले यांचा प्रशस्तीपत्र, शाल व संत ज्ञानेश्र्वर माऊलींची प्रतिमा भेट देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी दंत रोग तज्ज्ञ डॉ. सोमनाथ गित्ते, डॉ. प्रियंका लासुणे हे उपस्थित होते. या परिषदेत डॉ. विजयलक्ष्मी माले यानी परिषदेच्या दुसऱ्या दिवशी पहिल्या सत्रात विद्याशाखा प्रवर्गात 'तोंडाचा कर्करोग' या विषयावर शोधनिबंध सादर केला. त्यांच्या या शोध निबंधास व्दितीय पारितोषीक मिळाले. तसेच दुपारच्या सत्रात 'सर्वव्यापी उर्जा' या विषयावर सादर केलेल्या भितीपत्रकास विशेष भितीपत्रक हे पारितोषीक मिळाले. या परिषदेत मौखिक औषध शास्त्र आणि क्ष - किरण शास्त्र या विषयाचे देशभरातील संशोधक सहभागी झाले होते.